

मूल्य १-२५ ] दिवाळी अंक [ नव्हें-डिसें. १९७८

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

गुरू एक दृष्टीचें ध्यान ।
इतर सर्व गुरुसमान ।
नाहीं गुरुविण दुजें आन ।
अनन्य अवधान या नांव ॥ ८१ ॥

करितां गुरुस्वरुप ध्यान ।
कुंठित होय बुद्धिमन ।
म्हणोनि शेवटीं करावें नमन ।
निःशब्द मौन धरोनियां ॥ ८२ ॥

नातो ज्ञानार्थ गुरु करावें ।
शून्य सदुपदेशाच्या नांवे ।
दक्षिणा देतां वित्ता मुकावे ।
अनुतापा पावावें परिणामी ॥ ८३ ॥

गुह्य ज्ञानाची केवळ चावटी ।
मिरवें प्रांजळ पणाची दिवटी ।
पाजिली दंभे जया वाळगुटी ।
देईल शेवटी तो काय ॥ ८४ ॥

बाह्यत्कारी मोठा सोंवळा ।
अंतर्यामीं नाहीं कोंवळा ।
प्रतीतीच्या नांवे आंवळा ।
तयाची शाळा निकामी ॥ ८५ ॥

–श्रीसाईसच्चरित् अध्याय ३२ वा.


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] नोव्हें.-डिसें. ७८ [ अं. ८, ९

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३२ ६१

# – दिवाळी अंकाचे मानकरी –

१) डॉ. श्री. दि. परचुरे
२) प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुप्ते
३) श्री. शेखर जोशी
४) श्री. बी. एस. जोशी
५) सौ. प्रतिभा नागवेकर
६) श्री. स्वामी संजयानंद
७) सौ. सुलभा दि. ऋषी
८) श्री. बी. वाय. मुगणेकर
९) कु. पुष्पलता मोहरे
१०) श्री. विजय हजारे
११) सौ. निशा चिपकर
१२) श्री. महादेव भाऊराव धुगे
१३) सौ. सुचना सुरेश करमरकर
१४) श्री. सूर्यकांत गर्जे
१५) सौ. लक्ष्मी
१६) श्री. सुभाष वैद्य
१७) सौ. अस्मिता दांडेकर
१८) श्री. रामजी पारटकर
१९) सौ. प्रमोदिनी पोतनीस
२०) श्री. अनिल रसाळ
२१) सौ. जानकीबाई चुनेकर
२२) श्री. रमेश चव्हाण
२३) सौ. विनिता डाहाके
२४) श्री. जगन्नाथ कुलकर्णी
२५) सौ. सिंधु देविदास मुळीक
२६) श्री. पां. वा. भुतकर
२७) सौ. शोभा वायंगणकर
२८) श्री. मनोहर पंडित
२९) सौ. सिंधु सणस
३०) श्री. एल. पी. लवंदे
३१) लीलावती कां गुजराथी
३२) एक साईभक्त
३३) श्री. सु र. दळवी
३४) श्री. सुधीर पंडित
३५) श्री. त्रिभुवनाथ शुक्ल
३६) श्री. गोविंद भडसावळे
३७) श्री. प्रशांत वंजारी
३८) श्री. शंकरराव साहू
३९) श्री. विनायक प्रभुणे
४०) श्री. रविंद्रनाथ मोगरे
४१) श्री. बापूसाहेब निरखे
४२) कु अलका अधिकारी

### ओम, श्रीसाईसमर्थ

### ओम, श्रीसाईशरणम् मम

### श्रीसाईबाबाय नमः, श्रीसाईनाथाय नमः, श्रीसाईनंदाय नमः

आजानु बाहुनिज-भक्तपालकं
पाषाणवासं विमलं कृपावनं ।
सर्वोत्तमं श्रीशिरडी निवासिनं
श्रीसाईनाथं शरणं प्रपद्ये ॥



शिरडीसाई प्रभु कृपाकरा ।
शिरडीश्वर मज हाती धरा ।
श्यामसुंदरा इंदिरावरा ।
शंख चक्रधर दया करा ॥

**ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे**
**त्या त्या स्थळी साई स्वरूप तूझे ।**
**मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी**
**तेथे तुझे सदगुरु पाय दोन्ही ॥**

## दिपावली 卐 शुभचिंतन

ही दिवाळी व नूतन वर्ष सर्व साईभक्तांना, वाचकांना हितचिंतकांना सुखाची, आनंदाची व भरभराटीची जावो ही श्रीसाईचरणी प्रार्थना

## संपादकीय –

स. न. हि. वि.

श्रीसाईलीलेचा हा छानदार दिवाळी अंक साईभक्त वाचकांच्या हाती ऐन दिवाळीत देण्यात आम्हाला अतीव आनंद होत आहे. गेल्या पाच वर्षांपासून दिवाळी अंक हा भक्तांच्या स्वानुभवांनी युक्त असा काढण्याचे आम्ही ठरविले व त्यानुसार हा अंक भक्तांच्या अनुभवांनी भरगच्च असा आहे.

श्रीसाईबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीनिमित्त यंदाच्या विजयादशमीपासून पुढील विजयादशमी – दिवाळीपर्यंत आम्ही तेरा खास अंक काढण्याचे यापूर्वीच जाहीर केले आहे. या मालिकेतला हा दुसरा खास अंक आहे. या मालिकेतल्या मागच्या पहिल्या खास अंकाच्या प्रती नेहमीच्यापेक्षा अधिक काढून देखील अवघ्या पाच सुद्धा प्रती आमच्या वाट्याला शिल्लक राहिल्या नाहीत. आम्ही करीत असलेल्या या साईसेवा कार्याचे वाचक अशा प्रकारचे स्वागत करतात यानेच आमचा हुरूप वाढतो.

आम्ही पूर्वी जाहीर केलेल्या तारखेच्या आत म्हणजे १५ सप्टेंबर अखेर ज्या भक्तांचे अनुभव आले त्यांचे निवडक अनुभव या अंकात समाविष्ट केले आहेत. वेळोवेळी अंकांतून सूचना देऊन, लेखी कळवूनसुद्धा अजूनही कित्येक भक्तांना लेखन तंत्र अजिबात कळलेले नाही असे दिसते. कागदाच्या तुकड्यावर, कार्डावर, आंतरदेशीय कागदावर दोन्ही बाजूस समास न सोडता वेडावाकडा कसातरी लिहिलेला मजकूर छपाई तांत्रिकदृष्ट्या अयोग्य म्हणून मागे ठेवावा लागला आहे. काही भक्तांनी तर पानेच्या पाने, अवधान न ठेवता अवास्तव लांबड लावून मजकूर पाठविले; ते सुद्धा अस्वीकृत केले आहेत. कागदाच्या एकाच बाजूस थोडक्यात शुद्ध लिहून मजकूर पाठवा की तो साईलीलेत लौकर प्रकाशित झालाच म्हणून समजा. काही भक्तांच्या मजकुरात आम्हास काटछाट दुरुस्ती व इतर संस्कार करावे लागले आहेत.

भक्तमंडळीनो, श्रीसाईलीलेच्या या अंकावरचा आपला अभिप्राय त्वरित आमचेकडे कळवा व आमचे काही चुकत असल्यास त्याबद्दलही आम्हास मार्गदर्शन करा अशी नम्र विनंती. निवडक अभिप्राय जानेवारी १९७९ च्या अंकात प्रसिद्ध केले जातील.

---

**श्रीसाईलीलेचा हा अंक नोव्हेंबर – डिसेंबर जोड अंक असल्याने डिसेंबरचा वेगळा अंक प्रसिद्ध होणार नाही याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.**

# आपले तारणकर्ते साईबाबाच !

—डॉ. श्री. दि. परचुरे एम्. ए. पीएच्. डी.
गजानन भुवन, शिवाजी पार्क, दादर २८.

● शिर्डीचे साईबाबा हे एक जागृत दैवत आहे, अशा प्रकारची माहिती मी पुष्कळ साईभक्तांकडून ऐकलेली होती. चित्रपटसृष्टीत श्रीसाईबाबांचे भक्त बरेच आहेत. त्यांच्या तोंडूनही साईबाबांचा महिमा मी ऐकला होता; परंतु संतांविषयी व देवाविषयीं पूज्यभाव व आदरभाव मनात असूनही श्रीसाईबाबांच्याकडे वळावे असे काही मनात येईना.

श्रीबाबांनी मला आतापर्यंत काही अडचणच येऊ दिलेली नाही. त्यामुळे आर्ततेने त्यांचा धावा करण्याचेही कारण पडलेले नाही; परंतु अडचणीतून आपल्या भक्ताला कसे बाहेर ओढून काढावे ह्यासंबंधीची बाबांची लीला मात्र माझ्या बाबतीत घडून आली, तो माझा अनुभव असा —

एका सहकारी गृहरचना संस्थेचा सभासद ह्या नात्याने दोन हप्ते मी भरले व तिसरा हप्ता ऑक्टोबर १९७६ च्या पहिल्या आठवड्यात मी भरावा, असे पत्र मला संस्थेच्या कार्यवाहांकडून सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मिळाले. कार्यवाह माझे मित्र होते. माझ्याकडून ७००० रुपयांची मागणी करण्यात आलेली होती आणि तेवढे पैसे तर सप्टेंबर महिन्याच्या शेवटी माझ्याजवळ नव्हते. त्यामुळे माझे लोकांकडून येणे असलेले पैसे विचारात घेऊन मी कार्यवाहांकडे गेलो व पंधरा ऑक्टोबर १९७६ चा रु. ७००० चा चेक त्यांना दिला. ५ ऑक्टोबरला चेक दिल्यापासून माझे येणे पैसे मिळविण्यासाठी माझी खटपट सुरू झाली; पण अपेक्षे-प्रमाणे पैसे काही आले नाहीत आणि १४ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत मी केवळ ५००० रुपयेच जमवू शकलो. त्यामुळे त्या दिवशी सकाळी बाबांची प्रार्थना करून मी त्यांना सांगितले की, उद्या १५-१०-७६ ला माझा चेक बँकेत जावयाचा आहे तरी तोपर्यंत काहीतरी व्यवस्था करा. अन्यथा माझ्यावर ठपका येईल.

वरील प्रकारे प्रार्थना केल्यावर माझी खात्रीच होती की बाबा मला ह्यातून नक्कीच पार करून नेतील. तरीदेखील मी मनाशी असे ठरविले होते की दि. १४-१०-७६ च्या संध्याकाळपर्यंत पैशाची व्यवस्था न झाल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी

म्हणजे दि. १५-१०-७६ ला सकाळीच कार्यवाहांकडे जावयाचे व इतक्यात त्यांना चेक बँकेत न टाकण्याबद्दल विनंति करावयाची; पण बाबांची करणी कोणास कळणार ? भक्ताची आर्त हाक त्यांना ऐकू जाणार नाही असे कसे घडेल ? आपल्या भक्ताची अडचण निवारण्यासाठी ते धावून येणारच, आणि आश्चर्य काय की ज्या कार्यवाहां-कडे दि. १५ ला जाण्याचे मी ठरविले होते तेच कार्यवाह १४-१०-७६ लाच रात्री माझ्याकडे आले ! पैशांची व्यवस्था होऊ शकली नसल्यामुळे चेकसंबंधी काय बोलावयाचे ते योग्य तेव्हा बोलूच ह्या विचाराने मी कार्यवाहांकडे इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यास सुरुवात केली. तेव्हा त्यांनीच चेकचा विषय काढला व दुसरा चेक देण्याची विनंति केली ! त्यांच्या विनंतीचे कारण विचारता त्यांनी सांगितले, " काही सभासदांकडून आलेले चेक मी माझ्या बुशकोटात ठेवले होते, नेहमी माझी बायको कपडे धुवावयास टाकताना त्यांचे खिसे नीट तपासून मग ते धुवावयास टाकते; पण का कोणास कळे, काल मात्र तिने माझा बुशकोट खिसे न तपासताच भिजवला. नंतर तिच्या लक्षात आले तेव्हा खिशातील चेक बाहेर काढले; पण त्यातील जे चेक शाईने लिहिलेले होते ते सर्व खराब झाले व जे बॉलपेनने लिहिलेले होते तेवढे चांगले राहिले. तुमचा चेक खराब झाल्याने चालणार नाही; तेव्हा मी तो परत आणला आहे तो तुम्ही परत घ्या व दुसरा चेक द्या."

कार्यवाहांचे हे बोलणे ऐकून मला भलतेच आश्चर्य वाटले व श्रीबाबांच्या लीलेचे कौतुक वाटले ! आलेली संधी बरी आहे हे ओळखून मी कार्यवाहांना सांगितले की, सध्या माझ्याजवळ फक्त ५००० रुपयेच आहेत. तेव्हा तेवढाच चेक मी आज तुम्हांस देतो. राहिलेले दोन हजार आणखी महिन्याभराने देईन. कार्य-वाहांना त्या क्षणी तेवढ्याच रकमेची गरज होती आणि तेवढ्याच रकमेचा चेक घेऊन ते आनंदाने माझेकडून गेले.

कार्यवाह गेल्यावर मी बाबांचे मनोमन आभार मानले व त्यांची प्रार्थना केली व अशीच कृपा सदैव ठेवण्याबद्दल त्यांची विनवणी केली. माझी साईभक्ति अगदीच अल्पकाळाची आहे. असे असूनही ज्याला एकदा बाबांनी आपला म्हटले त्याच्यावर ते आपली कृपा कोणताही हातचा न राखता कशी मुक्तहस्ताने करतात ह्याचे हे उदाहरण सर्व साईभक्तांना पटेल ह्यात शंका नाही. सर्व साईभक्तांवर बाबांची अशीच कृपा सदैव राहो हीच साईचरणी प्रार्थना.

◆◆◆◆◆◆

# साईनाथके हजारो हाथ

— प्रा. डॉ. सौ. चारुशीला गुते
५८ ए, कृष्ण निवास, वाळकेश्वर मार्ग,
मुंबई–४०० ००६

● आमच्या साऱ्या कुटुंबाची श्रीसाईबाबांच्यावर निस्सीम भक्ती आहे. कोणतीही गोष्ट करताना श्रीबाबांना मनोमन हाक मारल्याशिवाय करायची नाही असा आम्ही कित्येक वर्षे नियम ठेवला आहे, आणि त्याचे आम्हाला फार चांगले अनुभव आले आहेत. माझा मुलगा गेली दहा वर्षे अमेरिकेत आहे पण लहानपणापासून तोही श्रीबाबांना अतिशय मानतो. त्याची जी बाबांवर निष्ठा आहे त्यामुळे त्याला नेहमी अनेक चांगले अनुभव येतात व त्याच्या प्रत्येक कार्यात यश मिळते.

गेल्या वर्षी मला श्रीसाईनाथबाबांचा असाच एक अद्‌भुत अनुभव आला. माझे पती श्री. गुते यांच्या घशामध्ये थोडी सूज आली होती. प्रथम चार महिने त्यांना खाताना त्रास होतो ही गोष्ट त्यांनी घरात कुणालाच कळविली नाही. परंतु दसऱ्यापासून त्यांना जेवताना पोळी भाजी वगैरे खाता येईनासे झाले. पुढे पुढे तर पाणी किंवा दूध पिणे पण कठीण व्हायला लागले. त्यांचे वजन घटले. अंगातील रक्त कमी झाले.

आम्ही सर्व अतिशय घाबरलो व रात्रंदिवस श्रीसाईबाबांचा धावा सुरू केला. ऐन दिवाळीत त्यांना ब्रीच कँडी इस्पितळात नेऊन त्यांच्या घशाची तपासणी केली. डॉक्टरांनी त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे उपचार सुरू झाले. घशातली अन्ननलिका सुजली होती व आकुंचित झाली होती.

आम्ही केवळ बाबांवर सारा भार टाकून होतो. रात्रंदिवस श्रीसाईबाबांना मी हाका मारीत होते. शिरडीला अभिषेक करून तिथला प्रसाद आणला. येताजाता बाबांची उदी त्यांच्या घशाला लावीत होते व पोटातही देत होते, आणि काय आश्चर्य सांगावे ! उपचार सुरू केल्यापासून एक महिन्याच्या आत त्यांना बरे वाटू लागले. त्यानंतर पुन्हा पुन्हा दोन वेळा घसा तपासून एक्स–रे काढले परंतु जे काही त्यांच्या घशाला झाले होते ते श्रीसाईबाबांच्या कृपेने बरे झाले असा चांगला रिपोर्ट डॉक्टरांकडून मिळाला. डॉक्टरांनाही त्याबद्दल आश्चर्य वाटले होते.

श्रीबाबांच्या आशीर्वादाने त्यांचे कमी झालेले रक्त व वजनही वाढले आणि आता ते संपूर्णपणे बरे झाले आहेत. अशा रितीने श्रीसाईनाथ गुरूंनी आम्ही निष्ठेने त्यांच्यावर जो भार टाकला तो उचलला व श्री. गुर्तेना रोगमुक्त करून मला दिलासा दिला. माझ्या सौभाग्याची जपणूक केली. त्यांच्या या आजारात स्वतः श्री. गुर्ते यांनी पण संपूर्णपणे बाबांवर विश्वास ठेवला होता. ते म्हणायचे, "तू घाबरू नकोस. बाबा आपल्या पाठीशी उभे असताना भीती बाळगण्याची जरुर नाही."

अशी आहे श्रीसाईनाथ बाबांची अतर्क्य लीला! माझ्या जीवनात साईबाबां-बद्दल मला असे कित्येक आश्चर्यकारक अनुभव आले आहेत. बाबांवर पूर्ण श्रद्धा व अंगी सबुरी असली की आपल्यासारखी असहाय्य व क्षुद्र माणसे वाटेल त्या संकटातून मुक्त होऊ शकतात असा माझा दृढ विश्वास आहे.

## श्रीसाईंनी द्राक्ष दिले

-श्री. शेखर जोशी
पर्सोनेल ऑफिसर,
कामठी–कॉलरीज कामठी.

* सन १९३३ च्या मार्च महिन्यात होळीची मला सुटी होती व एकाएकी सकाळी ६–३० वाजता कामठीहून मुलाबाळांना व सौ. रोहिणीला घेऊन शिरडीला जाण्याचा मी बेत केला. मी सांगण्यापूर्वीच ते शक्य नाही असे सौ. म्हणाली. शक्य आहे. आपण आताच निघू असे म्हणून मी सकाळची साडेसातची बस पकडण्यास तयारी सुरू केली. सर्व सामान घेऊन बसस्टॉपवर आलो. कन्डक्टर व ड्रायव्हर हजर होते पण साडेसात पूर्वी बस सुटणार नाही असे निक्षून कन्डक्टर म्हणाला.

कामठी ते नागपूरमधील अंतर २७ किलोमिटर व त्यात एस. टी. चे चार स्टॉप. निदान एक तासतरी लागणार. महाराष्ट्र एक्सप्रेस आठ-पाचला सकाळी सुटते. काय करावे हा विचार मी करीतच होतो तेवढ्यात कन्डक्टर आला आणि म्हणाला चला. तेव्हा सात वाजून दहा मिनिटे झाली होती. मला त्याचे आश्चर्य वाटले कारण बसमध्ये माझे कुटुंब व इतर चार माणसेच होती. बस सुरू झाली व कुठेही

न थांबता ती रेल्वेस्टेशन समोर थांबली. तिथेही तिचा स्टॉप नव्हता. सामान सर्व उतरवून घेतल्यावर हमालाला मी म्हणालो की तू हे सर्व सामान महाराष्ट्र एक्सप्रेस मध्ये तावडतोब जाऊन ठेव व मुलांना सीट बसवून दे तोपर्यंत मी तिकीट काढतो. तेव्हा आठ वाजून पाच मिनिटे होऊन गेली होती व फलाट क्रमांक २ वर गाडी सुटण्याची शीटीही झाली होती.

ह्या सर्व गडबडीत मी हमालाला पुन्हा म्हणालो की गार्डला सांगणे की साहेब येत आहेत, थोडा वेळ गाडी थांबवा. माझ्या म्हणण्यावर सौ. उत्तरली की जशी महाराष्ट्र एक्सप्रेस तुमचीच आहे. सर्वांना पुढे घालवून मी तिकीट घेण्यास रांगेत उभा राहिलो. तिकीटे घेऊन गर्दीतून धावत फलाट क्रमांक २ गाठले.

आश्चर्य ! गार्ड माझ्या येण्याचीच वाट पहात होता. त्याने अंगुलीनिर्देश करून शेवटच्या डब्यात बसण्यास सांगून हात हलविण्यास सांगितले. आम्हाला फार आनंद वाटला की श्रीसाईबाबांनी हे सर्व घडवून आणले व कसल्याच प्रकारचा आम्हाला त्रास होऊ दिला नाही.

शिरडीहून परत येताना बसमध्ये माझ्या डोक्यावर कुणीतरी काहीतरी आपटले. शेजारी बसलेले गृहस्थही म्हणाले की काहीतरी डोक्यावर टप आवाज करून पडले. इकडे तिकडे पाहिल्यावर 'एक द्राक्ष' सौ. च्या साडीवर पडलेले आढळले. तिनेही सांगितले की साडीवर काहीतरी पडले असा तिला भास झाला. ते द्राक्ष कुणी फेकले ? हा प्रश्नच होता. गर्दी इतकी होती की ते द्राक्ष ठीक डोक्यावर पडणे शक्यच नव्हते. श्रीसाईबाबांनीच ते माझ्या डोक्यावर बसच्या टॉपमधून फेकले असावे हे निश्चित समजून आम्ही सर्वांनी तो प्रसाद मानून खाल्ला. ही घटना घडण्यापूर्वी मी हाच विचार करीत होतो की आपल्याला तर काही विशेष अनुभव आला नाही व लोक तर म्हणतात की आश्चर्यकारक घटना इथे घडतात. अर्थात हा अनुभव आल्यानंतर माझी श्रद्धा द्विगुणीत झाली. श्रीसाईनीच माझ्या विचारांना खरे करून दाखविले.

घरी परतल्यावर मातोश्रींना मी विभूती घ्यावयास सांगितले व तू आजारातून तीन दिवसात बरी होशीलच असे निक्षून सांगितले. तिने आधी श्रीसाईबाबा फकीर आहेत तेव्हा ही विभूती मी काही बाबा घेणार नाही व तू मला आग्रह करू नको असे ठामपणे मला बजावले. माझा हट्ट पाहून शेवटी तिने तीन दिवस पाण्यातून श्रीसाईबाबांची विभूती घेतली व चवथ्या दिवशी उठून स्वतः तिने स्वयंपाक केला.

किती आश्चर्याची ही गोष्ट होती. कारण एक महिन्यापासून ती आजारी होती व हिंडणे फिरणे पण बंद होते. हा सर्व श्रीसाईबाबांचा कृपाप्रसाद व त्यांची लीला. तेव्हापासून माझी आई श्रीसाईबाबांची भक्त झाली आहे व आक्टोबर १९७७ मध्ये शिरडीला श्रीसाईंचे दर्शन घेऊन आली सुद्धा.

# श्रीसाईंनी सर्टीफिकेट ठेवले ब्रीफ केसमध्ये !

● सन १९७५ मध्ये जानेवारीत मला हेडऑफिसकडून कळविण्यात आले की डिपार्टमेंटल प्रमोशन कमेटीसमोर सर्व शैक्षणिक व अनुभवांच्या दाखल्यासह मुलाखतीला हजर व्हावे.

कचेरीच्या कामात मी इतका गुंतलो होतो की मुलाखतीची तयारी करण्यास वेळच मिळाला नाही. एक दिवस आधी तयारी करण्याचा मी विचार केला व सकाळी सर्व शिफारसपत्रे व अनुभवांचे दाखले जमविण्यास बसलो. सौ. ही ह्या कामास हातभार लावण्यास शेजारी बसली. सर्व प्रशस्तीपत्रे तर मिळाली पण मुख्य नोकरी केल्याचे प्रशस्तीपत्र तर काही मिळेचना. ब्रीफ केस पूर्ण रिकामी केली व त्यात एक एक प्रशस्तीपत्रे ठेवल्याची नोंद कागदावर करायला सौ. ला म्हणालो. आठ चे साडे आठ वाजले. हे काम कसेही आज पूर्ण झालेच पाहिजे म्हणून मी त्या दिवशी संपूर्ण दिवसाची सुटी घेण्याचा अर्जही पाठवून दिला. सर्व ट्रंक्स रिकाम्या केल्या पण ते महत्त्वाचे जे. के. ग्रुपचे सर्टीफिकेट काही मला सापडलेच नाही. रात्रीचे अकरा वाजून गेले तरी ते सापडणे शक्य झाले नाही. सारखे शोधून शोधून मी थकलो व शेवटी विचार केला की जे काय होईल ते होईल. आता काय करणार !

पुन्हा एकदा ब्रीफ केसमध्ये न्यावयाची सर्व कागदपत्रें पडताळून पाहिली व मग मी निर्धास्त होऊन झोपलो. सकाळी ९ वाजता निघावयाचे आहे म्हणून सौ. ला सकाळी जरा लवकर भोजन करण्यास सांगितले.

सकाळी चहा पाणी आटोपल्यावर व सर्व तयारी केल्यानंतर मी ब्रीफ केस हाती घेतली व परत एकदा विचार आला की सर्व कागद इत्यादि आहेत काय

म्हणून पहावे. ब्रीफ केस उघडताच पहिलेच वरचे ठळक अक्षरातले जे. के. कंपनीचे सर्टीफिकेट पाहून मला इतके आश्चर्य वाटले की मी जोराने ओरडलोच. "अग, पाहिलंस का? हेच सर्टीफिकेट काल सकाळपासून तर रात्रीच्या अकरा वाजेपर्यंत आपण शोधत होतो व तेच कसे ह्या 'ब्रीफकेस' मध्ये वरच ठेवले आहे." ह्याच्याच करिता मी काल 'कॅज्युअल' सुटी घेतली.

सौ. ही आश्चर्याने त्या ब्रीफ केसमध्ये ठेवलेल्या सर्टीफिकेटकडे पहात राहिली कारण ब्रीफ केसमध्ये जी सर्टीफिकेटस् ती ठेवत होती ती सर्व आधी मी पडताळून पाहिलेली होती. दृष्टीभ्रम होण्यास मुळीच वाव नव्हता. सबंध दिवस त्यात गेला होता. श्रीसाईबाबांनीच ते सर्टीफिकेट ठेवले हे नक्कीच. श्रीसाईंची अनोळखी भक्तांवरही तशीच अशी माया व प्रेम पाहून मी धन्य झालो.

## ॥ साई तारी त्याला कोण मारी ॥

*******************************

— श्री. बी. एस्. जोशी
दि नागपूर जिल्हा मध्यवर्ति सहकारी
अधिकोष मर्यादित, सहकार मंदिर,
टिळक रोड, महाल, नागपूर ४४००२

● मी साईबाबांची मागील बरेच वर्षापासून भक्ती करीत आहे. विशेषतः माझे लग्नानंतर माझी पत्नी तथा माझी दोन लहान मुले यांनाही त्यांच्या भक्तीची गोडी लागली. जीवनात आजपावेतो मला बरेच लहान मोठे अनुभव आले परंतु काही अनुभव मनावर नेहमीसाठी आपली खूण कायम ठेवून जातात. त्यातलाच एक असा —

१) दिनांक **१५ ऑगस्ट १९७७** चा दिवस. त्या दिवशी धनवटे रंग मंदिरात लहान मुलांसाठी "माझा शनीयांचा राजा" हा बाल नाटकाचा दुपारी प्रयोग होता. मी माझी दोन लहान मुले व त्यांच्याच वयाची दोन त्यांचे सोबती असे आम्ही सर्व आयचीत मंदीर बसस्टॉपवर दुपारचा प्रयोग मिळावा म्हणून

घरून निघालो. वेळ बराच झाला होता व बसेसही त्या दिवशी लौकर न आल्याने, नाईलाजास्तव रिक्षा करून निघालो. आमचा रिक्षा श्री टॉकीज मागे टाकून पुढे जात होता आणि धनवटे रंग मंदिराच्या अलीकडे काहीशा अंतरावर; १५ ऑगस्टचा दिवस, वाहनांची व लोकांची गर्दी आणि संबंधित भाग म्हणजे विशेष गर्दीचा. अशा त्या वेळी, आमच्या रिक्षाला मागून येणाऱ्या धावत्या सिटी बसची जोरदार धडक बसून रिक्षाचे उजवीकडील चाक बसच्या डावीकडील शेवटच्या चाकात आल्याने, रिक्षाचे डावीकडील चाक वर जाऊन, उचलले गेले आणि असे काही घडता क्षणीच, समोर उभी असलेली ती लहान मुले त्या गर्दीत बाहेर फेकली जाऊन, त्यापैकी दोन लहान मुले बसच्या डावीकडील समोरच्या व मागील चाकांच्या मधे पडली बाकी दोघे धक्क्याने रिक्षाच्या सिटवर आदळून खाली पडली. फार मोठा आवाज झाल्याने, वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला. रिक्षाभोवती बघ्यांची एकदम गर्दी जमा झाली. बस जोरात असती, मागून एखादे वाहन आले असते अगर आमचाच रिक्षा बसबरोबर फरफटत गेला असता तर काय भीषण प्रसंग निर्माण झाला असता याचा वाचकांनीच विचार करावा. मी मात्र या आकस्मिक घटनेने भांबावून गेलो. माझे समोर एकदम अंधारी आल्याने, काय होत आहे, कसे होत आहे व हे घडले कसे याचा मला विचारच करता आला नाही. यामुळे ती पडलेली मुले जमलेल्या त्या गर्दीतून कोणी कशी बाहेर काढलीत त्यांची, ती सर्व एकदम रडू लागल्याने समजूत घालून बाजूला कोणी नेली याचा मला विचार करण्यास फुरसत मिळाली नाही. विशेष करून ती चाकाखाली आलेली दोन मुले माझ्या मुलांसोबत आलेली होती. अशाही परिस्थितीत मी साईबाबांचा धावा करीत होतो काही वेळाने लोकांनी मला धरून बाजूच्या दुकानात मुलांसहीत नेले. तेथे त्यांना पाणी पाजुन, झालेला प्रकार प्रत्यक्ष बघितलेल्या लोकांनी मला जेव्हा सांगितला व तुमचे व तुमच्या मुलांचे नशीब चांगले म्हणून ती मुले अशाही भीषण अपघातात कोठेही दुखापत न होता कशी वाचलीत याचे त्यांना व मलाही आश्चर्य वाटले. त्यावेळेस मी त्या साईबाबांचे मनःपूर्वक मनातल्या मनात आभार मानले. विशेषतः ज्या दुकानात मुलांसहीत मला नेण्यात आले, तेथेही माझे साई आपला आशिर्वादाचा डावा हात वर करून हसत आहेत असे मला दिसले. यामुळे माझा कंठ दाटून आला. यात त्यांचाही काही हेतू असावा व अशा जिवावरचा प्रसंग निर्माण करून त्यांना आपली प्रचीती दाखवावयाची असेल असे मला वाटते. त्यानंतर मी मुलांना धनवटे रंगमंदिरात बसवून पुन्हा अपघातस्थळी आलो. संबंधित रिक्षावाल्याचा शोध करून त्याची मेहनत दिली. एकंदरीने माझी साईबाबां-वरची दृढ श्रद्धा, जेथे जाशील तेथे मी तुझ्या पाठीशी आहे या त्यांच्या विश्वास-

पूर्वक जाणीवेने मी ती लहान मुले व रिक्षावाला बचावलो. वेळ आली होती परंतु काळ आला नव्हता असेच म्हणावे लागेल.

हा प्रसंग जेव्हा मुलांनी घरी सांगितला तेव्हा आम्ही या भीषण अपघातातून कोणतीही इजा न होता कसे सुखरुप पार पडलो हे ऐकून त्यांनाही नवल वाटले. मी मात्र ही सर्व माझे साईंचीच कृपा असे सांगितले.

त्या प्रित्यर्थ आम्ही पेढे वाटले हे सांगायला नकोच.

# बाबांनी पैसे परत दिले

★★★★★★★★★★★★★★★★★★★★

—सौ. प्रतिभा अशोक नागवेकर
वेस्ट क्वार्टर्स ए /५, वडाळा बस डेपोजवळ, वडाळा.

* गेल्या महिन्यात माझ्या वहिनीला काही स्टीलची भांडी खरेदी करायची होती म्हणून ती ग्रॅन्टरोडला गेली होती. पैसे ठेवलेली पर्स तिच्या हातातच होती. रस्त्याने जात असताना तिला अचानक कोणीतरी जोराचा धक्का दिला. या धक्क्याने तिच्या हातातील पर्स सुटून खाली पडणारच होती, पण तिने ती लगेच सावरली, व ती तशीच पुढे चालू लागली. इतक्यात "अहो बाई तुमचे पैसे पडले ते घ्या" असे म्हणत एक वृद्ध गृहस्थ पाठीमागून हाका मारीत आला. त्याच्या हातात तिच्या पर्स-मधले दिडशे रुपये आणि त्याबरोबरच साईभक्त श्री. कोरगांवकर यांनी तिला दिलेले एक साईबाबांचे नाणेही होते.

त्यावेळी माझ्या वहिनीच्या लक्षात आले की तिच्या पर्सची चेन उघडली गेली होती. कोणीतरी चोरीच्या उद्देशाने किंवा चुकून लागलेल्या धक्क्याने चेन उघडली गेली होती व पैसे रस्त्यावर पडले होते. माझ्या वहिनीने त्या वृद्धाकडून पैसे मोजून घेतले व घाई असल्यामुळे आभार न मानताच ती पुढे निघाली. काही पावले पुढे गेल्यावर तिच्या हे लक्षात आले. आजकाल असे अनायासे मिळालेले दिडशे रुपये कोणी परत करण्याचा प्रामाणिकपणा दाखवील का? आणि इतर कोणास पैसे न मिळता नेमके त्या वृद्ध गृहस्थासच पैसे कसे मिळाले?

त्या रुपयाबरोबर साईबाबांचे नाणेही त्याने परत केले. माझी वहिनी परत मागे फिरली व ती त्या वृद्ध गृहस्थाचा शोध घेऊ लागली; पण तो वृद्ध कोठे नाहीसा झाला कोणास ठाऊक! त्यामुळे माझ्या वहिनीला फार वाईट वाटले. कारण तिला त्याचे आभार मानायचे होते आणि दहा रुपये बक्षिसही द्यावयाचे होते.

माझी वहिनी सौ. वर्षा गोकुळदास शिरोडकर ही साईबाबांची भक्त आहे. त्यामुळे तिचा असा विश्वास आहे की हे पैसे साईबाबांनीच परत आणून दिले.

# आमची काशी-शिर्डी पायी यात्रा

************************************

—स्वामी संजयानंद
गरखल, हिमालय

* १९७० सालची गोष्ट. मी लहानपणापासूनच बाबांना मानीत असल्यामुळे जे काही कार्य करावयाचे ते बाबांना विचारून करायचे व बाबा प्रेरणा देतील तसे करायचे. १९७० साली बाबांनी दृष्टांत दिला की, "तुम्ही दोघे काशीहून शिर्डीला माझ्याकडे पायी या." पायी यात्रेत बाबांनी काही अटी घातल्या, की पैशाला शिवायचे नाही. हॉटेलात खायचे नाही व कुणाजवळ मागायचे नाही. अशा परिस्थितीत आम्ही पती-पत्नीने शिर्डी यात्रा केली.

फेब्रुवारी महिन्यात आम्हाला पायी यात्रेत चाळीस गावाजवळ हिरापूर रेल्वे स्टेशन लागले. तेथे संध्याकाळ झाल्यामुळे हिरापूर गावातील शिव मंदिरात मुक्काम केला. हिरापूर गावी आम्ही रविवारी पोहोचलो. रात्री मंदिरात भजन वगैरे केले. दुसऱ्या दिवशी सोमवार होता. सोमवारी सकाळी आम्ही आमच्या पुढच्या प्रवासास निघालो. गावातील चार पाच पुरुष व शिव मंदिरातील पुजारी आम्हाला गावच्या वेशीपर्यंत पोहोचविण्यास आले. बोलता बोलता विषय निघाला म्हणून, शिव मंदिरातील पुजारी आम्हाला म्हणाले, महाराज आज सोमवार आहे व येथूनच जवळच वालेगावचा "मोठा महादेव" म्हणून एका डोंगरावर शिवाजीचे "स्वयंभू लिंग" मंदिर आहे. आज तेथे उत्सव असून ह्या उत्सवाचा प्रसाद प्राप्त करणे जरुरी आहे व सोमवारचे पर्व पण आहे. आपण तेथे जाऊन दर्शन व प्रसाद

अवश्य घ्यावा. आम्ही पण विचार केला की अचानक एक "तीर्थ" होत आहे तर ते का सोडावे ? त्या लोकांचा निरोप घेऊन आम्ही महादेव डोंगरावर जाण्याचा रस्ता पकडला.

चालता चालता आम्हाला महादेव डोंगर पायथ्याशी 'जुने पाणी' नावाच्या एका लहानशा खेड्यात सायंकाळ झाली. तेथील लोकांनी आम्हांला चहा वगैरे पाजला व विचारपूस केली. त्यानंतर ते आम्हाला म्हणाले की आज तुम्ही मंदिरात पोहोचू शकत नाही. कारण पायवाट व जंगल डोंगर भाग असल्यामुळे जंगलात श्वापदे पण आहेत.

पायी यात्रेत आमचे वय २०–२२ वर्षांचे होते. वय लहान असल्या कारणाने डोंगरात घाबरणे शक्य होते. त्या लोकांचे सांगणे न ऐकता आम्ही बाबांच्यावर विश्वास ठेवून डोंगर चढावयास सुरुवात केली. "सोमवार व सोमवारचा प्रसाद, उत्सव आणि प्रसादाचे महत्त्व ह्या गोष्टी हिरापूरच्या लोकांनी आमच्या डोक्यात भरवल्या होत्या त्यामुळे आमचे पाय मंदिराच्या दिशेने जाऊ लागले.

डोंगर चढता चढता अचानक समोरून दोन तेजस्वी पुरुष आमच्या समोर उभे राहिले व ते आम्हाला न्याहाळत म्हणाले की, तुम्ही या जंगलात कोठे जाणार ? आम्ही उत्तर दिले की आज मोठ्या महादेवाचा उत्सव आहे, व त्याचा प्रसाद घ्यावयास जात आहे. यावर ते म्हणाले की तुम्हाला मंदिराचा रस्ता माहित नाही. ह्या पायवाटेवर आमच्या पावलांच्या खुणा आहेत. त्या खुणांच्या रोखाने तुम्ही जा म्हणजे मंदिरात पोहोचाल. असे सांगून ते जाण्यास वळले. काही अंतर चालून गेल्यावर आमच्या डोक्यात अचानक बाबांच्याविषयी शंका निर्माण झाली की "बाबा तर नाही" ? आणि आम्ही मागे पाहिले तर ते दोघेही अदृश्य झाले. आम्ही समजलो की बाबा आम्हाला मार्गदर्शन करावयास आले होते. आम्ही मग त्या आनंदात पुढील मार्ग चालावयास सुरुवात केली. सूर्य मावळला होता. संध्या प्रकाश पडला होता. मंदिर उंच डोंगरावर असल्या-कारणाने चारी बाजूनी दिसत होते. आम्ही चालून चालून थकल्यामुळे मंदिर केव्हा येते असे आम्हाला झाले होते. पण मंदिराकडे नजर केली तर ते जास्तच दूर भासत होते. आज आम्ही मंदिरात पोहोचत नाही व आपल्याला आज प्रसाद पण मिळत नाही म्हणून दुःख झाले.

जुने पाणी खेड्यातून निघताना त्या खेड्यातील लोक आम्हाला म्हणाले की, महाराज तुम्हाला जंगलात पाणीसुद्धा मिळणार नाही. परंतु आम्हाला थोडे चालून

शेजाऱ्यावर पाण्याचे निर्मळ कुंड दिसले, आम्ही विचार केला लोक म्हणाले की, तुम्हाला पाणीदेखील मिळणार नाही, मग हे कुंड आले कोठून ? बाबांचीच लीला समजून आम्ही हातातील सामान खाली ठेवले व पाणी पिऊन खाली बसलो. नंतर आम्ही सभोवार नजर फिरविली तर अंधार पडला होता व रातकिड्यांची किर्रकिर्र चालू झाली होती. आम्ही मनातून थोडे घाबरलो. जंगलात आम्ही दोघे एकटेच होतो. जंगली श्वापदे व चोर डाकू यांची भीती मनात घर करू लागली. परंतु बाबांचा आशिर्वाद पाठीशी असल्यामुळे थोडा धीर आला. रात्र कोठे व कशी काढावी याचा विचार करू लागलो. मी झाडावर चढून दूरपर्यंत पाहिले की, गाव किंवा वस्ती दिसते आहे का ! परंतु निराशा पदरी पडली. जास्त वेळ जंगलात थांबून उपयोगी नाही म्हणून आम्ही चालावयास उठलो. बाबांच्या पायाची खूण पाहू लागलो. परंतु काय आश्चर्य जिकडे तिकडे पायवाटा व पावलांच्या खुणा आम्हाला दिसल्या. आम्ही बुचकळ्यात पडलो. आता काय करावे हा विचार आम्हाला पडला. तेवढ्यात बाबांनी प्रेरणा दिली, म्हणून मी पत्नीला म्हणालो की डोळे मिटून ज्या वाटेवर पाय पडेल ती वाट पकडून जाऊ व आम्ही साईराम म्हणून तसेच केले, व मार्गी लागलो. थोडे अंतर चालून गेल्यावर आमच्या कानी घंटानाद ऐकू आला. आम्ही समजलो की गाई गुरे रानात चरावयास आली असतील व रात्र झाली म्हणून परत घरी जात असतील व त्यांच्या बरोबर गुराखी पण असेल. त्या गुराख्याबरोबर गावात जाऊ. परंतु आम्ही पाहिले की गाईंच्या पाठीमागे गुराखी नव्हता, व त्या सर्व गाई एकाच रंगाच्या होत्या. लहान लहान वासरेदेखील फारच सुंदर होती. गाई एका झाडाखाली उभ्या होत्या, व आमच्या वाटेकडे पहात होत्या. आम्ही जसे गाईंच्या जवळ पोहोचलो तो त्यांचे सौंदर्य पाहून आम्हाला ग्रंथात वाचलेल्या श्रीकृष्ण भगवानाच्या गाईंचे वर्णन आठवले. गाईंच्या डोळ्यात आमच्याविषयी प्रेम व वात्सल्य झळकत होते. आम्ही त्यांच्या जवळ आल्याबरोबर गाई व ती लहान वासरे चालू लागली. आम्ही देखील मोहिनी घातल्याप्रमाणे त्यांच्यामागे जाऊ लागलो. मार्ग नीट दिसत नसल्यामुळे आम्ही थोडे थांबलो तर त्या गाई देखील थांबत होत्या. थोड्या वेळाने आम्हाला डोंगर उतारावर चाळीस पन्नास घरांचे खेडे दिसले, व गाई त्याक्षणी आम्हाला दिसल्या नाहीत. व घंटानाद पण बंद झाला. आम्ही गावात प्रवेश केल्याबरोबर गावातील लोकांनी आम्हाला पाहिले, व आमची विचारपूस करू लागले. आम्ही गावाचे नाव विचारले तर गावकरी म्हणाले "गुजरदरी" गावकऱ्यांनी आमचा आदर सत्कार केला. आमच्या जेवणाची सोय पोलीसपाटीलांनी आपल्या घरी केली. आम्ही जेवावयास बसलो, त्यावेळी रात्रीचे आठ साडेआठ वाजले

असतील. आमच्या मनात एकच खंत होती की आजचा महादेवचा प्रसाद आपल्याला मिळणार नाही. मनाला फार दुःख झाले. दुःखी मनाने आम्ही जेवावयास बसलो. गावकरी आमच्या अवती भोवती बसले होते. जेवणास सुरवात केली असेल, इतक्यात बाहेरून पोलीसपाटीलांचे नावाने एका अनोळखी माणसाने हाक मारली, व राम राम करून घरात प्रवेश केला. आम्ही त्याच्याकडे पहात होतो. तोच तो माणूस म्हणाला की तुमच्याकडे जे पती-पत्नी यात्रेकरू आले आहेत त्यांच्यासाठी शिव मंदिरातील जनार्दन स्वामींनी उत्सवाचा प्रसाद पाठविला आहे, तो मी आणला आहे. हे शब्द ऐकताच आम्हाला फार आनंद झाला व आम्ही बाबांचे धन्यवाद मानले. बाबांच्याच कृपेने आम्हाला प्रसाद मिळाला. बाबांना आमची किती काळजी आहे. हा विचार येताच आमचे डोळे पाण्याने भरून आले. आम्ही आनंदाने जेवण केले. जेवणानंतर रात्री एक वाजेपर्यंत आम्ही भजन व सत्संग केला. सकाळी उठून महादेव मंदिरात जायला निघालो. पोलीस पाटलांनी आमच्याबरोबर गावातील एक माणूस पण दिला. ज्यावेळी आम्ही मंदिरात पोहोचलो तेव्हा तेथे खूप गर्दी होती. तेथील एक संत आम्हाला भेटले. आम्ही जनार्दन स्वामींच्याविषयी त्यांच्या जवळ चौकशी केली. तर ते म्हणाले की जनार्दन स्वामी येथे रहात नाहीत. ते तर नाशिक त्र्यंबकेश्वरला असतात या वर्षी ते इकडे आले नाहीत. आम्ही त्यांना प्रसादाची गोष्ट सांगितली तर ते सुद्धा आश्चर्यचकीत झाले. आम्ही त्यांना सांगितले की तो प्रसाद आणणारा माणूस कोण होता ? तर ते म्हणाले की आम्ही कुठल्याही माणसाला गुजर दरी गावात प्रसाद देऊन पाठविले नाही. आता तर आम्ही जास्तच आश्चर्यचकीत झालो. आमच्या लक्षात आले की स्वतः बाबाच माणसाचे रुप घेऊन आम्हाला प्रसाद देण्यासाठी आले होते. बाबांची आमच्यावर केवढी ही कृपा !

असे अनेक अनुभव बाबांचे आम्हाला आले. परंतु आम्ही कधी कुणाला सांगत नाही, बाबांची इच्छा दिसली म्हणून हा अनुभव पाठवित आहे. हिरापूर ते मोठा महादेवच्या पायी यात्रेत बाबांनी तीन वेळा दर्शन दिले. हा अनुभव सर्वांच्या समोर ठेवावा म्हणून लिहिला.

# बाबांना हाक

—सौ. सुलभा दि. ऋषी
डी. ३, ए. डी. एम. कॉलनी, हिंडालको,
रेणूकुट, मिर्झापूर (यू. पी.)

● "बाबा मी दिवसातून तुम्हाला कितीतरी वेळा हाक मारते? किती त्रास देते आपल्या स्वार्थासाठी."

असा वारंवार माझ्या मनात विचार येतो. परंतु ह्या संसाररूपी चक्रात अडकल्यावर त्यातून डोके वर काढून पुढचा मार्ग शांतीने काढण्यासाठी, बाबांच्या लेकराने बाबांना हाक मारू नये तर काय करावे! मग ते लेकरू अन्यायी, मूर्ख, पापी कसेही असले तरी बाबांचे आहे. बाबामय आहे.

एकदा असेच आमच्येकडे आजारपण सारखे चालू होते. तब्बल बावीस वर्षात कधी न आजारी पडणारे माझे यजमान ह्या वर्षात तीनदा आजारी झाले. एकदा तर ताप बराच चढला होता व डॉक्टरांनी निदान केले की लक्षणे टायफाइडची आहेत. मी मनात म्हटले बाबा ताप कितीही वाढला असला तरी तो हल्का करणे तुमच्या हाती आहे म्हणून 'साई राम' म्हणत म्हणत मी ह्यांच्या पूर्ण अंगास विभूति लावली व पूज्य बाबांना ह्यांच्या डोक्यावर हात ठेवण्यासाठी उशाशी आणून बसविले. माझ्या माऊलीने चोवीस तासात ताप नॉर्मलला आणला. आमच्या दोघांच्याही डोळ्यात प्रेमाश्रू तरळले. असेच ह्या पूर्वीची दोन्ही दुखणी पूज्य बाबांनी हल्की केली होती.

आजकाल माझा धाकटा मुलगा अशक्तपणामुळे म्हणा किंवा अभ्यासाच्या श्रमामुळे म्हणा सारखा आजारी पडतो. माझे एकमेव आधार बाबा. मी त्यांचे स्मरण करीत असते. परंतु बाबा मी महामूर्ख चंचल वृत्तीची आहे. कधी कधी मन फार घाबरते व शेवटी तुमच्या चरणाशी विसावते. मला विश्वास आहे की माझी माऊली माझे बाबा छोट्या मुलाला लवकरच चांगला सशक्त करतील व असेच आपल्या भक्तांच्या हाकेसरशी साईमाऊली दुधाची वाटी घेऊन मागे उभी राहील!

# वर चढशील तर खबरदार !

• इ. स. १९७७ च्या शेवटच्या महिन्यातील गोष्ट आहे. शुक्रवारचा दिवस होता. त्या रात्री सात वाजताची गोष्ट. आमच्या कॉलनीत लग्न होते म्हणून आम्ही तिकडे गेलो होतो. आमची गल्ली सामसूम होती. फक्त माझा अकरा वर्षाचा नोकर व धाकटा आठ वर्षाचा मुलगा ( त्याची प्रकृती थोडी बरी नसल्यान ) घरी होता.

आमची कॉलनी तशी फारच सुरक्षित आहे. तरी पण आम्ही गेल्यावर नेहमी-प्रमाणे नोकराने पुढील दोन्ही दारे व मागचे स्वयंपाक घराचे दार आतून बंद करून घेतले. विघ्न म्हणतात ना आपोआप ओढवते. तिकडे वरात आली व इकडे तीन दांडगे चोर, त्यातील दोन दाढी वाढलेले व लोंड बांधलेले चोर आमच्या मागील न्हाणीच्याजवळील आंब्याच्या झाडावर बसले. नोकर जेवण केल्यावर दार उघडून आपली ताटवाटी घासण्यास बाहेर मोरीवर गेला, आणि तेवढ्यात त्याला दोन्ही चोरांनी घेरले व तिसरा बागेतील मागील दाराजवळ राखण करीत उभा राहिला. नोकर 'चोर' 'चोर' म्हणून ओरडू लागला तर त्यास धमकी दिली व दोन धपाटे पण दिले आणि स्वयंपाक घराच्या दाराकडे ते वळले.

तेवढ्यात बाबांनी त्या अजाण मुलास धैर्य दिले. कोठून त्याला शक्तिसंचार झाला कोण जाणे ? तो धावत आला व चोरांना धक्का देऊन पटकन आत शिरला आणि दार आतून बंद करून टाकले.

नंतर माझा चिमुकला नोकर व तो शूर मुलगा पुढची खिडकी उघडून घाबऱ्या घाबऱ्या 'चोर चोर' ओरडू लागले. चोरांना काही न सुचून फक्त त्याच्या हातातील जेवणाची ताटवाटी भांडे घेऊन पलायन केले.

जर ते चोर आत आले असते तर, बहुमूल्य सामानापेक्षा, हृदयाच्या ह्या दोन तुकड्यांचे काय झाले असते, याचा विचार करणेच नको. परंतु आत बाबा सर्वांचे रक्षण करीत बसले होते, त्यांच्या लेकरांची व त्यांच्या भक्तांची तर त्यांना काळजी होतीच मग ते चोराना घराचा उंबरठा कसा ओलांडू देतील ? " वर चढशील तर खबरदार, चल खाली उतर ' हे पूज्य बाबांचे सर्पाच्या विखारास म्हटलेले शब्द आठवतात. ते जसे जीवावरचे संकट बाबांनी दूर केले तसेच चोराना स्वयंपाकघराची पायरी चढू न देता छोट्याश्या नोकराच्या भीतीने त्यांनी मागच्या मागे पलायन केले

हे खरोखर आश्चर्यकारक नाही का? परंतु साई माऊलीने आमच्या वरील विघ्नरूपी विकरास नष्टून टाकले.

अशा माझ्या साईनाथाला आमचा सर्वांचा शतशः शतशः प्रणाम!

# साईबाबा धाव घेती भक्तांसाठी

–श्री. वी. वाय. मुणगेकर (नकलाकार)
सनशाईन हौसिंग सोसायटी, ए–१२, सुभाष लेन,
दफ्तरी मार्ग, मालाड (पूर्व)

※ काही वर्षांपूर्वीची गोष्ट. आम्ही ताडदेवला रहात होतो त्यावेळचा तो प्रसंग! अजुनही आठवण झाली की भयाने अंगावर शहारे येतात.

माझी मुलगी चि. मंगल आता चि. सौ. सुनिता नागवेकर ही जवळ जवळ १२–१३ वर्षांची होती. एके दिवशी संध्याकाळी ती मैत्रिणीकडे जाऊन आली आणि एकाएकी कोणीतरी अंगात येते तसे विचित्र हातवारे करीत व डोळे मोठे करून कानडी, मल्याळी सारख्या भाषेत दात ओठ चावत शिव्या देतात तशी रागा-रागाने बडबड करू लागली. या ध्यानीमनी नसलेल्या प्रसंगाने आम्ही सर्वजण घाबरून गेलो. काय करावे, कुणाचा सल्ला घ्यावा काहीच सुचेना. भूत पिशाच्चावर तर माझा मुळीच विश्वास नव्हता. आम्ही देवाचे मोठमोठ्याने नाव घेत धावा करू लागलो. देवाचे नाव घेऊन तिच्याकडे पेटलेली उदबत्ती घेऊन जाताच ती जी काही चवताळली, ती ४–५ माणसांनासुद्धा आवरेना व तिचे ओरडणे ऐकून खोलीबाहेर बघ्यांची गर्दी झाली.

शेवटी डॉक्टरी उपाय करून पहावा म्हणून डॉक्टरना आणले. त्यांना पाहताच्च ती बेफाम झाली व दातओठ चावत पुन्हा मल्याळी भाषेसारख्या भाषेत विचित्र हातवारे करीत भांडतात त्याप्रमाणे डॉक्टरवर ओरडू लागली, व एक मोठ्याने भयंकर किंकाळी मारून बेशुद्ध पडली. डॉक्टरांचाही भुताने झपाटणे वगैरे गोष्टीवर माझ्याप्रमाणे विश्वास नव्हता. थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर जसं काही काहीच झालं नाही,

अशा स्थितीत थंडपणे तिने पिण्यासाठी पाणी मागून घेतले. पाण्याचा घोट तोंडात घेताच शीः करून पाणी चूळ भरतात त्याप्रमाणे जोराने थुंकून टाकले व पाण्याचे भांडे फेकून पुन्हा मोठमोठ्याने ओरडू लागली. लहानपणापासून ती डॉक्टरांची लाडकी असल्यामुळे त्यांनी तिला नेहमीप्रमाणे 'मंगलबाळ, तुला काय होतंय मला सांग.' असे म्हणताच डॉक्टरवर ती चिडून पुन्हा मल्याळी भाषेत ओरडू लागली. डॉक्टरही अवाक् होऊन तिच्याकडे बघत राहिले, कारण त्या स्थितीत तिचा संपूर्ण चेहरा बदलून ती मोठ्या डोळयांनी उग्र दिसू लागली. तिच्या पोटात पाणीसुद्धा टिकेना. म्हणून डॉ. नी ग्लुकोजचे इंजक्शन द्यायचा प्रयत्न केला. तेव्हा ती एकदम चवताळून डॉक्टरचा हात हिसडून टाकायला लागली. शेवटी आमच्या आईने, भावांनी वगैरे चार पाच माणसानी घट्ट धरल्यावर डॉक्टरनी तिला प्रथम ग्लुकोजच्या ऐवजी झोपेचे इंजेक्शन दिले. व म्हणाले आता तिला झोप लागली की बरं वाटेल. मग संध्याकाळी आपण तिला ग्लुकोजचे इंजेक्शन देऊ या. डॉक्टरनी सांगितल्या प्रमाणे तिला झोप तर लागली नाहीच, पण थोडावेळ निपचीत पडल्यावर पुन्हा मोठमोठ्याने बडबडायला सुरुवात केली. असा प्रसंग आजवर कुठेच पाहिला नव्हता. माझे उपनगरात रहात असलेले भाऊ वगैरे सर्व मंडळी येऊन रात्रंदिवस देवाचा धावा करीत व स्तोत्र म्हणत तिच्यावर पाळी पाळीने जागून पहारा करत होती, कारण ती स्वतःच्या हाताने आपला गळा दाबायची व उघड्या खिडकीकडे जाऊन उडी टाकायला बघायची. तोंडाने मराठीत मी येते येते, सोडा मला जाऊ द्या अशी ओरडायची. आमची तर भीतीने अगदी गाळण उडाली. जेवण तर तिचे सुटले. पण पाणीसुद्धा तिच्या पोटात ठरेना. शुद्धीत पाच मिनिटे असल्यावेळी नीट बोलायची व मग एकदम घाबरून, तो पहा मला बोलावतो आहे. तो पहा खिडकीत आला, आला. असं मराठीत म्हणून मोठ्याने किंकाळी मारायची नी बेशुद्ध पडायची. ती किंकाळी ऐकून तळमजल्यावरची मंडळी काय झालं म्हणून पहायला वर यायची. कारण आम्ही तिसऱ्या मजल्यावर रहात होतो. असे आठ दहा दिवस गेल्यानंतर आमच्या बिल्डिंगमध्ये हाजीमलंग बाबांचे भक्त असलेले एक गृहस्थ येऊन त्यांनी मुलीला चार पाच दिवस मंत्राचे पाणी मारून व इतर देवस्कीचे जालीम विधी करून तिच्यावरचे ते पिशाच्च उतरवलं मग ती बरी झाली.

काही दिवसानंतर म्हणजे १९६९ साली आम्ही मालाडला रहायला आलो. कारण त्या प्रसंगापासून आम्हाला त्या खोलीत उदास व बेचैन वाटू लागले. मालाडला या नव्या जागेत आल्यानंतर तिसऱ्या की चौथ्या आठवड्यात ती पुन्हा तशीच किंकाळी मारून बेशुद्ध पडू लागली व चेहरा एकदम भयंकर दिसू लागला. यावेळी

मात्र ती बडबडत नव्हती. फक्त डोळे वटारून बघायची. आम्ही तर पुन्हा घाबरून गेलो, कारण या भागात आम्ही नवीनच असल्यामुळे आमच्या विशेष ओळखी नव्हत्या, त्यामुळे धीर द्यायला किंवा उपाय सुचवायला कोणीच नव्हतं, यामुळे काय करावे ते आम्हाला कोणालाच सुचेना. शेवटी देवाच्या खोलीत असलेला, साईबाबांचा आशिर्वाद देत असलेला फोटो पाहून धीर आला. तो बाबांचा फोटो तिच्या उशीकडील वरच्या बाजूस ठेवून अगदी आकांताने रडकुंडीस येऊन मी बाबांचा धावा केला व म्हणालो, बाबा तुमच्याशिवाय या माझ्या संकटाला कोण धावणार ! तुम्हीच तिच्या अंगावर कोण असेल त्याचा बंदोबस्त करा आणि आमची या त्रासातून सुटका करा. ती बेशुद्ध असताना मी साईबाबांची उदी तिच्या गळयाला व डोक्याला लावली. काही वेळाने ती शुद्धीवर आली व काय आश्चर्य झोपून उठतात त्याप्रमाणे ती सहजपणे उठली, व नेहमीप्रमाणे बोलू चालू लागली. नंतर उशाशी ठेवलेला साईबाबांचा फोटो पाहून ती म्हणाली, आबासाहेब देवाच्या खोलीत ठेवलेला साईबाबांचा हा फोटो माझ्या उशाशी कोणी ठेवला ? तर मी सांगितलं तुला बरं वाटत नव्हतं म्हणून मी ठेवला. तिने भक्तिभावाने पूज्य बाबांना नमस्कार केला कारण ती बाबांची भक्त होती. अशा रीतीने बाबांच्या कृपेने मी त्या संकटातून सुटलो. सांगायचे म्हणजे ज्यांची बाबांवर श्रद्धा त्यांचे पाठीराखे आमचे पूज्य साईबाबाच.

अशा रीतीने बाबांच्या कृपेने ती पूर्ण बरी झाल्यानंतर तिने साईबाबांची पोथी वाचायला सुरुवात केली व पोथी वाचून संपायच्या म्हणजे उद्यापनाच्या दिवशी तिला पोथीत विभूति सापडली. या दिवसापासून बाबांच्या चमत्काराविषयी माझा संशय नाहीसा झाला व पूर्णपणे मनाच्या संशयाचे निरसन झाले आणि आता मन अगदी साईबाबांविषयींच्या पूज्य भावनांनी भारून गेलं. त्यानंतर तिच्या लग्नाची काळजी होती. पण बाबांवर भार टाकल्यावर काळजी दूर झाली. त्याचं असं झालं. मी एकदा माझे मित्र नारवेकर यांच्या मुलासाठी त्यांना माझ्या नात्यातील मुलीविषयी विचारायला गेलो असताना त्यांनी स्वतःच माझ्या मुलीला मागणी घातली म्हणजे ती के. जी. शाळेत शिक्षिका होती. त्यानंतर एका सुमुहूर्तावर त्यांच्या मुलाबरोबर लग्न होऊन पती-पत्नी पूर्ण सुखात आहेत याला कारण तिची साईभक्ती व आमची बाबांच्या ठिकाणी आता दृढ झालेली श्रद्धा.

# बाबांची अगाध किमया

— सौ. सुमित्रा मधुकर पाटणकर,
३४/९२१, नेहरू नगर मुंबई २४.

* बाबा कसे, केव्हा आणि कोणत्या रूपाने भेटतील हे साईभक्तांना सांगायलाच नको. बाबांच्या भक्तांना आणखी नवीन अनुभव काय सांगावे, तरीहि मी माझा अनुभव साईभक्तांपुढे सादर करीत आहे—

रविवार तारीख १३–११–७७ ची गोष्ट. दिवाळीचे दिवस होते. मुलांना सर्कस दाखवावयाची होती. अचानक आमचं ६ ते ९ या खेळाला जायचे ठरले. आम्ही घरातून जवळ जवळ पावणेपाचला निघालो व कुर्ला स्टेशनात आलो, तेवढयात एक फास्ट गाडी आली ती धावत जाऊन पकडली. पण पुढे ती इतकी हळूहळू चालली होती की, आम्ही ५ वाजून २० मिनिटांनी बोरीबंदर स्थानकावर उतरलो. तिथून क्रॉस मैदानावर जाईपर्यंत जवळ जवळ ५–४५ होत आले होते. तिथे पोहोचताच लांब लांब रांगा बघूनच 'हे' म्हणाले परत जाऊ या, आपल्याला काही तिकिटे मिळणार नाहीत असे म्हणू लागले. पण मी म्हटले रांगेत उभे राहून पाहु या नाहीच मिळाली तिकिटे तर परत जाऊ, म्हणून मी स्त्रियांसाठी असलेल्या वेगळ्या रांगेत उभी राहिले. माझा नंबर ३५ ते ४० वा होता. खेळ सुरू होण्याची वेळ जवळ आली होती. मी रांगेत उभी होते तरीहि माझ्या ओठात ते गाणं मी गुणगुणत होते, "दिपावली मनाये सुहानी मेरे साईके हाथमें जादूका पानी" मी उभी होते त्या रांगेत वेगवेगळ्या जातीच्या बायकाही होत्या. थोड्याच वेळाने एक माणूस (जातीने भय्या होता तो) माझ्याजवळ आला व म्हणाला, आपको चार तिकिट चाहिये ना? मेरे पास चार है। मैंने और मेरे औरतने भी तिकिट निकाला है इसलिये डबल हो गया। मी लगेच 'ह्यांना' विचारले. त्यांनी ती वेऊन निरखून पाहिली व आम्ही पैसे देऊन ती चार तिकिटे घेतली. मला ह्याचेच आश्चर्य वाटले की, माझ्या मागे व पुढे त्याच्या जातवाल्या किती तरी बायका त्या रांगेत उभ्या होत्या. मग त्याने त्यांना न विचारता मलाच तिकिटे पाहिजेत का असे विचारले, म्हणजे बाबाच त्याला सांगत होते की "जा लवकर तेथे माझी मुलगी रांगेत उभी आहे तिला ती चार तिकिटे नेऊन दे" कारण भक्तांची काळजी परमेश्वर करणार नाही तर कोण करणार? मी ह्यांना म्हटले की, बाबांची कृपा म्हणून आपल्याला पटकन् तिकीटे मिळाली. आम्ही थोड्या वेळाने तंबूत शिरलो नसतो तर मात्र आम्हाला बसायला

जागाच मिळाली नसती कारण तिथे तिकीटे कितीही दिली जात होती पण जागांचे नंबर मात्र नव्हते. अशा वेळीही माझी साईमाऊली माझ्या मदतीला धावून आली त्याचे मला राहून राहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. बाबांची भक्ति केली तर अशक्य कोटीतील गोष्टसुध्दा शक्य होते. ह्याचा पुरावा प्रत्यक्षात साईभक्तांना आलेलाच असेल. ह्यापेक्षा मी जास्त काय सांगावे.

अशा या माझ्या साईमाऊलीला कोटी कोटी प्रणाम।

**बाबा काय वर्णू तुमची गाथा**
**तुमच्या चरणी ठेविते मी माथा।**

# श्रीसाईबाबांची कृपा

–श्री. एम्. व्ही. लिंबाळे, बी. ए.
काळलिंबाळ, ता. उमरगा

● मी १५ वर्षापासून साईबाबांची भक्ती करतो. मी १९७५ सा. मे महिन्यात शिरडीला गेलो होतो. शिरडीस एक दिवस मुक्काम करून दुसरे दिवशी सकाळी आम्ही नाशिक-सोलापूर गाडीने सोलापुरला जाण्यासाठी बस स्थानकावर आलो. कंट्रोलरकडे चौकशी केल्यानंतर नाशिक-सोलापूर गाडी बिघडल्यामुळे वेळेवर येणार नाही असे समजले म्हणून आम्ही नगर गाडीने नगरपर्यंत जाण्याचे ठरविले व ११ वाजता नगरला येऊन पोहोचलो. जेवण आटोपून ३ वाजेपर्यंत गाडीची वाट पाहिली पण गाडी काही आली नाही. त्याचवेळी नगरचे एक मारवाडी गृहस्थ आपल्या मुलीला सोलापूरला पाठविण्यासाठी स्टँडवर आले होते. त्या बाईबरोबर दोन वर्षांचे एक मूल व सामानाची पेटी होती. सोलापूरला जावयाचे असल्यामुळे व तिच्याबरोबर कोणी पुरुष नसल्यामुळे तिला आमचा फार मोठा आधार वाटला. थोड्या उशीराने का होईना सोलापूर गाडी येईल या आशेने आम्ही करमाळ्यापर्यंत जाण्याचे ठरविले व संध्याकाळी ८ वाजता करमाळा बस स्टँडवर येऊन पोहचलो. त्या ठिकाणी बस स्टँडमध्ये १०–१५ माणसे झोपलेली होती. बसस्टँडवर माझी पत्नी व मुलगी व आमच्याबरोबर आलेली मारवाड्याची स्त्री तिच्या अंगावर २५–३० तोळे सोने होते. इतकेजण बसलो होतो. स्टँडवर ५–६ अनोळखी होते त्यांच्याकडे पाहिले असता ते

सद्गृहस्थ नाहीत असे कोणालाही वाटले असते. ते फिरत होते. त्यांची नजर सारखी आमच्या दोन स्त्रियांकडे लागली होती. त्यामुळे माझ्या मनात भीती निर्माण झाली. रात्री या ठिकाणी राहणे धोक्याचे आहे असे वाटू लागले. पण कोठे जावे हा मोठा प्रश्न होता. मी साईबाबांचा धावा करू लागलो. कंट्रोलरकडे चौकशी केली असता सोलापूर गाडी आज येणार नाही असे समजले व स्त्रियांना राहण्यासाठी या ठिकाणी कोणती सोय नाही असेही सांगितले. आणखीन भर म्हणजे एक तासात ३–४ वेळा दिवे बंद झाले. त्यावेळी त्या गुंड लोकांचे लक्ष आमच्याकडेच होते. आम्ही सर्वजण घाबरून बाबांचा धावा करू लागलो.

श्रीसाईबाबा नेहमी भक्तांवरील संकट निवारण करतात. त्याप्रमाणे अचानक एक बाई आमच्याकडे येऊन चौकशी करू लागली. आम्ही सोलापूरला जावयाचे आहे असे सांगितले. त्या बाईने आम्हास सांगितले की, तुम्ही या ठिकाणी राहू नका. येथून ९–३० ला जेऊर स्टेशनला जाणारी बस आहे त्या बसने जेऊरला जा. मला पण जेऊरहून रायचूरला जावयाचे आहे, असे तिने आम्हास सांगितले. त्या प्रमाणे आम्ही सर्व जेऊर स्टेशनला येऊन पोहचलो, व तेथून सोलापूरला सुखरुप आलो. आमचा मुक्काम करमाळयास झाला असता तर काय झाले असते याची कल्पनाच न केलेली बरी. तरी पण या आलेल्या संकटातून श्रीसाईबाबांनी आम्हास वाचविले. आलेल्या संकटातून बाबा मला नेहमी वाचवितात हा माझा अनुभव आहे.

× × ×

मी दि. २–६–७८ ला मोटारसायकलने प्रवास करीत होतो. कच्च्या रोडने जात असताना अपघाताने माझ्या उजव्या पायाच्या पींढरीचे हाड मोडले. मी सारखा साईबाबांचा धावा करू लागलो. बाबांच्या कृपेमुळे पायात कसलीही वेदना होत नव्हती. त्याच मोटारसायकलवर बसून आम्ही दवाखाना गाठला. डॉक्टरनी हाड पूर्ण मोडले आहे व या ठिकाणी इलाज होणार नाही तुम्हाला सोलापूरला जावे लागेल असे सांगितले. सोलापूरला जाऊन आम्ही प्लास्टर करून आणले. पायाचे हाड मोडले असता किती वेदना झाल्या असतील असे लोकाना वाटते. पण बाबांच्या कृपेमुळे मला टाचणी टोचण्या इतकी देखील वेदना झाली नाही. तसेच बाबांच्या कृपेमुळे माझ्या आर्थिक बाबतीत व शैक्षणिक क्षेत्रात प्रगति झालेली आहे.

# कृतांताच्या दाढेतून

—कु. पुष्पलता मोहरे, एम्. ए.
बडे पोस्ट आफिस के पास
राजेन्द्र नगर, बिलासपुर, म. प्र.

● श्रीसाईबाबांनी साईसच्चरितात जे आश्वासन दिले आहे. कृतांताच्या दाढेतून काढीन मी निज भक्ता ओढून...ह्या वचनाचा प्रत्यय मला ६ महिन्यापूर्वी आला.

२६ जानेवारी १९७८ रविवार रात्री १० वाजता एका सद्‌गृहस्थाकडून भजन व आरती करून आम्ही घरी परत येत होतो. बरोबर माझी सौ. आई व लहान बहीण होती तसेच ओळखीच्या २–३ महिला व त्यांच्या मुली व मुले पण बरोबर होती, आम्ही रस्त्यावरून निर्धास्तपणे बोलत येत होतो. कारण थंडीचे ते दिवस व रस्त्यावरची वाहतूक साधारण बंदच झाली होती. पण अचानक एक मोटर सायकल मागून आली व रस्त्यावरून जाण्याऐवजी त्यांनी आमच्या मधूनच नेली (आम्ही बाजूने चालत होतो) मोटरसायकल वेगात होती. तिचे हँडल माझ्या कंबरेला जोरात लागले व मी चार पाच हात लांब जाऊन पडले. पडल्याबरोबर घाबरून मी मनातच हाक मारली, बाबा ऽ ऽ ऽ, आपल्याला काय लागले हे विचार करण्यापूर्वीच मी बेशुद्ध झाले. दुसरे हँडल माझ्या उजवीकडच्या बाईला लागले व त्या पण रस्त्यावर पडल्या व बेशुद्ध झाल्या. मोटारसायकल त्याच वेगामध्ये माझ्या जवळ आली आणि काय आश्चर्य तिचे चाक अचानक रस्त्याकडे वळले व तिथेच अडखळून ती उलटली अर्थातच तिच्यावर बसलेल्या दोन व्यक्तिपण तिथेच आदळल्या. हे सर्व एका सेकंदात घडले. पाच मिनिटे काय होत आहे हे कोणालाच काही कळले नाही. माझ्या धक्क्याने माझ्या डावीकडे असलेली माझी आई पण पडली व दुसऱ्या मुली पण पटापट खाली पडल्या. माझी बहीण मागे होती. मोटार सायकलच्या समोरच्या लाईटच्या प्रकाशात तिने झालेला सर्व प्रकार एका क्षणात पाहिला कारण त्या दिवशी सडकेवरचे दिवे बंद होते. तिने प्रथम आईला उठविले आईचा पाय मुरगळला होता. नंतर आई माझ्या जवळ आली. तिने मला हाक मारली पण मी बेशुद्ध आहे हे पाहून ती अधिकच घाबरली व साईबाबांचा धावा करू लागली. तितक्यात सुदैवाने एक रिक्शा आला आम्हाला परत त्यांच्यास घरी नेले.

त्यांनी आम्हाला फारच मदत केली ( कारण त्यांचे घर जवळच होते ) फोन करून रुग्णवाहिका बोलाविली व आम्हाला दवाखान्यात दाखल केले.

तिथे गेल्यावर मला शुद्ध आली व झालेला सर्व प्रकार समजला. कंबरेला व डोक्याला आतून बराच मार लागला होता व हात पाय खरचटले गेले होते तरी पण हात पाय सर्व शाबूत आहेत हे पाहून मला आपल्या साईमाऊलीच्या कृपेची जाणीव झाली कारण जर ते चाक रस्त्याकडे न वळता सरळ माझ्या अंगावरून गेले असते तर ? तिथे योग्य औषध इंजेक्शन दिले. रात्रभर आई व बहीण माझ्याजवळ होते. मी सारखे बाबांचं नामस्मरण सुरू केलं. सकाळी मी उठून बसू शकले व मला थोडे चालता पण आले. डॉक्टर राउन्डला आले तेव्हा मी त्यांना घरी जाण्याची परवानगी मागितली. त्यांनी थोडे तपासले व औषध लिहून दिले व लगेच मला डिस्चार्ज दिला. वास्तविक पेशंटला निदान ३ दिवस तरी दवाखान्यात काढावे लागतात असे मला रात्री नर्सने सांगितले होते. मग हा बाबांच्याच नावाचा प्रताप नाही काय ? दुसऱ्याच दिवशी माझी तब्येत पूर्णपणे बरी झाली होती असे नाही पण बरीच १५ दिवस मी आराम केला व बाबांची उदी व घरगुती औषध लावूनच माझे कंबरेचे दुःख हळूहळू कमी झाले. मात्र दुसऱ्या बाई ४ दिवस दवाखान्यात होत्या कारण त्यांच्या डोक्याला चांगलीच खोक पडली होती.

नंतर कळले की जिथे अपघात झाला त्या जागी दरवर्षी अपघात होतात व बहुतेक माणसं वाचत नाहीत पण ह्या वेळेस साईकृपेने आम्ही वाचलो. बाबांनी जे मला जीवदान दिले त्याची उतराई कधीच होऊ शकत नाही.

बाबांच्या चरणी माझे शतशत प्रणाम।

◆◆◆◆◆◆


## श्री साईलीला

**लेखक—कवी पंचम स्नेहसंमेलन**

★

**यंदा जानेवारी ७९ त शिरडीत साजरे होणार**

**विशेष माहिती जानेवारी अंकात वाचा.**

# जया मनीं जैसा भाव!

—श्री. विजय द. हजारे, एम. ए.
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली–पूर्व मुं. ४०००६६

● १६ ऑगस्ट १९७८ चा दिवस! बुधवार होता तो. नेहमीप्रमाणे घाई-घाईत कचेरीला जाण्यासाठी घराबाहेर पडलो; तोंडाने 'साई प्रार्थना' म्हणतच! स्टेशनजवळ येताच लक्षात आले की, 'आज बाबांची उदी लावायला विसरलो घरून घाईत निघताना.' मनाला चुटपूट लागली. परत जाईन म्हटले तर शक्य नव्हते. 'विरार' लोकलचा टाईम झालेला. मग काय तशीच 'बाबांची' मनातल्या मनात क्षमा मागतच गाडी पकडली. कधीही घराबाहेर पडताना बाबांची उदी लावल्या-शिवाय मी घराबाहेर पडत नाही. मग कचेरीत जाणे असो नाहीतर कुठे फिरायला, सिनेमा-नाटकाला की काही महत्त्वाच्या अथवा साध्यासुध्या कामासाठी! —उदीचा डबा नेहमीप्रमाणे गोदरेजच्या कपाटात होता त्यादिवशी. आणि छोकऱ्याने रात्री (आदल्या दिवशी) कपाटाच्या चाव्या कुठे ठेवल्या होत्या त्या मिळत नव्हत्या. निदान सकाळी कचेरीत निघेपर्यंत त्या मिळाल्याच नाहीत...त्यामुळे खूपच नर्व्हस झालो होतो. त्यात 'निघा निघा लवकर नाहीतर गाडी चुकेल आणि क्रॉस पडला की आम्हाला दोष देत बसाल नेहमीसारखा,' अशी सौ. ने भूणभूण चालविलेली. त्यामुळे घरातून तशीच धाव मारली ती तडक स्टेशनवर... ट्रेनमधल्या एक-दोन मित्रांनी विचारले,

'आज काय, बरं वाटत नाही काय' म्हणून.

'छे छे! बिलकूल नाही. चांगली आहे तब्येत. 'दुसरं' काय सांगणार कप्पाळ? पण उदी न लावू शकल्यामुळे मला तर मरगळल्यासारखे, अपराध्यासारखे वाटत होतेच पण ते लोकानाही जाणवलं हे पाहून तेवढच समाधान करून घेतले मी. खोटे लोटे! बर बरचे! ... पण कधी एकदा कचेरीत जातो असं होऊन गेले मला. कारण ऑफीसमधल्या माझ्या एका मुस्लीम मित्राला कुणीतरी "शिरडीचा प्रसाद आणि प्लॅस्टीकच्या डबीतील उदी" दिली होती. माझा 'बाबां' वरला विश्वास त्याला माहीत होता. त्यामुळे त्याने ती 'उदी' ने भरलेली प्लॅस्टिकची डबी मलाच दिली होती. मीही ती 'उदी' माझ्या टेबलाच्या खणात ठेवलेली आहे हे मला आठवले आणि केव्हा एकदा कचेरीत पोहचेन व प्रथम ती 'उदी' कपाळाला

लावीन. तिचे थोडे कण ( चिमुटभर उदी ) जीभेवर ठेवीन असे होऊन गेले मला. त्यामुळे साहजिकच त्या फास्ट विरार लोकलचा नेहमीचा स्पीडदेखील मला स्लो वाटू लागला. ...त्यामुळे चर्चगेट स्टेशनमधून बाहेर पडून जवळ जवळ धावतच ऑफीसमध्ये पोहचल्यानंतर 'मस्टर' साईन करून मी माझ्या टेबलाजवळ जाणार तो मध्येच मला माझ्या मित्राने ऑफिस मधला डिपार्टमेंट मधलाच समवयस्क सहकारी शशी पालवणकरने अडविले. माझा नाईलाज झाला. तो काहीतरी आपल्या टेबलाच्या खणातून काढू लागला. मला अर्थात तेवढा वेळ थांबायला फुरसद उसंत नव्हतीच. मी सरळ तेथून सटकलो. माझ्या जागेवर येऊन बसलो. टेबलावरील 'बाबां'च्या फोटोला नमस्कार करून पुन्हा त्यांची 'क्षमा याचना' मागीत 'ड्रॉवर' उघडला. उदीची डबी बाहेर काढली आणि...डबीचे झाकण उघडणार इतक्यात शशी धावत माझ्याजवळ आला आणि कसलीशी पुडी माझ्या समोर करीत म्हणाला, "हा घे शिरडीचा प्रसाद" बस्स फक्त ते शब्द ऐकताच मी वेड्यासारखा त्याच्याकडे पाहू लागलो. माझ्या तोंडून शब्दच फुटेना.

"तू उदी लावायला विसरलास...पण मी बरा तुला विसरून देईन...हा प्रसादच घे माझा...माझ्या हातचा...शिरडीचा" टेबलावरील साईबाबांचा बोलका फोटो जणू काही माझ्याकडे रोखून पहात मला सांगत होता. मोठ्या भक्तीभावाने मी तो प्रसाद खाल्ला...पण त्यात उदी नव्हती.

"काय रे शशी उदी नाही आणलीस ती ?"

"आणली रे...पण घरीच राहिली...बोलू नकोस कुणाला मी प्रसाद आणलाय तो...कारण तुझ्यासाठीच आणलाय तो" आणि खरंच त्यांनी कचेरीत माझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाही खास असा 'प्रसाद' आणला नव्हता. बाबांच्या ह्या कृपाप्रसादाने मी साहजिकच भारावून गेलो. माझ्या जवळची उदी मीच त्याला दिली. मी सुध्दा कपाळाला लावली. जीभेवर ठेवली. बाबांनी प्रसाद पाठवून मला कृतार्थ केले होते एक प्रकारे ! तो एक चमत्कारच होता. कारण शशीचा पूर्वी तसा 'बाबां' वर विश्वास नव्हता. उलट दररोज मी बाबांच्या फोटोची प्रार्थना केल्याशिवाय त्यांचे स्मरण केल्याशिवाय ऑफिस कामाला सुरुवात करीत नाही हे पाहून माझ्या श्रध्देला अंधश्रद्धा संबोधित तो मला हसत होता. पण त्याच्या आजारी आईला औषधपाणी देण्यासाठी कुणी एक वैद्य हल्ली गेले महिनाभर त्याच्या घरी येत. त्यांनी त्यांचा अनुभव सांगितल्यापासून त्याला शिरडीच्या बाबांचे दर्शन घेण्याची उत्सुकता लागली होती. त्यात अचानक त्याच्या सासुरवाडीची माणसे शिरडीला जाण्याचा बेत करीत होती. त्याच्या सौ.ला हे कळताच तिने सरळ

शशीला तेथे नेण्याचे ठरविले. त्याला नकळत दोघांची (मिस्टर ॲन्ड मिसेस शशी) तिकीटेही काढायला सांगितली आपल्या मावशीला शिरडीची ! स्वतः एक दिवसाची- १४ ऑगस्ट रोजी रजा घेतली. आपल्या नवऱ्याला (शशीलाही) त्या दिवशी ऑफीसला दांडी मारायला लावली आणि १२ ते १५ ऑगस्ट जोडून चार दिवस मिळालेल्या सुटीचा फायदा घेऊन माहेरच्या मंडळीसह शिरडीला जाऊन आली. आपली शिरडीला जाण्याची इच्छा अशाप्रकारे अचानक ध्यानीमनी नसताना बाबांनी स्वतःच पुरी केली हे शशीला बाबांच्या समाधि-मंदिरात पाऊल टाकताच जाणवले, आणि भान हरपून तो बाबांच्या मूर्तीकडे एकटक पहात बसला. मला अंधश्रद्धा म्हणताना स्वतःला नकळत तो 'साई'च्या पायी तनमन हरपून आला... इतकच नव्हे तर... "बाबा चुकलो मी... त्याबद्दल क्षमा करा मला" अशी बाबांची मनोमन क्षमा मागून "माझ्या आईला दुखण्यातून उठू द्या. ती जर ह्या आजारातून उठली तर तिला घेऊन दरवर्षी नित्यनेमाने मी न चुकता तुमच्या दारी येत जाईन. तुमच्या समाधीची पायरी झाडण्यासाठी शिरडी दरबारी हजर होत जाईन" असा 'साईमाऊलीला' नवस करून राहिला.

मला 'प्रसाद' देताना हे सर्व सांगत असताना शशीच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वहात होते ते पाहून माझेही डोळे पाणावले. कारण आपल्या वेगवेगळ्या भक्तांना त्यांच्या त्यांच्या इष्ट देवदेवतांच्याच स्वरुपात दर्शन देऊन आपण 'सर्व-व्यापी सर्वज्ञ परमेश्वराचाच मानवी अवतार आहोत याची प्रचिती देणारी "साई माऊली" मला पुन्हा एकदा पटवीत होती त्याक्षणी की—

"जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव."

# जरी हे शरीर गेलो मी टाकून....

–सौ. निशा वसंत चिपकर
१७/४, रुपल अपार्टमेंट नं. १,
दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुं. १४

● माझे पति परदेशात जाऊन सहा महिने होऊन गेले. त्यांच्याकडून खुशा-लीचे पत्र किंवा काहीच येईना. मी त्यांना जाताना एक साईबाबाचा फोटो आणि त्यांची वचने 'शिरडीस ज्याचे लागतील पाय' गुपचूप दिली होती व सर्वस्वी साई-

बाबांच्यावर सोपवून जाण्याची परवानगी दिली पण जसजसे दिवसामागून दिवस व रात्री उलटू लागल्या तसतशा साईबाबांना विनवण्या वाढू लागल्या. (अर्थात माझ्या) की निदान त्यांचा टेलिफोन तरी येऊ दे म्हणून पण ती कोणतीच गोष्ट होईना. शेवटी त्यांचे एक मित्र परदेशात जाण्यास निघाले व ते पुन्हा लगेच परत येणार हे कळल्यामुळे मी स्वतः त्यांची भेट घेऊन ह्यांची खुशाली घेऊन येण्यास सांगितले. पुढच्याच गुरुवारी त्यांचा मित्र परत आला व माझ्या मिस्टरांनी काही कॅसेट टेप करून दिल्या आहेत एवढाच निरोप दिला. मी फारच आनंदीत झाले की इतक्या दिवसांनी आपल्या नवऱ्याचा आवाज कानात पडणार म्हणून. संकेत व मनीषासुद्धा आपल्याला बाबांनी काय सांगितले असेल याचा विचार करू लागले. मी प्रथम साई-बाबांच्या फोटोला हात जोडले व खरंच साईबाबा तुमच्या कृपेची कमाल तुम्ही आम्हाला दाखवलीत म्हणून प्रार्थना केली पण दैव अनुकूल नव्हतं म्हणा नेमकी तीच टेप त्या गृहस्थाकडे मिळेना, त्या दिवशी छायागीत होते. त्यांच्या मुलांनी सबंध छायागीत एका टेपवर घेतले. कदाचित ती टेप तर नसेल ना या शंकेने मन व्याकुळ झाले व दुसऱ्या कोणत्याही टेपमध्ये यांचा आवाज ऐकूच आला नाही. परंतु माझे साईबाबा मला नव्हेस करणार नाहीत याची मला खात्रीच होती. शेवटी ती छाया-गीतांची टेप मोठ्या मुष्कीलीने मी त्या गृहस्थांकडून परत करण्याच्या बोलीवर मागून घेतली. तोपर्यंत दुसरा गुरुवार उजाडला. मी साईबाबांची प्रार्थना करून टेप चालू केली. बरीच गाणी संपली. एक अगदी कर्कश गाणे चालू असताना मधेच एकदम माझ्या मिस्टरांचा आवाज आला–'जरी हे शरीर गेलो मी टा ...' इतर कोणत्याही गोष्टी जर असत्या आणि त्या पुसून टाकल्या गेल्या असत्या तर त्यात काहीच कमाल वाटली नसती. परंतु चुकून पुसली न गेलेली अक्षरे आणि तीसुद्धा साईबाबांच्या वचनातील म्हणून आश्चर्य व खरंच माझे साईबाबा माझ्यासारख्या एखाद्या भक्ताला आपल्या कृपाप्रसादाचा किती वर्षाव करतात ते त्या दिवशी जितकी कोणी माणसे त्या ठिकाणी हजर होती त्यांना दिसून आले.

जय श्रीसाईबाबा

# मनोकामना पूर्ण करणारे श्रीसाईबाबा

************************

-श्री. महादेव भाऊराव घुगे,
घुगे बिल्डिंग, गणेशपेठ लेन,
दादर, मुं. २८

● श्रीसाईलीलेच्या वाचक बंधु-भगिनींनो श्रीबाबांचेविषयी माहिती व अनुभव आपणा सर्वांना प्रसंगानुसार आला आहेच. तसाच एक माझा अनुभव हं!

श्रीबाबांचे म्हणणे आहे की---"माझी इच्छा झालियावीण। दारवंटा त्यागील करण। कोणा स्वेच्छे होईल दर्शन। घडेल आगमन शिर्डीचे॥ पण श्रीबाबांची इच्छा झाल्यावर बाबांचे म्हणणे आहे की, "माझा माणुस देशावर। असो का हजारो कोस दूर। आणीन जैसे चिडीचे पोर। बांधून दोर पायास॥ म्हणजे बाबांची इच्छा झाल्याशिवाय आपले शिर्डीला जाणे होत नाही. तसेच मला दीर्घ काळानंतर जेव्हा श्रीबाबांचे बोलावणे आले तेव्हाच मला श्रीबाबांनी आपल्या चरणाजवळ नेले व दर्शन दिले.

मी साईबाबांचा एक भक्त आहे. सन १९५० पूर्वी मी पाच सहा वेळेला शिर्डीला गेलेलो आहे. त्यानंतर योग आला नाही म्हणण्यापेक्षा श्रीबाबांचे बोलावणेच झाले नाही. श्रीबाबांच्या मनात आल्याशिवाय ते कोणालाही आपल्या घराचा दारवंटा सोडण्याची बुद्धी देत नाहीत पण मनात आले तर ते आपल्या भक्ताला तो कुठेही असो खेचून आपल्या चरणापाशी आणतात. श्रीबाबा हे सदैव भक्ताच्या पाठीशी उभे असतात. तेव्हा माझ्या मनाची फार दिवसाची ओढ ध्यानी मनी नसताना श्रीबाबा कशी कोणाला प्रेरणा देतात आणि पुरी करतात ते पहा.

श्रीसाईसच्चरित अध्याय ४८ वा ओवी ७५ "निमित्त शेवडे यांचे स्मरण। वंदावया आपले चरण। साईच तया करिती पाचारण। ते सावचित्त श्रवण करा॥ अगदी या ओवीप्रमाणे असे घडले. आम्ही म्हणजे मी आणि सौभाग्यवती व तिचे वडील बहिणीला भेटावयास निमोण गावी गेलो. हे निमोण गाव श्रीबाबांचे भक्तश्रेष्ठ निमोणकरांचे गाव होय. त्या निमोण गावी गेल्यावर तेथील श्री. बाबासाहेब सराफ आम्हाला भेटावयास आले आणि म्हणाले, आपण उभयता अनायासे आलाच आहात तरी माझ्या मुलाच्या लग्नाला उद्या रविवारी तुम्ही चेसगावला आलेच पाहिजे. हे चेसगाव शिर्डीजवळ आहे तेव्हा ही श्रीबाबांनीच श्रीबाबासाहेब सराफाना प्रेरणा दिली

हे अंतर्यामी जाणून आम्ही त्यांचे आमंत्रण स्वीकारले. त्याप्रमाणे आम्ही उभयता श्रीबाबासाहेबांच्या मुलाच्या लग्नाला रविवारी सकाळी येसगावला गेलो. लग्न सकाळचे आटोपून दुपारी शिर्डीला गेलो. असे वंदावया आपले चरण श्रीबाबांनी आम्हाला शिर्डीला नेले आणि अशी फार दिवसांची आमची श्रीबाबांच्या दर्शनाची ओढ श्रीबाबांनीच पुरी केली.

# श्रीसाईंची लीला

–सौ. सुधना सुरेश करमरकर
उगम सोसायटी, प्लॉट नं. ३
'साफल्य' बंगला, पनवेल.

● ५ जून १९७८ ची गोष्ट. माझे मिस्टर पेन्टीग कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांचे कल्याण शीळ फाट्याच्या एम. आय. डी. सी. चे पेंटींगचे (पाईप-लाईनच्या) काम चालू होते. ५ जून १९७८ ला दुपारी ४–४॥ च्या सुमारास माझे मिस्टर स्कुटरवरून साईटवर चालले होते. तेवढ्यात अचानक शीळ फाट्याच्या थोडं पुढे गेल्यावर ४–५ जण कोयते व काठ्या घेऊन त्यांच्यावर चालून आले. त्यांनी लगेच गाडी थांबवली इतक्यात काठीचा पहिला फटका ह्यांच्या डोक्यावर बसला व चष्मा पण फुटला त्यामुळे त्यांना थोडं गांगरल्यासारखं झालं, तरीसुद्धा त्यांनी साईनाथांचं नाव घेतलं व स्वतःच्या डोक्यानी एकाच्या डोक्यावर जोराचा फटका मारला त्याबरोबर त्याच्या हातातला कोयता निसटला व तो त्यांनी घेतला. त्याबरोबर ते घाबरले. तेवढ्यात पनवेलहून कल्याणकडे जाणारी एक एस. टी आली व त्यातून ४-५ जण त्यांना ओळखणारे खाली उतरले व ते ह्यांना साहेब काय झाले, काय झाले विचारू लागले. इतक्या वेळात येणारी एस. टी पाहून ते ४–५ जण झाडीत पळाले. अक्षरशः मला तर वाटते की साईनाथांच्या कृपेमुळेच ह्यांच्यावर आलेल्या संकटातून हे वाचले.

आमचा दोघांचाही साईबाबांवर फार विश्वास आहे. हा प्रसंग घडल्यानंतर भयंकर पाऊस-पाणी असूनसुद्धा आम्ही दोन मुलांना घेऊन शिर्डीला जाऊन आलो व साईबाबांच्या चरणी अशी प्रार्थना केली की साईनाथा, तुमची कृपादृष्टी सतत आमच्यावर राहू देत. खरंच मला वाटते साईबाबांच्या कृपेमुळेच मला माझे सौभाग्य परत मिळाले होते.

# का चिंता करिशी ?

—श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे
८० शिवाजीनगर, पुणे–५

● श्रीबाबा कृपाळू आहेत. मायाळू आहेत. आईसारखे दयाळू आहेत. आपल्या लेकराला कुठे दुखले खुपले की आई जशी धावत येते तसे श्रीबाबा भक्ताच्या हाकेला तात्काळ धावून येतात. भक्तावरील संकट त्वरित निवारण करतात. विनम्रभावे अंतःकरणपूर्वक श्रीबाबांची प्रार्थना केली की, भक्ताची मनोकामना बाबांनी पूर्ण केलीच म्हणून समजा.

नुकताच मला आलेला अनुभव अतिशय बोलका आहे. आमच्या शिवाजीनगर, पुणे येथील श्रीसाईदास मंडळाने ठरविले आहे की, यंदा ९ आणि १० डिसेंबर १९७८ या दिनी पुणे येथे अखिल भारतीय साईभक्तांचे संमेलन भरवायचे. या संमेलनासाठी भारताच्या सर्व भागातून सुमारे शे-दीडशे भक्त येणार तेव्हा त्यांची राहण्याची–जेवणाची वगैरे सर्व सोय पर्यायाने मंडळालाच करणे भाग आहे. त्या दृष्टीने आम्ही विचारविनिमय करून तयारीला लागलो. पहिला प्रश्न होता भक्तांच्या निवासाची सोय. आमच्या मंदिरापासून जवळच असलेल्या एका कार्यालयाबाबत आम्ही व्यवस्थापकांशी संपर्क साधला. प्राथमिक बोलणी होऊन जागा जवळ जवळ निश्चित झाली. आगाऊ रक्कम भरून जागा रिझर्व्ह करून ठेवावी या हेतूने आम्ही ३/४ जण व्यवस्थापकांकडे गेलो. आम्हाला कल्पनाही नव्हती ते घडले. व्यवस्थापक व्यवहारी दृष्टिकोन ठेवून व्यापारी सुरात म्हणाले–“ ता. ८ ते ११ डिसेंबर या लग्नतिथी असल्यामुळे आमच्या मंगल कार्यालयाला मागणी जास्त असते. दोन पैसे कमवायचे हेच दिवस आहेत. तेव्हा आपणास कबूल केलेल्या दरात आम्ही जागा देऊ शकत नाही. ”

व्यवस्थापकांचा हा निर्वाणीचा शब्द कानी पडताच आमची घोर निराशा झाली. इतके दिवसांच्या प्रयत्नावर पाणी पडले. आम्ही जड पावलांनी नैराश्य पदरी घेऊन मंदिरात परतलो. मंडळाचे चिटणीस श्री. रामकृष्णन् श्रीबाबांच्या मूर्तीपुढे उभे राहिले. डोळे मिटून हात जोडून प्रार्थना केली आणि काय आश्चर्य बाबांनी प्रार्थना ऐकली. भक्ताच्या हाकेला ते धावून आले. काळ्याभोर आकाशात एखादी वीज लखकन् चमकून जावी तशी एक ओझरती कल्पना श्री. रामकृष्णन् यांच्या मनाला स्पर्शून गेली. त्यांना स्मरले की, १९७० साली त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी मॉडेल कॉलनी

येथील सर्व सुख-सोयींनीयुक्त असे एक कार्यालय घेतले होते. तेच कार्यालय या संमेलनासाठी घ्यावे असा विचार करुन आम्ही मॉडेल कॉलनीत गेलो.

प्रशस्त हॉल, सर्व सोयींनी युक्त असे स्वयंपाकगृह, सुंदर खोल्या आणि रमणीय परिसर पाहून जागा सर्वांच्याच डोळयात भरली. या कार्यालयाचे व्यवस्थापक श्री. प्रधान असल्याचे समजले. कार्यालयाचे ऑफीस बंद असल्यामुळे श्री. प्रधान यांना त्यांचे घरी जाऊन भेटणे आवश्यक वाटले. तेथील रखवालदाराला घेऊन श्री. प्रधान यांचे घरी गेलो. घरात पाऊल टाकले मात्र, आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या घरात आमचे स्वागत केले एका हंसतमुख श्रीसाईबाबांच्या मोठ्या फोटोने ! श्री. प्रधान भेटले. त्यांच्या तर रोमारोमातून साई-भक्ति ओसंडत असलेली दिसली. श्री. प्रधान यांचा सबंध परिवारच साई-प्रीतीने प्रेरीत झालेला दिसला. गप्पांच्या ओघात समजले की, श्रीबाबांच्या सहवासात राहिलेले त्या वेळचे मुंबईचे एक सुप्रसिद्ध जज्ज कै. एम्. डब्लू. प्रधान हे या प्रधानांचे काका.

आमच्यात जवळीक निर्माण झाली. एकाच परिवारातील असल्यासारखे आमचे नाते जुळले. आमचे प्रश्न हे श्री. प्रधान यांचे प्रश्न होऊन बसले; आणि सर्व प्रश्न क्षणार्धात सुटले. कल्पनेपेक्षाहि अधिक सुलभतेने. तासाभरापूर्वी निराश झालेली आमची मने एकदम उजळून निघाली. आनंदाच्या वर्षावात न्हाऊन निघाली. बाबांची लीला अगाध आहे. श्रीबाबांच्या त्या हंसतमुख फोटोकडे पहात विनम्र होऊन मी हात जोडले.

# श्रीसाईंना साष्टांग नमस्कार

*आमची आई कै. राधाबाई खेर ही नेहमी दादरच्या महादेव मंदिरात किर्तनाला जात असे. ती साई भक्त होती. एके दिवशी कीर्तन संपल्यावर एक कफनी घातलेले गृहस्थ तिला म्हणू लागले. मला खिचडी दे. मागे एकदा तुझ्या घरी आलो होतो. परंतु तुझ्या घरच्या मंडळीना खिचडी मागितलेली आवडणार नाही. म्हणून मागितली नाही. आईने सांगितले की, उद्या किर्तनाला येताना घेऊन येते. कफनीधारी गृहस्थानी सांगितले, किर्तन संपल्यावर सर्व मंडळी गेल्यावर मी

एका खांबापाशी थांबेन. तिथे तू खिचडी आणून दे. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी कीर्तन संपल्यावर सर्व मंडळी गेल्यावर, खांबापाशी कफनीधारीना खिचडी खावयास दिली. खाऊन झाल्यावर हात धुवून येतो. हात धुण्यास निघाला तोच तो अंतर्धान पावला. त्यावर ते साईच असावेत. परंतु त्यांनी भुरळ पाडली. नमस्कार करावयाचा राहिला म्हणून आईला हळहळ वाटली. श्री साईनाथाना साष्टांग नमस्कार.

आमचे घरी गंगापूजन होते; त्या दिवशी परगावचे ब्राह्मण जेवावयास आले होते, त्याच दिवशी सत्यनारायण केला होता. बुंदीच्या लाडवांचे थाटात जेवण झाले. जेवण झाल्यावर ब्राह्मण झोपले होते; त्यापैकी एक साईभक्त होते. त्यांना स्वप्नात श्रीसाईंनी दर्शन देऊन सांगितले की, मी आज येथे जेवगास आलो होतो. माझ्या फोटो मागे ( देवा जवळील फोटो ) थोडा प्रसाद ठेविला आहे, तो पाहा. ब्राह्मणाने घरी जाण्यापूर्वी ही हकिकत घरात येऊन सांगितली. आम्ही सर्वांनी फोटो पाठीमागे पाहिले. तो खरच छोट्या केळीच्या पानाच्या तुकड्यावर प्रसाद होता. श्रीसाईलीला अगाध आहे. श्रीसाईंना साष्टांग नमस्कार.

—सौ. लक्ष्मी द्वारा श्री. शं. ग. सबनीस
गोपिका बंगला, विश्राम बाग, कुपवाड रोड, सांगली.

# अपघात आणि साईबाबा

—सौ. अस्मिता कमळाकर दांडेकर
६९ बी खाडीलकर रोड, गिरगाव मुं. ४

' साईनाथ गुरू माझे आई
मजला ठाव द्यावा पाई
अन्य काही मी मागत नाही
एवढेची देई दयाळा परिपूर्ण कृपेने पाहि '

अशी अनन्यभावाने त्या दयाघन साईची आळवणी करून निद्राधिन व्हायचे असा माझा रोजचा क्रमच आहे.

२ महिन्यापूर्वीची गोष्ट. नुकतीच २–३ महिन्यापूर्वी माझ्या पतीने ॲम्बॅसिडर घेतलेली होती. रोह्याला कामानिमित्ताने आठवड्यातून दोन फेऱ्या होतच. पहाटे निघून रात्री परतायचे. मात्र त्यावेळी जास्त काम असल्याने २ दिवस मुक्काम होता. नेहमीच ते असे जातात त्यामुळे आता सवयच झाली होती. पण त्या दिवशी मला सारखे बेचैनच वाटत होते.

रात्री झोपण्यापूर्वी अध्याय वाचन व प्रार्थना करून, सदैव पाठीशी रहा, रक्षण करा असे बाबांना सांगून झोपले व त्याच रात्री मला सहसा स्वप्न पडत नाहीत पण पडले. ते इतके विचित्र की काहीच बोध होईना.

'माझा लहान मुलगा खेळतोय तर तेथे अकस्मात् एक काळ्या रंगाचा साप आला व मुलाच्या भोवती फिरू लागला. मी हे सर्व पहाते आहे. जवळपास कोणीच नाही. तर मुलाने तो पकडला व सरळ तोंडात घेऊन गिळून टाकला. मी धावत जवळ जाऊन त्याला उचलले व मांडीवर घेऊन साईबाबांचे फोटोजवळ आले व बघा ना बाबा हा कसं करतो. तो अगदी निपचित पडला होता. श्वास जोरात चालू. मी अगदी रडून रडून बाबांना सांगते आहे. बाबा हे काय अरिष्ट, यातून वाचवा. तर आशीर्वादात्मक अशा त्या फोटोतून हात उंचावून मला बाबा म्हणतात, अग घाबरू नको. मी आहे ना ? मी बघतो, सर्व काही व्यवस्थित आहे. तो आता जाईल बघ व मुलाकडे बघते तो त्याने गिळलेला साप बाहेर पडून दारातून निघून गेला. व मुलगा जो निपचित पडलेला तो हालचाल करू लागला. मी हात जोडून पायावर मस्तक ठेवून बाबा बाबा करते तेवढ्यात जाग आली. पण सबंध दिवस बेचैनीतच गेला. संध्याकाळी हे रोह्याहून येणार होते. संध्याकाळ उलटली. रात्र झाली. १०–११ १२ वाजले तरी पत्ता नाही. मी मनातून खूपच घाबरले होते व स्वप्नाचा विचार येऊन अधिकच भय वाटत होते. सारखे बाबांचे नामस्मरण करत होते. १२॥ वाजता दार वाजले. दरवाजा उघडताच पहाते तो अगदी घाबरून, दमून चेहरा काळा ठिक्कर पडलेला असे हे दारात उभे. मी लगेच त्यांना विचारले, 'सर्व ठीक ना ? गाडी कशी आहे ? काही झाले का वाटेत ?' तर म्हणाले, आता मला स्वस्थ पडू दे. तुला उद्या सर्व सांगतो.

संध्याकाळी रोह्याहून काम आटोपून निघालो. पेणपर्यंत व्यवस्थित आलो. मागून बस येत होती. तिला पुढे जाऊ द्यायला हवे होते पण ड्रायव्हरचा शहाणपणा तो त्याला साईड देईना व वळण आले तशी बस जोरात मागील बाजूला धडकली व हादरा बसला. आम्ही सर्व खूपच घाबरलो. गाडी खाली तरी कोसळली असती

नाहीतर चुराडा झाला असता पण फक्त मागची बाजू चेपली व काचा तडकल्या व आम्ही त्या दिव्यातून सहीसलामत सुटलो त्यामुळे एवढा उशीर झाला. तू का मला आल्यावर एवढे प्रश्न विचारलेस ? तर त्यांना मी स्वप्नाचा वृत्तांत सांगितला. नंतर माझ्या लक्षात आले की काळ आला होता पण बाबांच्या कृपेने त्यावर मात केली व त्याला परतवून लावलं. गाडीत बाबांचा छोटा फोटो लावलेलाच आहे. तेच सतत पाठीशी असतात व रक्षण करतात. त्यांची कृपा असल्यावर कळीकाळाची पण हिंमत होत नाही वाजूला वावरण्याची. खरोखर " अगाध शक्ती अघटित लीला तव सद्-गुरुराया " असेच म्हणावेसे वाटते !

# साईबाबांचा आशिष

–श्री. सुभाष अनंत वैद्य,
स्टेट बँक ऑफ इंडिया
धार (म. प्र.)

● आज ' श्रीसाई ' ही तीन अक्षरे उच्चारली की हृदयात आनंदाच्या ऊर्मी प्रसृत होतात. मनात आदर आणि श्रद्धा यांचा संगम होतो व ह्या निरर्थक जगातील जीवनाचा अर्थ सापडतो. सर्वप्रथम जेव्हा आम्ही शिर्डीस गेलो ते अगदी सहज आमच्या दक्षिण-भारत यात्रेतील एक स्थान म्हणून. त्यावेळी जेव्हा आमची गाडी ( मोटार ) शिर्डीस पोहचली तेव्हा आम्ही मोटारीतून अगदी सहज उठलो कारण ' कन्याकुमारी 'पर्यंत अनेक स्थाने पाहिलेली तसेच हे एक स्थान अशी भावना मनात होती. परंतु शिर्डीच्या भूमीवर पाय पडताच मन अचानक आनंदाने डोलू लागले व मनात अनेक पवित्र भावना मंदिरातील उदबत्तीच्या मंद सुगंधासारख्या दरवळू लागल्या. आपण आपल्या इच्छित स्थळी येऊन पोहचलो असे मनोदेवता सांगू लागली. धर्मशाळेत जाऊन प्रातर्विधी व स्नानादी आटोपून 'श्री' च्या दर्शनास गेलो. आरती चालू होती. सुंदर मंद दीप जळत होते. ऊद आणि सुगंधित पुष्पे यांचा मिश्रित परिमल एक अनोखा आनंद देत होता व समोर बाबांची रम्य मूर्ति पाहून अचानक नेत्रातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. शरीर कंपायमान झाल्यासारखे वाटले. श्रद्धा, आनंद व अनेक भावना उचंबळून आल्या आणि मन आनंदाच्या सागरात डुंबून गेले. परमानंद म्हणजे हाच असे वाटू लागले. कदाचित ' अष्टभाव दाटेल '

असे म्हणतात त्याचीच ही प्रचिती असावी. कोणी अनुभवी भक्तजनांनी सांगितले होते की बाबांच्या दरबारी जे इच्छित मागाल ते मिळेल परंतु खरे तर आमची अवस्था अशी काही मंत्रमुग्धपणाची झाली की बाबांच्या दर्शनाव्यतिरिक्त मागण्या-सारखे जगात दुसरे काहीच नाही असे प्रकर्षाने जाणवू लागले. मोठ्या कष्टाने आम्हास कर्तव्य म्हणून माघारी फिरावे लागले. शिरडीतील इतर स्थाने बघून आम्ही मोटारीने परत फिरलो. जसजशी मोटार घराकडे धाव घेत होती तसतसे मन पुनः मायापाशात गुरफटत होते. बाबांकडून 'हे मागण्यासारखे होते,' 'ते मागा-वयास हवे होते' असे अनेक विचार मनात आले. तसे पाहता बाबांच्या कृपेने काही कमी नव्हते. चांगली नोकरी, गुणी बायको व सुंदर दोन गुलाबकळ्या-सारख्या मुली तरीही एक मुलगा असावा असे मनात खोल कुठेतरी शल्य सलत होते. मग मनोमनच बाबांची प्रार्थना केली व त्यास साकडे घातले आणि बरोबर वर्षभराने पुत्ररत्नाच्या रूपाने बाबांचा आशीष फळला आणि म्हणूनच त्याचे (पुत्राचे) नाव आशीष असे ठेवले. आज स्वस्थ, सुंदर आणि कोणालाही आक-र्षित करील असा श्री साईबाबांचा आशीष आमच्या घरात खेळत आहे. आम्ही त्यास बाबांच्या दर्शनास घेऊन गेलो होतो. आता बाबांवरील आमची श्रद्धा अटळ आहे व बाबांचे स्मरण आमचा नित्यक्रम होवून बसला आहे. त्यांच्याच दिलेल्या स्फूर्तीने 'घेऊन साई साई नाम । गाऊ बाबांचे गुणगान' हे भजन लिहिले गेले व साईलीला मासिकात प्रकाशितही झाले. बाबांवर श्रद्धा ठेवून आम्ही निश्चिंत आहोत. बाबांचा वरदहस्त सदैव शिरी असावा हीच बाबांच्या चरणी अनन्य भावाने हृदयपूर्वक प्रार्थना.

## हरवलेल्या मुलाचा शोध साईकृपेमुळे लागला

—श्री. रामजी पारडकर
मु. पवना, पो. दुधड, जि. नांदेड

* सन १९७७ च्या जानेवारी–फेब्रुवारीत शिर्डी येथे लेखक व कवींचे स्नेह-सम्मेलन भरले होते. या स्नेहसम्मेलनात भाग घेण्यासाठी मी व माझा ८ वर्षांचा मुलगा साईनाथ शिर्डी येथे गेलो होतो. स्नेहसम्मेलन आटोपल्यावर १ फेब्रुवारीला अजंठा एक्सप्रेसने आम्ही गावाकडे जात होतो. नांदेडला एक्सप्रेस सकाळी चार

वाजता आली. गाडीत फारच गर्दी होती. आम्ही सर्व स्टेशनवर उतरत होतो. गर्दी जास्त असल्यामुळे मी माझ्या मुलास माझ्या मागेच यावयास सांगितले. मी पुढे प्लॅटफॉर्मवर चालत होतो. माझ्या दोन्हीही हातात बरेच सामान असल्यामुळे मी मागे पहात नव्हतो. मला वाटत होते मुलगा माझ्या मागेमागे बरोबर येत असेल. एक वेळ मी मागे फिरून पाहिले व मुलास हाक मारली. मुलगा काही दिसेना. मी सामान वगैरे प्लॅटफॉर्मवर एका बाजूला लावून ठेवले. माझ्याबरोबर माझ्याच गावचा एक माणूस होता. आम्ही दोघांनीही मुलास प्रत्येक डब्यात व पूर्ण प्लॅटफॉर्मवर पहायचे ठरविले. गाडीचा एक एक डबा पूर्णपणे शोधला व प्लॅटफॉर्मही पूर्ण फिरून पाहिला. परंतु मुलगा कुठेच दिसेना. माझ्या तोंडचे पाणी पळाले. एकदम मला श्रीसाईबाबांची आठवण झाली. मी मनातल्या मनात श्रीसाईबाबांना म्हणालो, "देवा आता माझा अंत पाहू नकोस काही चुकल्यास माफ कर. शेवटी तूच तारणार आहेस" असे म्हणून लगेच साईंचा जप सुरू केला. जप सुरू करून केवळ दोनच मिनिटे झाली असतील. दैवयोग समोरून माझा मुलगा माझ्याकडे धावत येताना दिसला. माझ्या सोबतच्या माणसाने ताबडतोब त्याला धरून आणले. मुलाला पहाताच माझ्या डोळ्यातून अश्रूंचा पूर लोटला व मी साईंना शतशः प्रणाम केले. केवळ श्रीसाईंच्या कृपेमुळे माझा मुलगा मला परत मिळाला. भक्ताने साईंना फक्त प्रेमाने हाक द्यावी की श्रीसाई भक्तांचे संकट निवारण्यासाठी हजरच ! म्हणूनच—

साई साई नाम घोका ।  
येईल सन्ही टळेल धोका ॥

हे साईंचे बोल किती योग्य व सार्थ आहेत.

# भक्तांचा कैवारी साईराम

—सौ. प्रमोदिनी पोतनीस  
पिंपरी, पुणे १७.

● शुक्रवार दिनांक १६–९–७७ गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळी माझी मुलगी चि. सौ. अस्मिता अल्हाद देशपांडे हिला पिंपरी येथे डॉ. स्वामीनाथन यांचे

दवाखान्यात डिलीव्हरीसाठी दाखल केले. डॉक्टर तपासणीनंतर डिलीव्हरी दुपारी दोन पर्यंत होईल असे सांगण्यात आले. आज हरितालिका आणि गणेशचतुर्थी तेव्हा पूजाअर्चा नैवेद्य कसा होणार या विचाराने डोके सुन्न झाले. एक वाजला, दोन वाजले. तरी डिलीव्हरीची काहीच चिन्हे दिसत नव्हती. घरात माझे पती आणि तीन लहान मुलं. त्यांना तरी जेवायला मिळावे, गोड धोड मिळावे पण वेळ अडचणीची, मुलीजवळ तर मला बसणे जरूरीचे होते. माझे पती तासातासाने दवाखान्यात येत होते. संध्याकाळी चार वाजता त्यांनीच घरी स्वैंपाक, नैवेद्याला शिरा, खव्याचे मोदक करून श्रीगजाननाची पूजा आरती नैवेद्य केला. सहा वाजता मुलीसाठी मोदकाचा प्रसाद व उदी दवाखान्यात आणली. पूजा वगैरे सर्व व्यवस्थित पार पडले म्हणून मलाही बरे वाटले. मुलीला प्रसाद व उदी दिली. डिलीव्हरीची वेळ केव्हा येते, किती त्रास होणार, मुलगी तर शरीर प्रकृतीने अशक्त याचीच काळजी वाटत होती. सात वाजले, आठ वाजले, नऊ वाजले तरी तिचा जीव मोकळा होईना. अखेर ९-१५ वाजता डॉक्टर सांगू लागले की मुलीला क्लोरोफॉर्म देऊन शस्त्रक्रियेने सुटका करावी लागेल. माझ्या अंगातला जोम कमी झाला. हातपाय लटपटू लागले. आता माझ्या साईमाऊलीलाच शरण जावे त्याशिवाय संकटातून मुक्तता होत नाही. मी श्रीसाईबाबांचा धावा केला. उदी मुलीच्या डिलीव्हरी खोलीकडे फुंकली, आणि नामस्मरण श्रीराम साईप्रभू सिताराम म्हणू लागले. डोळ्यातून अश्रू वाहत होते. तोच आश्चर्याचा धक्का देणारी बातमी डॉक्टरसाहेबांनी दिली. अहो तुम्हाला नातू झाला. ९–५२ वाजता रात्री अगदी विना शस्त्रक्रियेने डिलीव्हरी झाली. माझी साई-माऊली माझ्या हाकेला धावून आली. आज हे बाळ श्रीसाई कृपा छत्राखाली सुखरूप आहे.


## श्री साईलीला

### लेखक–कवी पंचम स्नेहसंमेलन

★

यंदा जानेवारी ७९ त शिरडीत साजरे होणार

विशेष माहिती जानेवारी अंकात वाचा.

# निष्काम भक्तीची दिक्षा देणारे सद्गुरू
# ※ साईनाथ महाराज ※

★★★★★★★★★★★★★★★★★★★

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व)
मुंबई – ४०० ०३७

● मी ज्या ऑफिसात कामाला आहे त्याच्या पाठीमागील फुटपाथवर एक छोटेखानी श्रीसाईबाबा मंदिर आहे. आजुबाजूची वस्ती अशिक्षित व साधारण वेताची. तरीपण मंदिराचे आवार व सभोवतालची जागा अतिशय स्वच्छ असते. बरेच दिवस सकाम भक्ति करून कंटाळलेलं मन आता जास्त अंतर्मुख झालं होतं, आणि आता मनोमन पटू लागलं की सकाम भक्ति ही दरिद्री आहे. ती क्षणिक सुख देते व पुन्हा नवीन इच्छा निर्माण करते. त्याऐवजी जर निष्कामच भक्ति केली तर... "आनंदाच्या डोही आनंद तरंगे" हा अमृतानुभव येईल. बरेच दिवस वरील देवळाविषयी एक इच्छा मनात होती. तिथे बाबांची आरती होत नाही. ती जर सुरू झाली तर फार चांगले होईल.

गेल्या प्रजासत्ताक दिनी मी सुटी असूनही ओव्हर टाईममुळे कामाला होतो. संध्याकाळी ७ पर्यंत बसावे लागते तेव्हा चहाकॉफीसाठी आम्ही छोट्या छोट्या कंपूने बाहेर जातो. तसेच काल गेलो तेव्हा रस्त्याच्या कडेला लावलेल्या फळयावर श्रीसाईनाथ महाराजांची महापूजा असल्याचे वाचले. म्हटले प्रसाद व दर्शन घेऊया. तेव्हा तिथे चौकशी करता प्रसाद व पूजेला वेळ असल्याचे कळले. मग पुन्हा ऑफिस सुटल्यावर तिथे गेलो. तेव्हा तिथल्या कार्यकर्त्यांनी पुन्हा तेच उत्तर दिलं. मी त्यांना आरतीविषयी विचारलं तेव्हा कोणालाच आरती माहीत नाही त्यामुळे करत नाही. असं उत्तर मिळालं. म्हटलं आपण आजपासून आरती करू या. मला जी येते ती म्हणेन. त्यांना सर्वांना जो आनंद झाला तो सांगता येणार नाही. काही वेळातच ढोलकी, टाळ व घंटा वाजवायला मुलं माणसं हजर झाली आणि अगदी समाधिमंदिरात जसे आरतीचे वातावरण असते तशा वातावरणात "आरती साईबाबा" ही श्री. अडकरांची आरती अतिशय सुरेखपणे पार पडली.

प्रसाद घेऊन घरी जाताना निष्काम भक्तीची इंद्रायणी मनात दुथडी भरून वहात होती. ❀

# तरी मी धावेन भक्तांसाठी

—सौ. जानकीबाई अनंत चुनेकर
गावडेवाडी, वेंगुर्ला,
जि. रत्नागिरी, ४१६५१६

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

साई वचनातील श्रीबाबांचे बोल अगदी खरे आहेत. याचा अनुभव श्रीबाबा आपल्या भक्तांना योग्य वेळी दाखवितात.

आमच्या घरात साईबाबांवर आम्हा सर्वांचीच पूर्ण श्रद्धा आहे. म्हणून कोणतेही कार्य करताना बाबांच्या कृपेची याचना करीत असतो. त्यामुळे अडीअडचणीचे वेळी कनवाळू कृपाळू बाबांनी धावत येऊन संकट दूर करावे अशी मनात भावना असते. कारण—

ज्या मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ॥

या बाबांच्या ब्रीद वाक्याप्रमाणे साईबाबा आपल्या भक्तांना अनुभव दाखवितात. तसे मला दाखविलेल्या अनुभवांपैकी मी माझे अनुभव देत आहे.

१) काही दिवसांपूर्वी मी थंडी तापाने फार आजारी होते. घरात मोठे माणूस असे कोणीच नव्हते. लहान लहान मुले फक्त घरात होती. अनेक प्रकारची घरगुती औषधे करून झाली. तरी काही केल्या अंगाला काही घाम सुटेना व ताप काही हटेना. हॉस्पिटलमध्ये जाऊ शकत नव्हते. त्यात आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे डॉक्टरना घरी आणू शकत नव्हते. मुलांच्या खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागली. मला काही सुचेनासे झाले. माझ्यावर मोठा प्रसंग आला.

मी बिछान्यावरून उठून मोठ्या प्रयासाने घरातील श्रीबाबांच्या दरबारात गेले तेथील उदीच्या डबीतील काही उदी घेतली आणि श्रीसाईबाबांचे नाव घेऊन थोडे तीर्थ करून घेतले. तसेच थोडी उदी अंगाला चोळली व मी झोपी गेले. काही वेळाने मला स्वप्न पडले. साईबाबा येऊन मला दरबारात घेऊन गेले आणि

जवळच बसून सांगू लागले, 'बाळे, तू भिऊ नकोस. जो जो मज भजे जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी ।।

इतक्यात मी जागी झाले. तो काय चमत्कार. माझ्या सर्वांगाला भरपूर घाम सुटून अंगावरील सर्व कपडे भिजून ओलेचिंब झाले होते. पांघरलेली चादर व ब्लँकेट जडजड झाले होते, आणि नवीन उत्साह व जोम येऊन अंग हलके हलके झाले होते.

× × ×

२) माझ्या सोडा फॅक्टरीकरिता मी मुंबईहून भरलेले गॅस सिलींडर्स मागविले. तसे म्हणजे फॅक्टरीच्या धंद्याकरिता अधून मधून सिलेंडर्स मागवावी लागतात. ती आल्यावर फॅक्टरीला जोडून माल काढायला सुरवात होते. हा नेहमीचा व्यवसाय झाला. परंतु ताजी गोष्ट—

गॅस भरलेला नवीन सिलेंडर मुंबईहून आला. त्या सिलेंडरला माझेजवळ असलेल्या अनेक वायरींगपैकी कोणतीच वायर काही केल्या लागत नसे. या धंद्यात मुरलेले मेकॅनिकही आणून झाले. तसेच दुसऱ्या फॅक्टरीमधून कितीतरी वायरी आणून त्यांचे नट बदली केले. परंतु सिलेंडरला एकही नट लागत नव्हता. असे सतत प्रयत्न करीत चार पाच दिवस गेले. शेवटी श्रीबाबांच्या शिवाय दुसरे कोणी हे संकट दूर करणार नाही. अशी समजूत करून घेऊन मी साईबाबांचे स्मरण करून गाऱ्हाणे घातले की हे दयाघना, करुणाकरा, दीनदुबळ्यांच्या दातारा श्रीसाईसमर्था माझ्यावर असे हे संकट आलेले आहे. माझे यजमान सध्या बाहेरगावी गेलेले आहेत. ते लवकर घरी येणार नाहीत. तेव्हा आता तुम्हीच मार्ग दाखवून हे संकट दूर करा, असे म्हणतच मी झोपी गेले.

बराच वेळ शांत झोप लागली आणि अगदी पहाटे पहाटे श्रीबाबा माझ्या स्वप्नात आले, आणि आपल्या झोळीतून एक नट काढून दाखविला व म्हणाले की, बाळे मला यातील थोडेसे समजते आणि ते तसेच दुकानात गेले. (दुकान म्हणजे घरातीलच रस्त्याच्या बाजूकडील फॅक्टरी असलेली खोली.)

सकाळी इतर सर्व कामे आटोपून परत मी स्वतः नट लावून पाहिला. तो काय आश्चर्य ? तो जो नट चार पाच दिवस लागत नव्हता तोच नट पहिल्याच वेळेला अगदी व्यवस्थित आणि इतका चांगला लागला की, सुलभ रितीने नंतर माल येऊ लागला. ही सर्व श्रीसाईबाबांची कृपा नाही असे कोण म्हणेल ? आता माझे दिवस फार चांगले जात आहेत.

# बाबांचे दिव्य अनुभव

-श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, १९९ गुजरलेन
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे

" माझे माणूस कितीही दूर ।
असेना साता समुद्रापार ।
चिडीसारखा मी बांधुनिया दोर ।
ओढुनी शिर्डीस आणतो ॥ "

श्रीबाबांच्या वरील शब्दांची सत्यता नुकतीच म्हणजे साईलीला लेखक-कवींचे चतुर्थ संमेलनाच्या निमित्ताने मी स्वतः अनुभवली. बाबा हे भक्तांचे मनोगत जाणतात. त्यांच्या इच्छा पूर्ण करतात. गेल्या मार्चमधील गोष्ट. शिर्डी येथे साईलीला लेखक-कवींचे स्नेहसंमेलन होते. संमेलनास आपणही उपस्थित रहावे ही अगदी मनापासूनची इच्छा, कारण मागील दोन वर्षे आधी कळवूनही काही अपरिहार्य अडचणीमुळे स्नेह-संमेलनाचा लाभ घेता आला नाही. आणि म्हणूनच मनाला सारखी रूखरूख वाटायची निदान यावर्षी तरी जायला मिळावे. जागा आरक्षीत करण्यासाठी मी कळविलेसुद्धा.

साईबाबांना प्रार्थना केली, " बाबा ! तुझ्या मनात आहे तरी काय ? दरवर्षी संमेलनास माझी येण्याची इच्छा असते परंतु ऐनवेळी मात्र आर्थिक अडचणीमुळे प्रवास रद्द होतो. निदान एकदा तरी संमेलनास उपस्थित रहावे ही माझी इच्छा यावेळी पूर्ण कर ! " संमेलनाच्या पूर्वीच्या तारखेत बदल झाल्याने व तशातच अचानक काही अडचणी निर्माण झाल्याने यावेळी सुद्धा संमेलनास जाता येणार नाही याची खात्री झाल्याने मन उदास झाले. संमेलन अवघे चार दिवसावर येऊन ठेपले. इकडे मन साईभेटीसाठी फार आतूर होते परंतु जावयास मिळणार नसल्याने वाईटही वाटत होते.

—आणि अचानक माझे जिवलग स्नेही जगदीश देवपूरकर यांच्या पत्ररूपाने साई आले. जगदीश नुकताच मोठ्या आजारातून उठला होता. संप परिस्थितीमुळे त्याच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठीसुद्धा धुळयाला जाणे जमत नव्हते. त्याने

पत्रात लिहिले, 'बाबांच्या कृपेनेच मी आजारातून बाचलो. आता त्यांच्या भेटीला जायचे आहे तरी तू सुद्धा माझ्याबरोबर शिर्डीस चल. मी धुळयाला वाट पहातोय.'

आणि मग मला निघावेच लागले. जगदीश देवपूरकर व आदरणीय आप्पासाहेब मोगलाईकर यांच्याबरोबर प्रवास व मधुर सहवास ही आनंददायक बाब; आणि खरोखरच आम्ही खानदेशी मंडळींनी संमेलनाचा पुरेपूर लाभ उठवला. बाबांचे मनसोक्त दर्शन व सेवा घडली. अनेक सहृदयांच्या भेटी घडल्या. डॉ. सुमति खानविलकर, प्रा. गुंडेराव पटवारी, अनिल रसाळ, मधुकर वखारे इ. नवीन मित्रमंडळी भेटली.

अशाप्रकारे कैक दिवसांची संमेलनास जाण्याची इच्छा पूर्ण झाली आणि म्हणूनच बाबांच्या त्या वचनाची सत्यता मला अनुभवास आल्याने आनंद होतो. धन्य ते साईबाबा, आजही शेकडो मैल दूर असलेल्या भक्ताचे मनोगत जाणून आपल्या माणसास शिर्डीस ओढून आणतात हेच खरे.

● "शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी"

या साईवचनाचासुद्धा एप्रिल महिन्यात अनुभव आला. माझा वडिल मुलगा कु. मनोज याची जन्म तारीख ३० एप्रिल. सतत दहा वर्षे आम्ही त्याचा वाढदिवस साजरा करत आलो परंतु यावेळी कधीही इतक्या तीव्रतेने न भासणारी आर्थिक अडचण मात्र मोठ्या प्रमाणावर उभी राहिली (संपात भाग घेतल्याने आमचा पगार खूपच कापून आल्याने पैसेच शिल्लक नव्हते.) लाडक्या मनोजचा वाढदिवस यावेळी काहीच गोडधोड न करता नुसत्या शुभेच्छेनेच साजरा करावा लागणार होता. या कल्पनेनेच मन दुःखाने भरून आले. जसा तसा ३० एप्रिल १९७८ चा दिवस उगवला. सकाळी उठलो. स्नानसंध्या केली व साईंच्या आशिर्वाद फोटो पुढे उभा राहून आर्तभावाने साईंना विनवणी केली, 'बाबा दरवर्षी मनोजचा वाढदिवस उत्साहात साजरा करीत आलो पण या वर्षी त्याला नवे कपडे घेतले नाहीत एवढेच काय त्याचे तोंड गोड करावयासमुद्धा घरात पाव आणा नाही.. महिन्याचा शेवटचा दिवस. पगाराला दोन-चार दिवस बाकी. काय करावे तूच लाज राख.'

अशी प्रार्थना करीत असतानाच सकाळच्या प्रहरीच एका विद्यार्थिनीने तिच्याकडील शिकवणीचे राहिलेले पैसे न मागता आणून दिले. मग काय विचारता.

मनोजला बाजारातून तयार ड्रेस घेतला. गोड मिठाई आणली व नेहमीप्रमाणेच त्याचा वाढदिवस आनंदात साजरा झाला.

बाबांनी आपल्या भक्तांना दिलेली वचने अगदी खरी आहेत. शुद्ध मनाने बाबांना शरण गेले म्हणजे त्यांची संकटे बाबा दूर करतातच. बाबा भक्तांच्या हाकेला किती लवकर धावतात याचे हे सुंदर उदाहरण आहे.

श्रीसाईबाबांवर असीम श्रद्धा ठेवली व शुद्ध मनाने भक्ती केली तर बाबा हमखास अनुभव देतात यासाठीच मी लिहिलेली कविता नकळत ओठावर येते ती अशी —

“ जगात फक्त साई समर्थ
सान्या भक्तांचा घेतात बोज...
भक्ती शाबूत असेल तर
अनुभव सुद्धा मिळतील रोज ! ”


घरबसल्या मनोरंजनासाठी

हि. मा. व्हॉइस कं. चे. व फिल्म डिव्हीजनचे आर्टिस्ट

गोल्ड मेडॅलिस्ट



← श्री. जी. वाय. मुणगेकर

एकेकाळी सिनेमा नटनटींच्या हुबेहुब आवाजासहीत साभिनय एकपात्री संगीत विनोदी नकलांनी संयुक्त महाराष्ट्रात प्रख्यात असलेले ‘यमुनाजळी फेम’ नकलाकार व लोकप्रिय दोन डझन रेकॉर्डसचे लेखक ‘रामरावण युद्ध रेकॉर्ड फेम’ स्टेज आर्टिस्ट श्री. मुणगेकर यांच्या ‘नवरा पहावा करून’ F, T. –72–6, ‘नृत्य अप्सरा मेनका’ N. 880 3, ‘नारदाचे लग्न’ F. T. 15875, ‘स्वयंपाक घरातील संप’ F. T. 17216, इत्यादी रेकॉर्डस अवश्य संग्रही ठेवा.

# साईबाबांनी पोथी वाचून घेतली

—सौ. विनिता एन्. डाहाके
'साई निवास', सुधीर कॉलनी, अकोला.

● मी साईबाबांची भक्ती १६ वर्षांपासून करीत आहे. त्यांनी मला आत्मविश्वास निर्माण करण्यास बरेच चमत्कार दाखवले. "चमत्काराशिवाय नमस्कार नाही" अशी म्हण आहे.

मी साईबाबांच्या पोथीची बरेचदा पारायणे केली. पण प्रत्येक शब्द न् शब्दाचा अर्थ आकलन झाला नव्हता. पण तो मला बाबांनी पूर्ण समजावून सांगितला.

मागच्या फेब्रुवारी ७७ ची गोष्ट. लागोपाठ प्रत्येक महिन्याला ३ गुरुपुष्यामृते येऊन गेली तेव्हा मी धार्मिक बायांजवळ बोलून गेले की, 'मी साईबाबांची पोथी वाचीन तेव्हा तुम्ही ऐकायला येणार का?' त्यांनी उत्साहाने होकार दिला. पण संसाराच्या कारखान्यात मी विसरून गेले. मग शेवटच्या गुरुपुष्यामृताच्या आठ दिवस आधी एकाएकी मला श्वासाचा झटका आला. दोन वर्षांपासून आलेला नव्हता. दोन दिवस सतत त्रास झाला. सारखा साईबाबाचा धावा सुरू. महिन्याची बायांची अडचण असते. ती पण अडचण आल्यामुळे बाबांची उदीपण घेता येईना. सारखे बाबांना विचारीत होते, साईबाबा, सांगा ना हो कुठे चुकले? तुम्हाला काय हवं? पण काही कळेना. शेवटी दुसऱ्या रात्रीला पोथी वाचायचे हे विसरल्याची आठवण झाली. बाबांना कबूल केले. तोच चमत्कार असा की, १५ मिनिटात माझा श्वास एकदम कमी झाला. शिवाय लगेच झोप लागली तो सकाळीच जाग आली. लगेच गुरुवारी गुरुपुष्यामृत होते त्यादिवशी सुरुवात केली.

आपण साईबाबांच्या पोथीत वाचले की, जोग वगैरे भक्तांकडून साईबाबांनी सहस्र नामावली, ज्ञानेश्वरी वाचून घेतली. त्याचप्रमाणे माझ्याकडून अशातऱ्हेने वाचून घेतली. चार-पाच महिलांसमवेत चर्चा करून संपूर्ण समजावून घेतली व अकरा दिवसानंतर आनंदाने पारायण करून जेवणे घातली.

आता साईबाबा माझ्याकडून आठवण देऊन हे सारे करून घेतात. त्याला पण भक्तीच्या पोटी माया असावी लागते. साईवचनातील ह्या पंक्ती मला आठवल्या.—

"जो जो मज भजे। जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे मीही त्यासी।
तुमचा मी भार वाहीन सर्वथा। नव्हे हे अन्यथा वचन माझे।"

# बाबांनी माझं रिझर्वेशन आधीच ◆◆◆ करून ठेवलं! ◆◆◆

—श्री. जगन्नाथ कुलकर्णी
७१ स्वाती सोसायटी,
श्रीसाई सदन, पद्मावती, पुणे–९

● माझा व्यवसाय फोटोग्राफरचा आहे. गेली पंचवीस वर्षे पुण्यात माझा फोटो स्टुडियो आहे. लग्नसराईच्या दिवसात हल्ली फोटोग्राफरला पुष्कळ काम असतं. लग्नात एकवेळ गुरुजी नसेल तर चालेल पण फोटोग्राफर असल्याशिवाय हल्ली लग्न होत नाही. हा लग्न फोटो सीझन एप्रिल १५ ते जून १५ तारखेपर्यंत असतो. या काळात फोटोग्राफरला वेळ वाया घालवून चालत नाही. या वर्षी या सीझनात मला एका मित्राच्या गावी लग्नाच्या फोटोची ऑर्डर घ्यावी लागली. मे महिन्याच्या २० तारखेला निझामपुरला लग्न होतं. मी १८ तारखेला रात्री पुणे ते धुळे गाडीनं धुळ्याला गेलो व गाडी बदलून १९ तारखेला सकाळी १० वाजता निझामपुरला पोचलो. लग्न प्रसंगाचे सर्व फोटो काढून मी २१ तारखेला परत निघालो. माझ्या मित्राला मी विचारलं परत जाताना मला लौकर गाड्या मिळून मी लौकर पुण्यास कसा पोचेन? त्यानं मला सांगितलं, तुम्ही नाशिकला जा व नाशिकहून पुण्याला जाणाऱ्या पुष्कळ गाड्या आहेत. मे महिन्याची गर्दी फार आहे. तरी पण एका माणसाला सहज जागा मिळेल. निझामपूर गावी व्यापारी पेठ आहे. पण लहान गाव. रिझर्वेशनची सोय नाही. तरी दुपारी ३ वाजता नंदुरबार ते नाशिक ही गाडी निझामपुरला आली व मला जागा मिळाली. रात्री ८ वाजता मी नाशिकला गेलो. पुण्याच्या गाडीची चौकशी केली. रात्री १० वाजता व पुन्हा १०॥ वाजता अशा दोन गाड्या पुण्याला जाणाऱ्या आहेत. सर्व रिझर्वेशन संपलं आहे. आयत्या वेळी काही लोक घेतात. तुम्ही फलाटावर नंबर लावा. इतक्यात माझा एक मित्र मला भेटला. मला म्हणाला जागा मिळाली तर ठीक आहे, नाहीतर रात्री इथं थांबू नको माझ्याकडे ये. समोरच्या हॉटेलमध्ये रूम नं. ४ मध्ये मी आहे.

फलाटावर बाके होती तिथे मी नंबर लावून बसलो. माझा चौथा नंबर होता. पावणेदहा वाजता गाडी लागली. रिझर्वेशन असेल त्यांनी आत बसा व नसेल त्यांनी नंबरवर बसा असं लाऊडस्पीकरवर सांगितलं. माझ्या आधीच्या नंबरवर बसलेले

लोक रिझर्वेशन असल्यामुळे आत जाऊन बसले. त्यामुळे माझा पहिलाच नंबर आला. पण लोकांनी दरवाजाजवळ व आजूबाजूला एकच गर्दी केली. रिझर्वेशन नसलेले लोक पण आत घुसत होते. मी गर्दीकडे नुसता बघत राहिलो. मनात विचार आला आता काही या गाडीने अथवा दुसऱ्या गाडीने मला जायला मिळणार नाही. सकाळी रिझर्वेशन करून मगच जावे लागेल. कामाचा एक दिवस वाया जाणार.

बाबांचे नामस्मरण करत गर्दीकडे बघत बसलो. इतक्यात गर्दीतून वाट काढत एक गृहस्थ माझ्या जवळ आले. तुम्हाला पुण्याला जायचंय ना ! हे घ्या रिझर्वेशन तिकीट. नंबर ११ वर जाऊन बसा. त्यांनी कागदाची एक घडी माझ्या हातात दिली. मी जरा गोंधळून गेलो. लगेच सावरलो. गर्दीतून वाट काढत मी सामानासह गाडीत जाऊन ११ नंबरवर सामान ठेवून बाहेर आलो. तिकिटाचे सर्व पैसे त्यांना दिले. नाव पत्ता विचारला. स्वारगेटजवळ महर्षी नगर आहे. त्या ठिकाणी माझे नातलग राहतात. माझे जाणे रहित झाले म्हणून तिकीट तुम्हाला दिले. मी त्यांचे आभार मानले व पुन्हा गाडीत येऊन बसलो.

गाडी सुरू झाली. कंडक्टरने प्रत्येकाचे तिकीट तपासण्यासाठी मागितले. मी कागद उघडला. पाहतो तो ते तिकीट माझ्या नावाचे होते. मी आश्चर्यचकित झालो. मला एकदम बाबांची आठवण झाली. माझ्यासारख्या सामान्य भक्तासाठी त्यांनी घेतलेले कष्ट पाहून डोळ्यात अश्रू आले. बाबांचे नामस्मरण करत सर्व प्रवास संपवला. पहाटे ५ वाजता पुण्याला आलो. मी तिकीट जपून ठेवले आहे. घरी आलो. स्वच्छ हातपाय तोंड धुतले व नित्याप्रमाणे बाबांना नमस्कार करून काकड आरती सुरू केली.

भू खेचर व्यापूनि अवघे हृत्कमली राहसी, तोची दत्तदेव तू शिरडी राहुनी, येथे अन्यत्र ही तू भक्तास्तव धावसी, निरसुनिया संकटा दासा अनुभव दाविसी,

न कळे त्वल्लीला ही कोण्या देवा वा मानवा ।
काकड आरती करितो साईनाथ देवा ॥

बाबांच्या लीला खरोखरच अतर्क्य आहेत. आपल्या सर्व भक्तांना बाबांनी सदैव असेच सुखी ठेवावे हीच त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना.

# जीवन हे साईकृपेची छाया

–सौ. सिंधु देविदास मुळीक
द्वारा श्री. डी. आर. मुळीक
विमा औषधालय, कुन्हारी,
दुर्ग, (म. प्र.)

'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती'

वरील उक्तीनुसार आमचे आजचे जीवन दैवत हे साईनाथ महाराज बनले आहे. पंधरा वर्षापूर्वीच्या काळात मला साईबाबांविषयी फारशी कल्पना नव्हती. केवळ साईनाथ नावाची कुणी तरी थोर संत विभूति होऊन गेलेली आहे, एवढेच माहीत होते. परंतु कधी कधी भक्तांना जशी ईश्वराची ओढ असते तद्वतच ईश्वराला देखील भक्तांविषयी तळमळ व स्वतःकडे भक्तांचे लक्ष वेधून घेण्याची ओढ असते आणि म्हणूनच साईबाबा नेहमी म्हणत की मी भक्तांना मुंग्यांच्या रांगेप्रमाणे स्वतःकडे ओढून आणील.

तेव्हा माझ्याही जीवनात असाच एक प्रसंग आला शिक्षण व्यवसायात मला दक्षिण भारतला जाण्याची संधी लाभली त्यात शिरडी हेही महत्वाचे स्थळ होते. माझी नोकरी नवीन व अनुभवदेखील नवा त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बदली होऊ नये म्हणून मनाला हुरहूर लागली होती. परंतु पाच वर्षांनी बदली होणे हे अनिवार्यच ठरले होते तेव्हा धास्तावलेल्या मनाच्या संभ्रम अवस्थेतच मनाला पक्की खात्री नसून देखील मी साईबाबांजवळ साकडे घातले की देवा माझी बदली यंदा रद्द होईल तर फारच बरे होईल, आणि याची प्रचिती अशी झाली की त्यावर्षी खरोखरच माझी बदली रद्द झाली आणि असाध्य गोष्ट साध्य झाल्यामुळे चमत्काराशिवाय नमस्कार नाही त्याप्रमाणे त्या दिवसापासून आजपर्यंत माझी साईबाबा चरणी दृढ श्रद्धा जडली आहे. तसे सर्व प्रथम साईबाबांचे दर्शन घेतल्यावर नास्तिक व्यक्ति जरी असेल तरी सहजच त्यांच्या चरणी नम्र होते, व आपला सर्व भार त्यांचेवर सोपवते.

नंतर योगायोगाने माझ्या जीवनाचा महत्वाचा टप्पा म्हणजे माझे पतिराजही मला साईभक्तच लाभले आहे. हा संबंध जुळवून येण्यासंबंधी त्यांचे म्हणणे असे पडले की साईबाबांचा फोटो माझ्या माहेरी असलेला पाहून ही मंडळी देखील साईभक्तच असेल असे समजूनच हे स्थळ पसंत केले. माझे वडिलदेखील की

ज्यांनी कधी कोणत्याच फोटोला हार घातलेला नाही व नमस्कारहि केला नाही ते देखील मी शिरडीहून फोटो आणल्यापासून रोज त्यांच्या जवळ अगरबत्ती लावू लागले कारण त्यांना स्वातंत्र्य संग्राम सैनिकी जीवनात कधीच पुजा अर्चेसाठी वेळ मिळाला नाही व लक्षही दिले नाही.

आता साईकृपा प्रसादाने मला दोन मुले व दोन मुली असून माझा पूर्ण परिवारच साईभक्त बनलेला आहे. माझ्या सर्वात लहान पाच वर्षांच्या मुलाला देखील शिरडी देवस्थानात होत असलेल्या आरत्या साईस्तवन वगैरे पाठ आहेत. आम्ही बहुतेक दरवर्षी दिपवाळीत लक्ष्मीपूजनाला शिरडीलाच असतो. दिवाळीच्या सुट्टया बहुतेक तिथेच घालविण्याचा प्रयत्न करतो. कारण दिवाळीच्या सुमारासच आमच्या घरची वडील मंडळी माझे सासरे व वडील निर्वतल्यामुळे घरी मन अस्वस्थ वाटते व शिरडीस गेल्यानंतर मनाला मानसिक समाधान लाभते.

संसार हे सुखदुःखाचे आगर आहे परंतु त्यावर साईबाबा हे रामबाण औषध असल्यामुळे ज्या ज्या वेळी संसारात व समाजात दुःखाची चाहूल लागते त्या त्या वेळी साईमाऊली आमचे रक्षण करते. श्रीसाईबाबांचा आम्हाला आनंदी जीवनात फारच मोठा आधार वाटतो. संकट आल्याने दुःख होण्याऐवजी या संकटातून साई-बाबा आपले निवारण करील ही मनाची खात्री असल्याने व दृढ विश्वास असल्यामुळे मनाला हुरहुर लागून राहत नाही. मनाची स्थिती शांत निश्चिंत असते.

आजवर ज्या जीवनात चांगल्या गोष्टी साईकृपेने लाभल्या व आमच्या पाठीशी ही सदोदित साई छाया आहे ही अशीच चिरकाल राहो व आमच्या प्रमाणे सर्वच देशबांधवांना साईकृपाछत्र लाभो. साईकृपेचा लाभ चिरंतन मिळत राहो हीच त्या प्रेमळ पिता श्रीसाईबाबांचे चरणी विनम्र प्रार्थना व विनंती करते.

## *** धन्वंतरी बाबा ***

—श्री. पां. बा. भुतकर
२३/१६७५, अभ्युदयनगर, मुंबई – ३३

● रात्री बारा सव्वाबाराचा सुमार! अशा अवेळी दारावर टकटक ऐकू आली. यावेळी कोण आले आहे याचा विचार करीत मी दिवा लावला व दार उघडले. दारात माझ्या जिवलग मित्राची पत्नी उभी होती. तिचा चेहरा भीतीने व काळजीने ग्रस्त झाल्यासारखा दिसला.

ती घरात आली व मला सांगू लागली की, " भाऊजी, ह्यांची तब्येत एकाएकी बिघडली आहे. काय होतंय हे मला कळत नाही. या मध्यरात्री डॉक्टर कुठे शोधू ! काय उपाय करू ? मला काही सुचत नाही. त्यांच्या वेदना पाहून मी आपणाकडे आले आहे. "

'वहिनी, तुम्ही घरी जा मी पाच दहा मिनिटातच येतो.' असे सांगून मी तिला पाठवले. एक दोन मिनिटे शांतपणे विचार केला. हात, पाय व तोंड धुतले. कपाटातून थोडी उदी काढून घेतली. टेबलावर असलेल्या साईबाबांच्या प्रतिमेसमोर उदीची पुडी ठेवली. मनाशी संकल्प केला की या उदीमुळे माझ्या मित्राचे दुखणे क्षणाच मनाप्रमाणे कमी होईल. साईबाबांना प्रणाम केला व कपडे चढवून उदी घेऊन निघालो. मित्राच्या घरी जाऊन पहातो तो काय ! माझा मित्र असह्य वेदनांनी गडबडा लोळत होता व ओरडत होता. त्याला काहीच सांगता येत नव्हते. असह्य वेदनांनी त्याचा चेहरा पार उतरून गेला होता. खिन्न मनाने व काय करावे या चिंतेने त्याची पत्नी त्याच्या शेजारी बसली होती.

मला आलेला पहाताच तिच्या मनात थोडा धीर आला. मी चटकन तिला पाणी आणावयास सांगितले. तिने आणलेल्या पेल्यात थोडीशी उदी टाकली. ही उदी संजीवनीसारखी उपयोगी पडेल हा विश्वास मनाशी पक्का केला. मित्र गडबडा लोळत असतानाच कसातरी त्याला सावरून ते उदी मिश्रित पाणी त्याला पाजले.

थोडा वेळ स्वस्थ चित्ताने पहात बसलो. हळूहळू त्याचे ओरडणे कमी होत होते. गडबडा लोळणेदेखील कमी होत होते. मी पुडीतील थोडी उदी हातात घेऊन हळूहळू त्याच्या सर्व अंगाला चोळत बसलो. पाच मिनिटे हा कार्यक्रम चालू होता. त्याला हळूहळू बरे वाटत आहे व त्याच्या वेदना कमी होत आहेत हे त्याच्या चेहऱ्यावरून मला कळून आले. त्याच्या डोळ्यावरून त्याला झोप येत असल्याचे दिसले. माझे उदी लावण्याचे काम चालूच होते. पंधरा मिनिटानंतर तो शांतपणे झोपी गेला.

या सर्व गोष्टी होईपर्यंत रात्रीचे दोन वाजले होते. मित्रास शांतपणे झोप लागली होती. मित्राच्या पत्नीस आता खूपच धीर आला होता. तरीही तिने पहाटेपर्यंत थांबण्याची विनंती केली. नंतर तिने चहा केला. गप्पा गोष्टी करता करता पहाटेचे पाच वाजले. याच वेळी माझा मित्र जागा झाला व मला तिथे त्यावेळी पाहून त्याला आश्चर्य वाटले ! तो पटकन् म्हणाला, 'अरे, यावेळी तू इकडे कसा ?'

नंतर मात्र तो थोडा विचारात पडला. व मला सांगू लागला की, "आदल्या रात्री त्याचे सर्व अंग वेदनांनी दुखत होते. मध्यरात्रीच्या सुमारास एक शुभ्र दाढीवाले गृहस्थ तेथे आले व त्याला शांत रहाण्याविषयी हाताने खुणाविले. नंतर ते त्याच्या शेजारी बसून हळुवार हाताने त्याच्या अंगाला उदी लावीत होते व त्याच्या वेदना कमी होत होत्या. त्याने पुढे सांगितले की, ते हात साधेसुधे नसून प्रत्यक्ष धन्वंतरीचेच असल्याचा त्याला साक्षात्कार झाला. त्या व्यक्तीने त्याला सांगितले की, आता तू पूर्णपणे बरा झाला आहेस ! मी आता निघालो. तू मला सवडीने भेट !"

त्याने सांगितलेली हकीकत ऐकून मला व त्याच्या पत्नीला गहिवरून आले. माझ्या मनात विचार आला की माझ्या मित्रासाठी साईंनी किती त्रास घेतला. धन्य ! धन्य ! साई की ज्यानी भक्ताची लाज राखली !

त्यानंतर बरोबर एक आठवड्यानी मी माझी पत्नी, मित्र व त्याची पत्नी असे श्रीक्षेत्र शिर्डीस गेलो. मंदिरात पाऊल ठेवले. लगेच माझा मित्र आश्चर्याने माझ्याकडे पाहून म्हणाला की हेच ते महाराज ! की ज्यानी त्या रात्री माझी सेवा केली व मायेचा हात माझ्या अंगावरून फिरवला. त्या दिवसापासून ती दोघेही साईंची निस्सीम भक्त बनली. साईचिया दासा नये भय चिंता !


## श्रीसाईलीला — खास मालिकेतील तिसरा विशेषांक
## श्रीसाई समकालीन संत विशेषांक

या अंकात श्रीसंत उपासनी बाबा, श्रीसंत गजानन महाराज, श्रीमेहेरबाबा, श्रीहजरत बाबा जान, श्री. गाडगे महाराज श्रीदासगणू महाराज श्री नित्यानंदजी, श्रीराममारुती महाराज इ. श्रीसाई समकालीन संतांवर अधिकारी व्यक्तींनी लिहिलेले अभ्यासपूर्ण लेख

जाने. १९७९ मध्ये प्रसिद्ध होणार

या अंकात कविता प्रसिद्ध होणार नाहीत.

# बक्षिस मिळाले व शिरडीस आलो

****************************

—सौ. शोभा अ. वायंगणकर
साईनिवास, ३७२९ पेटकिल्ला, रत्नागिरी.

* भक्तांची इच्छा बाबांनीच पुरवावी हे बाबांचे ब्रीदच आहे. साधारणपणे सात वर्षे झाली असतील. त्यावेळी कोणी शिरडीला जाऊन आला व तिकडील बाबांचा महिमा सांगू लागला की माझे मन हुरळून जाई. मला वाटे बाबांचे मला केव्हा आपले शिर्डीत दर्शन होणार ? शिर्डी खूप लांब आहे. बरोबर सोबत पाहिजे. भरपूर पैसे हवेत. हे सर्व प्रश्न पुन्हा मनात येत. पण आज ना उद्या बाबा मला शिर्डीला नेतीलच या आनंदात मी वाट पहात होते. असे होता होता एक दिवस आमच्या पोस्ट खात्यातर्फे हिंदी परीक्षा पास होणाऱ्यांना बक्षीस मिळेल असे लिहून कळविले. माझ्या पतीलासुद्धा परीक्षेची संधी आली. त्यावेळी मी हात जोडून बाबांना सांगितले की बाबा जर का हे परीक्षेत पास झाले आणि बक्षीसरुपी पैसे मिळाले तर तेच पैसे घेऊन आपल्या पायाशी शिर्डीला येऊ. ही गोष्ट लगेच त्यांनासुद्धा जाऊन सांगितली की जर तुम्ही पास झालात तर आपण ते बक्षीस मिळालेले पैसे घेऊन शिर्डीला जायचे. त्यावर ते हसून म्हणाले, बघू तुझ्या बाबांची इच्छा ! आणि काय आनंदाची गोष्ट बघा ! बाबांनी माझी विनंती ऐकली आणि एक का दोन्ही परीक्षेत ते पास झाले, व बक्षीस पण मिळाले.

आम्ही दोघं बाबांच्या दर्शनास शिर्डीला निघालो. माझा आनंद गगनात मावेना. रत्नागिरीहून आम्ही मुंबईला आलो. मुंबईहून आम्ही त्यांचे स्नेही ( तेही साईभक्तच आहेत. ) त्यांना सोबत घेऊन रेल्वेने मनमाड स्टेशनवरून कोपरगावला आलो तेव्हा रात्रीचे ९ वाजून गेले होते. मला सारखी घाई लागली होती. केव्हा एकदा गाडी पोहोचते. आम्ही साडेदहाला गाडीतून उतरलो. मी तशीच बाबांच्या समाधीमंदिराकडे धाव घेतली. बाबा त्यावेळी माझी वाटच पहात होते. पांढरीशुभ्र चादर पांघरून ते शांतपणे आपल्या आसनावर बसलेले होते. मी धावतच जाऊन त्यांचे चरणावर माथा ठेवला. आनंदाश्रूंनी मी बाबांच्या चरणावर अभिषेक केला माझे दैवत मला सापडले होते. ती बाबांची पहिली भेट मनाशी जपून ठेवली आहे. पाठीमागून भक्त सांगू लागले. आता सकाळी या. दरवाजा बंद होत आहे, तेव्हा

मी मागे वळले. खरोखरच भक्तगण आपापल्या घरी जावयास निघाले होते. मग आम्ही दुसऱ्या दिवशी बाबांची सर्व पूजाअर्चा, काकड आरती, दुपारची आरती, शेजारती सर्व सोहळा आनंदाने पाहून बाबांचा निरोप घेतला आणि पुन्हा पुन्हा आपल्या दर्शनाचा योग आणा हीच त्यांच्या चरणी विनंती केली.


## साधुसंत येति घरा । तोचि दिवाळी दसरा

— साईभक्तांना सुवर्णसंधी —

आम्ही साईभक्तांना रोजच्या पुजेसाठी श्रीसाईबाबा ( शिर्डी ) यांच्या पंचधातूच्या अत्यंत टिकाऊ व मजबूत अशा विविध आकाराच्या मूर्ती बनवित आहोत. त्यात —

१) बाबांची शिळाखंडावरील बैठकीची
२) द्वारकामाईतील उत्कृष्ट पोझ
३) आशीर्वादाची लोकप्रिय मूर्ति, इत्यादी मूर्ती आहेत.

**अधिक माहितीसाठी आजच भेटा अगर लिहा :—**

**मनोहर ब. पितळे,** पितळे वाडी, हनुमान रोड,
विलेपार्ले ( पूर्व ), मुंबई – ४०००५७.
टेलीफोन — ५७६२९८

**वि. सू.** बाहेरगावी मूर्ति पोस्टाने पाठवू.

# कृपाळू साई माऊली

-श्री. मनोहर पंडित
सोनमा निवास, वर्तकवाडी, विरार

* १९४७ सालापर्यंत श्रीसाईबाबा यांचे नावही मला माहीत नव्हते. २६।४।४७ रोजी कै. अण्णा चिंचणकर ट्रस्टतर्फे चिंचणी येथे बाबांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतर सदर देवस्थानच्या पूजेची व्यवस्था आमचे वर्तकबंधू यांच्याकडे कै. रघुवीर पुरंदरे यांनी सोपविली. ४७ ते ५२ सालापर्यंत तिथे देवस्थानाला काही ठराविक भक्त येत असत. मी शिक्षक म्हणून त्यावेळी बोरीवली येथे काम करीत होतो. त्यानंतर माझी बदली दहिसर, बोरीवली व नंतर १९५३ साली चिंचणी येथे झाली. त्यावेळी कै. श्रीपाद बा. देव (वकील) यांच्या संमतीने देवळाच्या मागील दोन्ही खोल्यांमध्ये माझ्या बंधूच्या ऐवजी मला रहावयास जागा मिळाली आणि त्यावेळेपासून मी बाबांची मनोभावे पूजा करू लागलो. कै. देव वकील यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे ५३ ते ५७ सालात वैशाख शुद्ध ६ व ७ या दोन्ही दिवशी मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होऊ लागला. त्यावेळेपासून बाबांचे महत्त्व वाढून देवळात अनेक भक्त येऊ लागले. १९५८ च्या सप्टेंबर महिन्यात मला अचानक वाताचा झटका आला आणि मी दोन्ही पायाने पांगळा झालो. डॉक्टर, वैद्य यांचे अनेक उपचार केले पण काहीही फरक पडला नाही. मी मात्र बाबांची मनोभावे पूजा करीत असे. त्यावेळी माझी तीन लहान मुले होती. एकंदर सांपत्तिक परिस्थिती खालावत चालली. पगार कमी मिळू लागला. परंतु बाबांच्या कृपेने मला माझे सहकारी त्यावेळी मदत करीत असत.

नोव्हेंबर १९५८ महिन्यात एका रात्री मला एक भयंकर स्वप्न पडले. एक काळा पुरुष माझ्या डोक्याजवळ उभा होता. जणू काही काळपुरुषच. मी घाबरलो व मोठ्याने ओरडू लागलो. बाबा, बाबा मला वाचवा ! आणि खरोखर तो काळपुरुष माझ्या डोक्याकडून धावत गेला. मला घाम सुटला. मी जागा झालो तेव्हा माझी पत्नी व भाऊ उठला व मला काय झाले म्हणून विचारू लागले. मी पाणी प्यालो. पडलेले स्वप्न सांगितले व बाबांची उदी लावली, व पुन्हा झोपलो आणि नवल म्हणजे बाबांचेच एक भक्त डॉ. मधुकर बाबरे हे सकाळी मला पाहवयास आले त्यांनी मला औषध लिहून दिले आणि त्या दिवसापासून माझ्या दुखण्यात फरक पडून मी हळूहळू चालू लागलो. एप्रिल १९५९ सालापर्यंत मी संपूर्ण बरा झालो व पुढे बाबांच्या कृपेने मला चांगली शाळा व पोष्टाचे काम मिळाले. आज मी बाबांच्या

कृपेने सुखी आहे. मात्र बाबांची उदी लावल्याशिवाय कुठेही बाहेर जात नाही. कै. दाभोळकरकृत 'साईसच्चरित्रा'मधील अध्याय रोज वाचतो.

खरोखर बाबा भक्तांची परीक्षा पाहतात यात नवल नाही.

# हरवलेली म्हैस सापडली

— श्री. ए. पी. लवंदे
करंगुट, गोवा

● मध्यंतरी एकाएकी आमची म्हैस नाहीशी झाली. दोन दिवस तपास केला पण कुठेच सापडेना. डोंगर, गाव पालथे घातले तरी सापडेना. शेवटी माझ्या मनात विचार आला. मी खिशातील बाबांचा फोटो काढून नमस्कार केला व म्हटले, " माझी चूक झाली. आता माझी म्हैस माझ्या नजरेला घाल मी तुझा अनुभव लवकरच श्रीसाईलीलेत प्रसिद्ध करीन. माझा आणखी अंत पाहू नकोस. " तोच काय आश्चर्य तिकडे जवळच एका झुडुपात म्हैस आपल्या तान्ह्या वासराला जन्म देऊन बसलेली आढळली. ही सारी बाबांचीच लीला नाही काय !

माझा जो जाहला कायावाचामनी
त्याचा मी ऋणी सर्वकाळ

या बाबांच्या शब्दांची मला खात्री पटली.

◆◆◆◆◆◆

## साईभक्त श्री. वायंगणकर यांचे निधन

वेंगुर्ले येथील वयोवृद्ध साईभक्त श्री. परशुरामपंत वायंगणकर यांचे ५-१०-७८ रोजी त्यांच्या निवासस्थानी अचानक निधन झाले. ते साईबाबा संस्थानचे आजीव सदस्य फार पूर्वीपासून होते. शिरडी येथे त्यांनी अनेक देणग्या दिल्या होत्या. निधनसमयी त्यांचे वय ८९ वर्षांचे होते.

# महान संकटातून बाबांनीच वाचवले

******************************

—लीलावती कां. गुजराथी,
मु. पो. शिरडी

* आमच्याकडे दि. २७–५–७८ शनिवार रोजी देवळाली कॅम्पचे डॉ. गोपाळभाई गुजराथी आमच्या ज्ञातीचे व त्यांचे मित्र वलसाडचे दोघं नवरा बायको, तीन मुली व एक मुलगा असे आले होते. गोपाळभाई त्यांच्या मिसेस, दोन मुले व एक मुलगी असे परिवार. ते बाबांच्या दर्शनाकरीता आले होते. गाडी घेऊन त्यांना तावडतोब जायचे होते. बाराची आरती घेतली. बाहेरच लॉजमधे सर्वांनी जेवण केले. नंतर आमच्याकडे आले. थोडा वेळ सर्वांनी आराम केला. नंतर चहा पाणी सरबत वगैरे झाले. ह्या दोघीजणी काहीतरी मुलांकरीता लॉकेट आंगठी आणण्याकरीता बाहेर गेल्या होत्या. तेवढ्या वेळात एक मिरवणूक वाजत आली, ती बघण्यासाठी मुलं गॅलरीत चढली, मुलांचे वडील वगैरे आम्ही तिथेच होतो. तीन–चारदा उठून मुलांना मी मागे केले तरी जे व्हायचे तेच झाले. वलसाडवाल्यांची तीन नंबरची मुलगी डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ती मुलगी १५–२० फूटांवरून खाली पडली. खालचे लोक ओरडायला लागले. पोरगी पडली, पोरगी पडली, परंतु आमच्या लक्षात आले नाही. ओरडा ऐकल्याबरोबर मला धरणी माय ठाय देईना असे झाले, घाई घाईत सर्वजण खाली गेलो, आम्ही तिला गाडीत घालून हॉस्पिटलमधे नेले. मुलगी लहान. तीन साडेतीन वर्षांची, बाबांची कृपा म्हणून फार लागले नाही. नाही तर एकीकडे तारीचे कुंपण, एकीकडे पाण्याचा नळ, एकीकडे ओट्याची पायरी असे तिन्ही बाजू चुकवून मधोमध चेंडूसारखी ती मुलगी खाली पडली. डोक्याला लागले. तीन टाके पडले, मुका मार बराच बसला. तास दोन तासात शुद्धीवर आली. डॉक्टर विचारीत होते कशी पडली केव्हा पडली तशी ती हिंदीमधे डॉक्टरांशी उत्तरे देत होती. डॉक्टर म्हणाले हाडाला वगैरे कोठे धक्का नाही लागला म्हणून बरे झाले. मुलीचे वडील मोठ्या हुदयावर आहेत. जंगल अधिकारी. आई वडील फार घाबरून गेले होते. त्यांनी आशाच सोडली होती.

आई सारखी रडत होती. वारंवार आम्ही सर्वजण दोघांना धीर देत होतो की बाबांच्या ठिकाणी असे कधीच होणार नाही. मुलीला थोडी शांत झोप लागली होती. सलाईन चालू होते. आई म्हणाली, चला आपण मंदिरात जाऊ या. आम्ही दोघीजणी जीप मधे आलो बाबांचे दर्शन घेतले बाबांना शरण गेलो. बाबा सर्वस्वी तुम्हीच आहात. बाबा तुमच्या सत्तेशिवाय झाडाचे पानदेखील हालू शकत नाही. आपल्या

भक्तांना तारणारे सांभाळणारे बाबा तुम्हीच आहात. काही भूल चूक झाली असेल तर क्षमा करा बाबा, बाबांचे तीर्थ उदी घेऊन आम्ही सर्वेच नाशीकला बहुल हॉस्पिटलमध्ये आलो. मुलीला थोडे तीर्थ दिले. उदी अंगाला उदी लावली. पुढचा मार वगैरेमुळे तिचे सर्वांग ठणकत होते. ज्याचा असेल कोणाला माहित ? खरोखरच बाबांची कृपाच म्हणायची. सर्वेच तुर्तीला आराम वाटायला लागला ! ही तुळशी आई वडिलांची अतिशय लाडकी. आणि सर्वेत आम्ही सर्वेजण खवळ होतो.

आईला तुळशी म्हणाली, माझ्या गळ्याला मिठी मार. सलाईन हाताला चालू होते. कशी मिठी मारायची म्हणून आईने मिठी मारली. तिचा एक हात सलाईनला होता. दुसऱ्या हाताने आईला तिने मिठी मारली. आईच्या डोळ्यातून आनंदाश्रूंच्या धारा ओघळत राहत होत्या. तुळशीच्या गालाचे पटापट पटापट तिने मुके घेतले. १० मिनिटे आम्ही सर्व स्तब्ध उभे होतो. आनंदाने सर्वांचे डोळे भरून आले. त्या वेळचे ते दृश्य बघण्यासारखे होते, माझे तर इतके हृदय भरून आले की अंगावर शहारे आले. मनात म्हटले बाबा तुम्हीच लाज राखली आमची. तुळशीचे आईवडील अतिशय प्रेमळ होते. आम्हाला सारखे म्हणायचे, माझ्या मुलाला व मला माझा मुलगा सुरेंद्र पण डॉक्टर आहे, बेन तुम्ही अतिशय परिश्रम घेतले, मी म्हटले, बाबांच्या कृपेने आपल्या सर्वांचे परिश्रमाचे चीज झाले, हे आपले मी भाग्यच समजते. त्यामुळे परिश्रमाचे वाटत नाही.

दुसऱ्या दिवशी रविवारी हॉस्पिटलात डॉ. पाठक येतात त्यांना तब्येत दाखवून नंतर घरी जाण्याची तिला परवानगी मिळणार होती, त्याप्रमाणे त्यांनी बघितले. डोक्याला वगैरे कोठे धक्का लागलेला नव्हता. त्यांनी घरी जाण्याची परवानगी दिली. नंतर तेथून नासिकला गेले. नंतर बलसाडला जाणार होते. जाताना तुळशीच्या हातात मी दोन रुपये ठेवले. तोंडावरून, अंगावरून हात फिरविला. मला समाधान वाटले. वडील म्हणाले, बेन आन्टीके पाससे लेनेका नहीं. मी म्हटले असू द्या. मुंबईहून आल्यावर पत्र द्या आम्हाला तब्येतीबद्दल. परत ते म्हणतात, बेन तुम्ही अतिशय परिश्रम घेतले. तुम्ही एकदा बलसाडला या. जरूर येऊ म्हटले. त्या भागाला येणे झाले तर जरूर येऊ, असो. बाबा आपल्या भक्तांना कसे सांभाळतात. असेच बाबांचे छत्र आपल्या सर्वांवर असो हीच सदिच्छा मी बाळगते.

# श्रीसाईंनी दिलेला दृष्टांत

—सौ. सिंधु कृष्णराव सपास
मु. पो. काटोल, गळनाका,
जि. नागपूर

● या गोष्टीला जवळजवळ सहा महिने झाले आहेत. माझ्या मुलाला गुद्द्वाराच्या बाहेरील बाजूला अडीच इंच लांबीचा मांसाचा भाग वाढला होता. त्याला वाटत होते की मूळव्याध असावी म्हणून मी मूळव्याधीचे औषध सुरू केले पण काहीच उपयोग झाला नाही. त्याची वाढ चालूच होती. शेवटी त्याला डॉक्टरकडे पाठविले. डॉक्टरनी त्याला उपचारासाठी नागपूरला जायचा सल्ला दिला. आम्ही तावडतोब नागपूरला घेऊन गेलो. मेयोतील डॉ. गोवर्धन यांनी तपासणी केली व ऑपरेशनसाठी कमीत कमी पंधरा दिवस थांबावे लागेल असे सांगितले. तो बी. ए. फायनलला असल्यामुळे ते दिवस महत्त्वाचे होते. आम्ही परत आलो. मार्च महिन्याची सोळा तारीख होती. मुलाचे बाबा म्हणाले, " मुलाचे ऑपरेशन झाले नाही हे फार चांगले झाले. माझा साई ऑपरेशनची वेळच येऊ देणार नाही. जे होते ते चांगल्यासाठीच होते." असा मला धीर दिला. मी साईला नमस्कार केला व मुलाला म्हणाले, " राजा तू रोज पेलाभर पाण्यात उदी टाकून पाणी पित जा व साईला नमस्कार कर की माझे दुःख निवारण झाल्यावर मी तुझ्या दर्शनाला येईन." त्याने सतत प्रयत्न सुरू केला. मी त्याला अधून मधून विचारत असे. आई मला आराम आहे असे सांगू लागला. जवळजवळ मेच्या दहा तारखेला त्याचा शेवटचा पेपर होता. त्याला पूर्ण आराम झाला व जागा पूर्ववत झाली. मला म्हणाला, " आई मी साईच्या दर्शनास जातो." माझ्याजवळ पैसे नव्हते परंतु साईकृपेने शंभर रुपये घरपोच मिळाले. त्याची तयारी करून तो शिर्डीला गेला.

ती उदी नसून साईश्रद्धेचा प्रसाद होता असे म्हणण्यात काहीच हरकत नाही. साईनाथांची शक्ती महान आहे. माझे साईचरणी शतशः प्रणाम.

WITH HUMBLE PRAYERS
AT THE LOTUS FEET OF
**SHRI SAI BABA,**

THE DESTROYER OF DARKNESS AND DESPONDENCY, THE HARBINGER OF HEALTH AND HAPPINESS, THE PRESERVER OF PEACE AND PLENTY.

M/S. S. D. CHITNIS, DELHI — 6.
PROPRIETORS,

WEST END TALKIES, SADAR BAZAR. DELHI-6

CINEMA EXCELSIOR, HAUZ QAZI, DELHI-6,

PRINTERS:

R. S. CHITNIS — D. R. CHITNIS — G. R. CHITNIS

# श्रीबाबांनी पोहोचविले !

—श्री. त्रिभुवननाथ शुक्ल
लालबाग, मुंबई १२.

* काही वर्षांपूर्वी ' साईबाबा ' कोण आणि त्यांचा महिमा काय याची मला जाणीवसुद्धा नव्हती. परंतु तीन वर्षांनी मला अचानक कोण जाणे कसे देव भेटल्यासारखे वाटले व तेव्हापासून माझी ' बाबां 'च्या भक्तीवर श्रद्धा बसली. मला बाबांनी वेळोवेळी संकटातून बाहेर काढले. मी इंटर सायन्सची परीक्षा दिली आणि तीही बाबांच्यावर विश्वास ठेवून आणि चांगला अभ्यास करूनच.

नुकत्याच माझ्यावर ओढवलेल्या संकटातून बाबांनी मला बाहेर काढले. त्याचे वर्णन केल्याखेरीज मला रहावत नाही.

तो दिवस जाऊन आता जवळ जवळ एक वर्ष उलटले. जून किंवा जुलैचा महिना. मी कॉलेजमध्ये होतो. कॉलेजचा वेळ संपला होता. मी वाचनालयात जाऊन अभ्यास करीत होतो तेवढ्यात पाचच्या सुमारास चहुबाजूकडे अंधार दाटला. दुपारपर्यंत स्वच्छ राहणारे आकाश पाचच्या सुमारास ढगांनी भरून गेले. थंड वारा सुटून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. लागलीच आम्हाला घरी जाण्यास सांगितले मी जरा दचकलो. भीतीने नव्हे तर छत्री आणली नाही म्हणून. काही वेळ मी कॉलेजच्या आवारात थांबण्याचे ठरवले तरीही पाऊस थांबेना. हे पाहून मी पुस्तके आपल्या शर्टच्या आत घातली आणि स्टेशनच्या दिशेने रस्त्यावरून धावू लागलो. चमकणाऱ्या विजेचे आवाज ऐकून कानठळ्या बसत होत्या. पाऊस पडतच होता. बघता बघता कंबरेपर्यंत पाणी साठले. हे पाहून मी खूप घाबरलो. अखेर धावत स्टेशनवर येऊन पोहोचलो. तिथे पाय ठेवायलाही जागा नव्हती. आसन्यासाठी थांबणाऱ्यांची एकच झुंबड उडाली होती. स्टेशनमध्ये शिरताच मनाला धक्का देणारे 'अनाउंसमेंट' झाली की, व्ही. टी. ला जाणाऱ्या गाड्या रद्द. हे ऐकून पायाखालील जमीन सरकल्यासारखे झाले. पटकन माझे हात शर्टच्या खिशात गेले. माझ्याकडे पैसे असतील या आशेने खिशात हात गेले. पण तसेच ते हात रिकामे बाहेर आले. बसने जायची आशा माझी तिथेच मावळली झाली. फलाटावर उभ्या असलेल्या असंख्य लोकांत मी भांबावल्यासारखा फिरू लागलो. मला काहीच सुचेना. माझ्याकडे फक्त रेल्वे पास होता. पण त्या दिवशी तो ' बेकार ' होता. नाईलाजाने शेवटी बाबांचे स्मरण करून म्हटले की, " बाबा आता

तुम्हीच मला घरी पोचवा." मला माझ्या मनात सारखी आठवण येत होती मी जन्म दिलेल्या आईची. कारण मी वेळेवर घरी आलेलो नाही हे पाहून ती घाबरून गेली असेल. एक मध्यम वयाची व्यक्ती माझ्याजवळ आली. त्या व्यक्तीने माझा हात धरला आणि विचारले, "बाळा, तुला कोठे जायचे आहे." मी म्हणालो, "मला लालबागला जायचे आहे." ती व्यक्तीही बोलली, मला पण तेथेच जायचे आहे. चल तुला पोहचवतो. मी त्याच्या मागोमाग चालू लागलो धरून पडणाऱ्या मुसळधार पावसात आणि खाली कंबरेपर्यंत साचलेल्या पाण्यात मी सतत "बाबां"चे स्मरण करीत होतो. ती अज्ञात व्यक्ती आणि मी बसस्टॉपवर आलो. एकदाची बस आली. आम्ही दोघेही बसमध्ये चढलो. त्या व्यक्तीने स्वतःची आणि माझीही लालबागपर्यंतची तिकिटे काढली. मला त्याने लालबागला सोडले व तो तिथून निघून गेला. त्याने केलेल्या उपकाराच्या परतफेडीनिमित्त मी मागे फिरून त्याला हात जोडले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की त्यावेळी तिथे कोणीही नव्हते. मी स्वतःशीच काहीतरी पुटपुटत होतो. ते माझे पुटपुटणे ऐकत होता तो म्हणजे पाण्याने भरलेला रस्ता. हे पाहून माझे डोळे पाण्याने भरून आले तेही बाबांची दया पाहून.

त्याच रात्री बाबा साक्षात मला स्वप्नात भेटले व म्हणाले, 'तुला काय हवे ते मागून घे.' पण त्यावेळी मला फक्त त्यांचा आशीर्वाद हवा होता. बाकी काहीही नको होते. मला असे वाटत होते की बाबा माझ्या हृदयात बसून माझ्या इच्छा पूर्ण करीत आहेत.

## दिवाळी पोच – 'अनुप्रिता' दिवाळी अंक ७८

या मासिकाचा दिवाळी अंक नुकताच प्रकाशित झाला असून मुखपृष्ठावर श्रीसाईंचे चित्ताकर्षक संग्राह्य चित्र आहे. ६० व्या पुण्यतिथीनिमित्त या मासिकाने १६ पानांची श्रीबाबांविषयक सचित्र पुरवणी दिली आहे. त्यामध्ये श्री. सदानंद चेंदवणकर, डॉ. चारुशिला गुप्ते, श्री. दत्ताराम बारस्कर इ. चे लेख आहेत. संपादक श्री. य. ल. सांभारे. किंमत ७ रुपये

## ❀ साईबाबांनी स्वप्नात दिलेला दृष्टांत ❀

—श्री. शु. र. दळवी
६५/१९३० पंत नगर,
घाटकोपर, मुंबई–७५

* मी श्रीसाईबाबांची यथामती पूजा करतो. १९७१ सालचे दिपावलीचे दिवस होते. माझा मुलगा शिवाजी वय ६ वर्षे अचानक पोटाच्या विकाराने आजारी पडला. डॉक्टरचे औषध–उपचार चालू केले. काही कमी होईना. मुलाला बेशुद्ध अवस्थेत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. डॉक्टरने फोटो काढून लगेच ऑपरेशन केले पाहिजे असे सांगितले. मी त्यास परवानगी दिली. ऑपरेशन २१ टाक्यांचे झाले. ते व्यवस्थित झाले असे डॉक्टरनी सांगितले. थोडा धीर आला. मी रात्रीच्या वेळी हॉस्पिटलमध्ये उंबरठ्यावर झोपलो असता माझ्या स्वप्नात श्रीसाईबाबा आले व घाबरू नकोस म्हणाले. तेवढ्यातच मला जाग आली. दुसऱ्या दिवसापासून मुलास साफ बरे वाटले. २० दिवसांनी मुलास डॉक्टरांनी घरी पाठविले. मुलाच्या वयाच्या मानाने ऑपरेशन फारच मोठे होते. सध्या मुलाचे वय १३ वर्षे आहे. त्यावेळपासून आतापर्यंत कोणताही त्यास आजार नाही.

या संकटकाली श्रीसाईबाबांनीच आमचे रक्षण केले.

× × ×

## * इच्छेप्रमाणे घडले *

* गेली २० वर्षे मी श्रीसाईबाबांच्या फोटोची पूजा करीत आहे. पुष्कळ वर्षांपासून मी शिरडीच्या श्रीसाईबाबांचे दर्शन घ्यावे असे म्हणत होतो. परंतु दर्शनाचा योग मात्र येत नसे. संतही भक्तांच्या मनातले जाणतात या गोष्टीचा योग तारीख २२–९–७७ रोजी घडून आला. शिर्डीला जाण्याची पहिलीच वेळ त्यामुळे शिर्डीला पाय ठेवताच मोठे समाधान झाले. पहाटे आंघोळ करून सत्यनारायण पूजा, अभिषेक करून झाल्यावर श्रीबाबा ज्या लिंबाच्या झाडाखाली बसत तेथे दर्शन घेताच माझ्या डोळ्यातून आनंदाने अश्रु वाहू लागले, व मनात वाटले जन्म घेऊन येथपर्यंत आलो भाग्यच आपले असे म्हणत झाडाजवळून बाहेर आलो तोच कै. श्रीभालचंद्र महाराज कणकवलीचे दत्त म्हणून तेथे हजर झालेले. त्यांना पाहून आनंद गगनात मावेनासा झाला. लेंडीबागेत श्रीबाबा ज्या विहिरीचे पाणी पीत असत तेथे दर्शन घेतले.

आरतीस आलो. आरती संपवून जेवणाच्या हॉलमध्ये आलो. त्यांचेच कांच पंगती, भरपूर जेवण, सर्वजण एकत्र जेवतात यातच मोठे समाधान मिळाले. मनात जे जे आले ते ते साईनाथ कृपेने घडून आले. हीच साईनाथांची कृपा.


## श्रीसाईबाबांचे महानिर्वाण

होऊन ६० वर्षे पुरी झाली तरीही शिरडी येथील त्यांची समाधि जागृत आहे. श्रद्धावंताच्या हाकेला 'ओ' देते आहे. नवसाला पावत आहे!

**या महापुरुषाचा अद्‌भुत इतिहास म्हणजेच**

**"मशिदीत प्रगटला परमेश्वर!"**

ही हृदयंगम कादंबरी, भक्ति, अध्यात्म आणि चमत्कार यांनी भरगच्च भरलेली ४१८ डेमी पृष्ठे!

मूल्य केवळ **२६ रुपये**

प्रशांति प्रकाशन, ९/१३, पिरामल नगर, गोरेगाव (प.)
मुंबई ४०००६२

# साई कृपेने सवयी सुटल्या

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

— श्री. सुधीर पंडित
४७ मोती भुवन, डिसिल्व्हा रोड,
दादर, मुंबई–२८.

● मला अध्यात्माची ओढ बालपणापासूनच आहे. परंतु तारुण्यात षड्विकार आणि सत्याचे केवळ पुस्तकज्ञान ह्यांच्यातील रस्सी खेचेत व बहुसंख्य मित्र–नातलगांच्या संशयात्मिक विचारांच्या मान्यांमध्ये सापडलेली बुद्धि, मनाला कधी ही तर कधी ती दिशा दाखवू लागली. अनेक संतांची प्रवचने ऐकूनसुद्धा वरच्यावर अंतःकरणात बदल झाल्याचे जाणवायचे, पण मायेच्या प्रभावामुळे आणि विज्ञानात पेशाने संशोधन करीत असल्यामुळे, संशयाचे ढग चित्ताचे आकाश व्यापून टाकीत.

अशा परिस्थितीत अचानक एके दिवशी मला शिर्डीस जाण्याची तीव्र ओढ निर्माण झाली. मी पूर्वी तिथे गेलेलो नव्हतो. ही ओढ इतकी प्रबळ होती की मी तात्काळ अर्ध्या तासात सुटणाऱ्या 'पंचवटी' एक्सप्रेसने निघायला तयार झालो. माझ्या आईने मला थांबवून शनिवार–रविवारी सुटीच्या दिवशी जाण्याचा सल्ला दिला. मी त्याप्रमाणे केले. बाबांच्या समाधीजवळ त्यांना ज्ञानदानाची याचना केली. शिर्डीत प्रथमच मला आपल्यात खोलवर बदल झाल्याचे जाणवले.

त्यानंतर दोन-तीन दिवसांनी मला स्वामी दयानंद सरस्वती यांचे माझ्या पत्रास उत्तर मिळाले. त्यांनी मला त्यांच्या आश्रमात भेटण्यास बोलावले व मला शिकवण्याचे आश्वासन दिले, मंत्र जपण्यास दिला. सुटीच्या दिवशी मी आश्रमात राहू लागलो. साईबाबांच्या कृपेने गुरू लाभले. गुरूवाणीतून लाभलेल्या ज्ञानाने संशयाची जागा ज्ञाननिष्ठेने घेतली. विषयवासनांनी ज्या मनाला धर्माचरणाच्या प्रयत्नात दमवले होते, त्या सहजपणे मनातून नाहीशा होवू लागल्या. सिगारेटसारखी संवय सहज सुटली. ही साईलीला पाहून मी अतिशय चकित झालो!

पुढे जे. कृष्णमूर्ति ह्या संतांच्या सान्निध्यात राहण्याचा योग आला. मद्रासला चिन्मय मिशनच्या साधना शिबिरास जाण्याचा योग आला. तेथे अनेक संतांचा सहवास घडला. हे सर्व शिर्डीस गेल्यापासून अवघ्या सहा–सात महिन्यात घडले!
ऐहिक बाबतीतही साईकृपेची पदोपदी प्रचिती येत आहे. उदाहरणार्थ, मद्रासहून येत असता माझे रिझर्वेशन फक्त सीटचे होते. मला अंगात ताप होता. मी बाबांचे

सतत नामस्मरण करत होतो. गाडी सुटायच्या आधी, अचानकपणे एक यात्रेतला सद्‌गृहस्थ भेटला आणि त्याने त्याच्याजवळ असलेला ज्यादा बर्थ मला दिला ! "तरी मी धावेन भक्तांसाठी !"

आजकालच्या जगात सत्पथी चालणाऱ्या माणसाला अनेक अत्याचार सोसावे लागतात. अशाच तापांना त्रासून मी साईबाबांना नवस केला. आपोआप व्यावसायिक व घरगुती क्षेत्रातले अडथळे व वाईट लोकांपासून होणारा त्रास कमी होऊ लागला. मी नवस फेडला. हे सर्व सांगायचे कारण एवढेच की इतर भक्तांनी व ज्यांची श्रद्धा, निष्ठा सांसारिक तापाने चावीकी विचारांच्या भडीमाराने डळमळीत होत असेल त्यांनी निराश न होता साईचरणी शरण जाण्याचा सोपा मार्ग अवलंबावा. वरील सर्व कथन करण्याची प्रेरणा बाबांनीच दृष्टांतात दिली. त्यांची सर्वांवर सदैव कृपा राहो ही त्यांच्या चरणी प्रार्थना.


# SHRI SAINATH SHIV MANDIR

Bldg. No. 15, Chembur Colony, Bombay-400 074.

This mandir was opened on 7-3-78 and stone foundation was laid by Actor, film maker Shri MANOJKUMAR on 13-2-78.

ARTI DAILY 7-30 A.M. — 7-30 P.M.

8 P.M. Thursday's Prasad & Poor feeding

8 P.M. PALKI on Every First Thursday of the month.

Managed by Sai Sevaks.

# साई आणि ....

—श्री. गोविंद विश्वनाथ भडसावळे
मु. पो. कोळवण, ता. मुळशी, जि. पुणे

* साधारण १९४५–४६ सालातील मी समक्ष पाहिलेली ही घटना आहे. ती मला जशी स्मरत आहे. ती तशीच खाली देत आहे.

त्या काळात मी १५–१६ वर्षांचा होतो. त्यावेळी आमचे कोळवण (ता. मुळशी जि. पुणे) येथील घरात 'श्री लाले' नावाचे शिक्षक भाड्याने रहात होते.

त्यांचे लग्न ठरले. आणि ते लग्नकार्य माझ्या वडिलांसह सर्व लोकांनी आमच्या घरातच करण्याचे ठरवले. मोठे प्रशस्त घर, घरापुढे प्रशस्त अंगण. त्यामुळे लग्नकार्यास कोणतीच उणीव नव्हती. दोन दिवसावर लग्न येऊन ठेपले. आणि दोन्हीकडील लग्नाचे वऱ्हाड आमच्या घरात येऊन दाखल झाले. लग्नकार्य आणि तेसुद्धा आमचे घरात असल्यामुळे मी व माझे मित्र खुषीत होतो.

शिक्षक लाळे यांचे थोरले बंधू हे श्रीसाई भक्त होते. नित्यनियमाने ते श्रीसाईबाबांची पूजा अर्चा करीत असत, व दर गुरुवारी श्रीसाई तसबिरीला हार घालून पेढे म्हणून प्रसाद वाटत असत.

लग्न नेमके गुरुवारी होते. त्यांचे देव देवक आमच्या स्वयंपाकघरात होते. त्यातच श्रीसाईबाबांची तसबीर होती. सकाळी लग्न झाले. त्यानंतरचा जेवणाचा वगैरे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

संध्याकाळी वरातीसाठी गावातील ढोल लेझीमचा ताफा होताच. त्याकाळी एस. टी. गाड्या नव्हत्या. त्यावेळी खाजगी कंपन्यांच्या पॅसेंजर गाड्या सर्व्हिस करीत होत्या. आमच्या कोळवण गावी 'परांजपे मोटार सर्व्हिस' कंपनीच्या दोन गाड्या येत असत. एक गाडी सकाळी व दुसरी संध्याकाळी येत असे. त्या दिवशी म्हणजे गुरुवारी संध्याकाळी मुक्कामाला आलेली पॅसेंजर गाडी वरातीसाठी ठरवली होती. त्यामुळे ती आमच्या दारातच उभी होती.

वरातीचे गडबडीमुळे वेळ होणार नाही म्हणून लाळे यांचे थोरले बंधुनी आपले मुलास हार घालून पेढे म्हणून साईबाबांचा प्रसाद म्हणून वाटण्यास सांगि-

तला. तो मुलगा माझ्याच वयाचा होता. पण या वरातीचे गडबडीत तो हे विसरून गेला आणि मग पुढे त्यामुळे सारे घडले.

मी व माझा मित्र असे दोघेजण गाडीचे लाईट लावणे बंद करणे हे खेळ म्हणून नकळत उद्योग करीत होतो. या आमच्या उद्योगामुळे गाडीची लाईट बंद पडली. इतकेच नव्हे तर वरातीचेसाठी गाडी सुरू होईना. त्यामुळे आम्ही दोघे मनातून घाबरलो होतो. ही गाडी बंद पडण्यास आम्हीच कारणीभूत होतो. याची कोणासच कल्पना नव्हती. आम्ही दूर राहून सारी मजा बघत होतो. जवळजवळ अर्धा फर्लांग ही गाडी नवरानवरीसह सर्वांनी ढकलून पुढे नेली परंतु चालू होईना. याचवेळी घरात दुसराच गोंधळ चालला होता. लाळे यांचे थोरले बंधू भान हरपून वागत होते. ते स्वतःला विसरले होते. सगळयांची पाचावर धारण बसली होती. तिकडे वरातीची गाडी सुरू होईना. घरात हा गोंधळ. घरात त्यांना बाहेरची बाधा झाली होती अशी सर्वांची समजूत झाली होती आणि त्याप्रमाणे उपाययोजना सुरू झाली होती. माझे वडील अनुभवी म्हणून यात प्रमुख होते. त्यांनी सांगायला लाजवील असे अघोरी उपाय केले होते. मारहाण केली. बाहेरची बाधा या कल्पनेमुळे. 'तू कोण आहेस ? झाडाला का धरलेस ?' वगैरे प्रश्न चालू होते पण झाड दाद देईना. शेवटी हो ना करता करता मी कोण हे त्या झाडाने सांगण्याचे ( लाळे बंधूनी ) कबूल केले.

'मी कोण' हे त्या झाडाने सांगितले. "आमचे देव देवक आहे तिथे पहा म्हणजे मी कोण आहे ते समजेल." सर्वांनी उत्सुकतेने आमचे स्वयंपाकघरात धाव घेतली.

आणि पाहिले तो काय आश्चर्य ! देवातील साईबाबांचे तसविरीस दरदरून घाम सुटला होता. ते दृश्य पाहून सारेच हबकले. माझे वडिलांची या आधी अघोरी कृत्य केल्याने काय अवस्था झाली ते मला आठवत नाही.

साईबाबांना येण्याचे कारण आम्ही विचारले. तेव्हा आज मला प्रसाद व हार मिळाला नाही म्हणून मी आलो असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. सर्वांनी व माझे वडिलांनी या चुकीबद्दल अनन्यभावे क्षमा मागितली, व जाण्यास सांगितले. माझे वडील पुढे म्हणाले, 'आम्ही दारात पाण्याचा तांब्या भरून ठेवतो तो तुम्ही जाताच उपडा झाला पाहिजे.' आश्चर्य म्हणजे तांब्या आपोआप सर्वांच्या नकळत उपडा झाला आणि त्याचवेळी बंधू शुद्धीवर आले आणि दुसरे आश्चर्य म्हणजे बाहेर वरातीची गाडीदेखील सुरू झाली होती.

झोपेतून उठल्यावर माणसाची जशी अवस्था होते तशी बंधूंची अवस्था झाली होती. 'सारे असे का जमला आहात?' भोवताली जमलेले लोक पाहून बंधू म्हणाला. त्यांच्या लक्षात काहीच येत नव्हते. नंतर त्यांना सारी घटना सांगण्यात आली आणि ते गहिवरले. त्यांनी प्रथम साईबाबांच्या तसविरीकडे धाव घेतली.

आम्ही त्यावेळी लहान असल्यामुळे याचा आम्हाला नीट उलगडा झाला नाही.

पण त्यानंतर मी साईबाबांची भक्ती करू लागल्यानंतर या अगाध लीलेचा उलगडा झाला.

एकदा भक्ताची जर नैमित्तिक सेवा चुकली तर छोटासाच धक्का देऊन ते कशी पूर्ण करवून घेतात हे कळून चुकले.

वरातीच्या गाडीशी चाळा करण्याची बुद्धी आम्हाला का व्हावी? पण ते निमित्त होते. पुढे हे सारे घडणारच होते. पण हा सारा उलगडा नंतर झाला.

म्हणून श्रीसाईबाबांच्या असंख्य भक्तांना माझे एकच सांगणे आहे की, आपण साई सेवेसाठी केलेले नियम चुकवू नये यातच आपले कल्याण आहे.

## श्रीसाई भक्त मंडळ, मुंबई

वरील मंडळातर्फे श्रीबाबांची ६० वी पुण्यतिथी १० ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर या काळात थाटात मुंबईस साजरी केली. १० ते १४ ऑक्टोबर-पर्यंत गोल्डन पॅलेस वांद्रे व १५ तारखेस किंग जॉर्ज हायस्कूलात भरपूर कार्यक्रम झाले. ता. १३ रोजी संत पांचलेगावकर महाराजांनी मंडळाच्या कार्यक्रमास हजर राहून सर्वांना शुभाशिष प्रदान केले.

# ❀ काय वर्णावा तव महिमा ❀

****************************

—एक साईभक्त, मुंबई

● मी १९७६ साली नवीन मॅट्रीकची परीक्षा म्हणजे आताची दहावी उत्तीर्ण झालो. परिक्षेला सहा महिने असतानाच सर्व अभ्यासाची पूर्वतयारी झाली होती. परंतु परिक्षेला फक्त एक आठवडा उरला असताना माझ्या लक्षात आले की, आपल्याला काहीच येत नाही. कारण आधी केलेला अभ्यास मी साफ विसरलो होतो. माझ्यावर अक्षरशः डोके फोडायची पाळी आली. नाना तऱ्हेच्या कुशंका माझ्या मनात येऊ लागल्या. संपूर्ण आत्मविश्वासच मी गमावून बसलो. फक्त उरला सुरला जो विश्वास होता तो '**बाबा–भरोसे**' म्हणून मोकळा झालो, आणि परिक्षेच्या आदल्या दिवशी पहिल्या पेपरची तयारी केली. प्रत्येक पेपरचा अभ्यास मी अशा प्रकारेच केला. मला पास होण्याची अजिबातच खात्री नव्हती. परंतु जर ऑक्टोबर-मध्ये पुन्हा बसायची वेळ आली तर मी बोर्डातूनच आलो असतो परंतु सुदैवाने माझ्यावर तशी वेळ आलीच नाही. अठ्ठेचाळीस टक्के गुण मिळवून मी दहावी उत्तीर्ण झालो. व अकरावीसाठी शास्त्र विभागात प्रवेश मिळवला.

ज्या दिवशी माझा रिझल्ट मला कळला त्या क्षणाला माझ्या डोळ्यातून आनंदाश्रूच्या धारा कोसळल्या.

"काय वर्णावा तव महिमा,
बाबा तुम्ही माझा पाठीराखा"

"At the Lotus Feet,"
Modern Research Laboratory,
Prop. Hiralal Agrawal,
College Road, Bargarh — 768028
(Orissa).

## ❀ काय वर्णावा तव महिमा ❀

****************************

—एक साईभक्त, मुंबई

● मी १९७६ साली नवीन मॅट्रीकची परीक्षा म्हणजे आताची दहावी उत्तीर्ण झालो. परिक्षेला सहा महिने असतानाच सर्व अभ्यासाची पूर्वतयारी झाली होती. परंतु परिक्षेला फक्त एक आठवडा उरला असताना माझ्या लक्षात आले की, आपल्याला काहीच येत नाही. कारण आधी केलेला अभ्यास मी साफ विसरलो होतो. माझ्यावर अक्षरशः डोके फोडायची पाळी आली. नाना तऱ्हेच्या कुशंका माझ्या मनात येऊ लागल्या. संपूर्ण आत्मविश्वासच मी गमावून बसलो. फक्त उरला सुरला जो विश्वास होता तो '**बाबा–भरोसे**' म्हणून मोकळा झालो, आणि परिक्षेच्या आदल्या दिवशी पहिल्या पेपरची तयारी केली. प्रत्येक पेपरचा अभ्यास मी अशा प्रकारेच केला. मला पास होण्याची अजिबातच खात्री नव्हती. परंतु जर ऑक्टोबरमध्ये पुन्हा बसायची वेळ आली तर मी बोर्डातूनच आलो असतो परंतु सुदैवाने माझ्यावर तशी वेळ आलीच नाही. अठ्ठेचाळीस टक्के गुण मिळवून मी दहावी उत्तीर्ण झालो. व अकरावीसाठी शास्त्र विभागात प्रवेश मिळवला.

ज्या दिवशी माझा रिझल्ट मला कळला त्या क्षणाला माझ्या डोळ्यातून आनंदाश्रूच्या धारा कोसळल्या.

"काय वर्णावा तव महिमा,
बाबा तुम्ही माझा पाठीराखा"

"At the Lotus Feet,"
Modern Research Laboratory,
Prop. Hiralal Agrawal,
College Road, Bargarh — 768028
(Orissa).

# ॥ साईनाथा – तुजविण कोण त्राता ॥

—श्री. प्रशांत नारायण वंजारी
पोष्टासमोर, सावंतवाडी,
जि. रत्नागिरी (४१६५१०)

* १७ मे १९७७, त्या दिवशी संध्याकाळी आम्ही जरा विमनस्क स्थितीतच होतो. कारण बी. एस्सी. च्या परिक्षेचे पेपर्स थोडे कठीणच गेले होते. पण परिक्षा संपल्याचा आनंद मात्र आमच्या चेहेऱ्यावर खेळत होता. त्या दिवशी रात्री बिछान्यावर पडल्या पडल्या मनाला वाईट विचारानी घेरले. एक मन धमकावीत होते, 'नापास होशील रे!' तर दुसरे मन दिलासा देत होते, 'नाही रे! पास होशील पण क्लास मिळणार नाही.' क्षणभर माझी स्थिती वादळात सापडलेल्या पडावाप्रमाणे झाली. अशा वेळी मला साईबाबांची प्रसन्न मूर्ती आठवली. क्षणभर मन स्थिरावले. मनात म्हटले, 'बाबा! काहीही करा पण मला क्लास मिळवून द्या. माझी अब्रू वाचवा. प्रथमश्रेणीत पास झालो की एक किलो पेढे घेऊन येईन.'

१४ ऑगस्ट १९७७! त्या दिवशी मी कामानिमित्त मुंबईत होतो. सकाळीच पेपरमध्ये वाचले की बी. एस्सी. चा निकाल जाहीर झाला आहे. क्षणार्धात मनःस्थिती बिघडली. छातीचे ठोके वाढले. केव्हा एकदा विद्यापीठात जाऊन निकाल बघतो असे झाले. उठलो आणि व्ही. टी. स्टेशनवर आलो. तेथून विद्यापीठापर्यंत चालत जावे लागणार होते. माझ्या मनात विचार आला की आता बाबांच्या देवळात जाऊन यावे आणि नंतर निकाल बघण्यास जावे. पण देवळात जायचे तर आता गिरगाव किंवा दादरला गेले पाहिजे. म्हणून तो बेत रद्द करून मी तसाच चालू लागलो. आणि काय आश्चर्य! न्यू एम्पायर थिएटरजवळ मला बाबांची घुमटी दिसली. झटक्यात जाऊन दर्शन घेतले आणि लाज राखण्याबद्दल मनोमन विनंती केली.

आता मन प्रसन्न झाले होते. मी १०–३० ला विद्यापीठात पोचलो. आणि नोटीस–बोर्ड पहातो तो काय प्रथम श्रेणीत पास झालो होतो. क्षणभर मी गांगरलो, कारण तो माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण होता. बाबांच्या कृपेने तो क्षण माझ्या जीवनात घडून आला हे मी माझे सद्भाग्य समजतो. त्यानंतर १७ मे १९७८ रोजी मी शिरडीला जाऊन पेढे ठेवून आलो. म्हणूनच मी म्हणतो–'साईबाबा है राजी। तो क्या करेगा ब्रह्मदेव काजी॥'

◆◆◆◆◆◆

## ★ ५० वा सुवर्णमहोत्सवी प्रयोग ★

### बुधवार दि. १ नोव्हें. रात्रौ ८॥ वा. शिवाजीमंदिर

"श्री साईबाबा संस्थान शिरडी" च्या सौजन्याने

कुमारसेन गुप्ते साईभक्तांसह सादर करीत आहेत



श्री साईबाबांचे तेजस्वी जीवन रंगभूमीवर

"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

# शिरडीचे श्री साईबाबा

लेखक/दिग्दर्शक: किरण बुधलकर • नेपथ्य: [illegible]
प्रकाश [illegible] • निर्मिता/संगीत: कुमारसेन गुप्ते

**सरकत्या रंगमंचावर ४० कलाकारांसह**

**साईबाबांच्या भूमिकेत – किरणकुमार**

● दि. २ ते १२ नोव्हें. नागपूर दौरा

दि. ११ ते १८ डिसेंबर–कोकण, बेळगाव दौरा ●

सार्वजनिक, शैक्षणिक, धार्मिक संस्थांना खास सवलत

**संपर्क :** कुमारसेन गुप्ते, १४ पितांबर लेन,
माहीम, मुंबई–१६

फोन : ४५ ६५ ४१

# आमचे घरी साई जेवून गेले

—श्री. शंकरराव साहू
ईतवारा बाजार, अमरावती

● मी जवळ जवळ २०–२५ वर्षांपासून श्रीबाबांची सेवा करतो. किती वेळा शिर्डीला मित्रमंडळीसोबत व एकटा पण गेलो. दर्शन अनेकदा घेतले. पण बाबांचे आशिर्वादाने सर्व ठीक चालू आहे. लहान डेकोरेशनचा धंदा आहे. मुलंबाळं आहेत. त्यांचे कृपेने काही कमी नाही.

विशेष सांगायचे म्हणजे १९७६ मध्ये माझ्या कन्येचे लग्न झाले. हेसुद्धा बाबांचे आशिर्वादाने झाले. त्यानंतर माझ्या मुलीला मुलगी झाली. त्या निमित्ताने मी माझ्या मुलीकडच्या लोकांना जेवायला आमंत्रित केले. त्याप्रमाणे योग्य दिवस ठरवून जेवणाचा कार्यक्रम ठरविला. त्या दिवशी सकाळपासूनच बरेच लोक घरी आले. कारण मुलीचे सासरकडचे लोक व माझे नातेवाईक आलेले होते. दुपारी १२ वाजता स्वयंपाक झाला आणि जेवणाची तयारी सुरू झाली. १२ वाजता बाबांच्या करिता नैवेद्य तयार केला आणि बाबांना नैवेद्य दाखविला. त्यानंतर लोकांना जेवायला बसविण्याची तयारी सुरू झाली.

तेवढ्यात एक भिकारी दारात येऊन उभा राहिला. आम्ही सगळे आमचे घाईत होतो. त्या भिकाऱ्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. पण माझे लक्ष अचानक त्या भिकाऱ्याकडे गेले. तो भिकारी दिसायला सुंदर होता. त्याचे चेहऱ्यावर तेज होते. हातात एक काठी व दुसऱ्या हातात एक फुटलेले भांडे होते, आणि तो काही भिक्षा वाढा असे सांगत होता. तेवढ्यात मी बाहेर गेलो आणि त्यांच्या त्या भांड्यात पुरी व खीर टाकली आणि घाईने घरात आलो आणि लगेच माझ्या लक्षात आले की आज येणारा भिकारी साधा माणूस नसून कोणी तरी सत्पुरूष किंवा प्रत्यक्ष बाबाच असावे, असे माझ्या मनाला सारखे वाटू लागले. मी परत बाहेर आलो आणि त्या भिकाऱ्याला शोधू लागलो पण तो भिकारी कुठेच दिसत नव्हता. पुष्कळ शोधले पण काहीच उपयोग झाला नाही.

अशा प्रकारे श्रीसाईबाबा माझ्यासारख्या गरीबाचे घरी आज जेवायला आले होते. याबद्दल मला तर अत्यानंद झाला. माझे घर खरोखर पावन झाले.

बाबा भक्ताचे घरी जाऊन अशा प्रकारे दर्शन देतात हे मला पहावयाला मिळाले.

★

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) स. चैंदवणकर | १–०० |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |

# द्वारकामाईचा आशीर्वाद

—श्री. विनायक जनार्दन प्रभुणे
२८४ कसबापेठ, पुणे

* मी लहानपणापासून साईंची सेवा करतो. शाळेत असल्यापासून बाबांची सेवा करतो. मी पाचवीत असेन. मला बाबांचा एक फोटो सापडला होता त्याच्या खाली लिहिले होते :

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य
नित्य घ्या प्रचित अनुभवे

तो फोटो मी माझ्या बाहेरच्या खोलीत लावला. रोज पुजा करावी, नमस्कार करावा. साखरेचा नैवेद्य दाखवावा असा क्रम चालू होता. पुढे वाड्यास बांधकाम सुरू झाले व तो फोटो कुठे गेला ते समजले पण नाही. मला खूप वाईट वाटले. रडावला पण आले पण उपयोग काय ?

पुढे मी एकदा मुंबईला माझ्या आजोबांकडे गेलो होतो ते श्रीसाईंचे निस्सीम भक्त. त्यांच्याकडे श्रीसाईलीला मासिके पुष्कळ होती ती मी वाचली आणि माझ्या भक्तीला परत सुरुवात झाली. पुणे मुक्कामी येताना त्यांनी मला श्रीबाबाबांची अंगठी दिली. मी ती पुजेस ठेवली. रोज पुजा करू लागलो.

मी दरवर्षी शिर्डीला जातो. आता १३ वर्षे होऊन गेली. दरवर्षी मला शिर्डीला जाताना खूप आनंद व्हायचा, होतो. पण परत येताना नमस्कार करून निघालो की आपोआप डोळयात पाणी यायचे आणि असे वाटायचे की आपण आपल्या आई–वडिलांपासून दूर चाललोय. एखादी मुलगी सासरी जाताना कसे होते तसे मला होते.

कन्या सासुरी जाय । मागे परतुनि पाहे । कधी भेटशील केशवा । ऐसे झालो माझ्या जीवा । अशी माझी स्थिती व्हायची.

मी दरवर्षीप्रमाणे पहाटे ५ च्या गाडीने शिर्डीला निघालो पण माझी गाडी चुकली, व ८ ची धुळे गाडी मिळाली. तिने शिर्डीला गेलो. गाडी दुपारी १॥ वाजता पोचली. अभिषेकाची वेळ संपली. मी दरवर्षी अभिषेक केल्याशिवाय परत येत नाही पण त्यावेळी मला अभिषेक करायला मिळाला नाही. अतिशय वाईट वाटले. सर्व अधिकारीवर्गांना विनंती केली. पण उपयोग झाला नाही. शेवटी पुजाऱ्यांना विनंती

केली की मला समाधीवर जाऊन श्रीबाबांना हार घालू द्या. तो पण ऐकेना. तो म्हणाला, तुम्ही हार द्या मी घालतो. तुम्ही समाधीवर चढायचे नाही. शेवटी मी खूप चिडून गेलो, वैतागलो की, आपण दुरून येऊन आपल्याला समाधीवर जाता येत नाही आणि मग मी द्वारकामाईत गेलो. द्वारकामाईत एकही माणूस नव्हता. मी एकटाच बाबांच्या फोटोसमोर बसलो होतो. मागे धुनी जळत होती. फोटोखाली श्रीबाबांच्या पादुका होत्या. पादुकांवर हात ठेवून मी बाबांच्या फोटोकडे पाहिले आणि म्हणालो, बाबा मी एवढ्या लांबून दर्शनाला आलो. माझ्याकडून तुम्ही अभिषेक करून घेतला नाही आणि आपोआप डोळ्यात पाणी आले. मला गहिवरून आले. माझ्या डोळ्यातील पाणी पादुकावर पडले, आणि आपोआप माझे मस्तक पादुकांवर ठेवले गेले अन् माझ्या डोक्यावर कुणीतरी आशीर्वादासारखा तीनदा हात ठेवला. मी झटकन् वर पाहिले तर द्वारकामाईत साधी चिमणीसुद्धा नव्हती. मग माणूस कुठला. समोरच्या फोटोतून बाबा माझ्याकडे हसत हसत जणू काही म्हणत होते, वेड्या तुझा अभिषेक मला मिळाला, जा.

त्या क्षणापासून मला आनंद झाला तो सांगता येणे अशक्यच.

आता तुम्हीच सांगा याला द्वारकामाईचा आशीर्वादच तुम्ही म्हणाल ना! बाबा आपल्या सगळ्यांजवळ असतात. त्यांना आपण भक्तीने हाक मारली पाहिजे म्हणजे ते ओ देतात.

|| अल्ला मालीक आहे आपला
बाबा सांगती भक्तांस ||

|| स्वतः होते अल्ला मालीक
सांगत नव्हते कुणास ||

आपले बाबा एक जागृत दैवत आहे. त्यांना माझे शतशः प्रणाम आहेत.

# बाबा हमाल

—श्री. बापूसाहेब निरखे
१५ नंदलालपुरा, इंदूर ४.

* हमाल केवढा सार्थ शब्द, ओझे वाहणारा तो हमाल. पण स्वानुभव काय सांगतो ते पहा.

गेल्या मे महिन्यात लग्नसराईची एकच गर्दी उडाली होती. रेल्वे प्रवास म्हणजे एक प्रश्न चिन्हच होता. नातेवाईकांचे आदरार्थी बोलाविणे घरातील वयस्क माणूस म्हणून घरातूनही 'जा' म्हणून आग्रह. पोक्तपणाने, मोठेपणाने आस्मादिक इंदूर-हून छोट्या लाईनच्या छोट्या रेलगाडीत चिरंजीवाच्या मदतीने चढलो व बडोद्यास जाण्यास रतलाम स्टेशनवर उतरलो.

पलीकडे फलाटावर बडोदा गाडी येते म्हणून तिकडे जातो तर अफाट जमाव, लोकांची गर्दी मेलची वाट पहात होती. मीसुद्धा त्यात सामील झालो. सामान काही नाही फक्त एक पिशवी होती ! पण तुम्हाला सांगू, समोरून दोन रेल-गाड्या ठासून भरलेल्या, कुणी टपावर, कुणी दारात, कुणी खिडकीत अशा आल्या व गेल्या. मी इकडून तिकडे नुसता धावलो. जे आत शिरत ते बाहेर फेकले जात. मग माझ्या वयस्काची काय गत ?

तिसरी गाडी दोन तासाने येणार. शेजारचे परिवारास दोन एक तरुणास माझ्या मदतीची दखल दिली.

'हो' म्हणून आश्वासन. आशाळभूतपणे तिसऱ्या गाडीत चढू म्हणून दोन हमालापाशीही कळवळलो. पण गाडी आली. अन् सारे पसार. मी त्यांचे मागे अन कशाचे काय, गेली गाडी. घरात मुलं माणसावर फुशारकी मारणारा मी, सकाळ ते दुपारचे ३ वाजेतो तब्बल सहा तास हैराण होऊन एका पाठीमागचे बाकड्यावर बसलो. आता दोन तास गाडी नव्हती. येणारी मेल पकडता आली तर उद्याच्या समारंभास पोहोचत नाही.

समोरून तीन चार वेळा गेलेल्या लाल फाटक्या खमीसाचा व फेट्याचा म्हाताऱ्या हमालाकडे नजर जाऊनही त्याला मी विचारणा केली नाही. तासाभरात तो कोपऱ्यामध्ये मस्त मौला बसलेला दिसला. त्याचेकडे वळलो व म्हटले, 'हमाल

बाबा, मला ह्या येणाऱ्या गाडीत बसवाल. रुपया आठ आणे देईन.' सामान काय नाय. सकाळचे बसलोय–जीव वैतागलाय.

बाबा बोलला, अरे बापू जो लोग ऐसे वक्त देता है तुम भी दो. अरे पन क्या ? वही ' दो ' और गाडीमें चढो ! तो बोलला, यह बहुत तो मर्जी आपकी–अन आला गेला. गळला ताठा आठवला राम ! देव, अन् पावणारा साईबाबा ! ! आळवले त्याला. पुनः समोर आला. म्हणालो, बाबा भगवानके वास्ते दया करो. तो म्हणे, आयी भगवानकी याद ? मग देवो वही ' दो ' मी हताशपणे म्हटले, हो. अन् त्याच्या पाठीशी उभा राहिलो. इतक्यात तो म्हणे, नही आगे आओ हम तुम्हारे पीछे ! अन काय आली मेल गाडी ... हं बढो आगे आगे ... असे म्हणत गाडीच्या थेट शेवटच्या डब्याशी नेलं आणि हां चलो अंदर म्हणत एक पाठीवर ठोशा दिला अन मी गर्दीतून डब्याचे आत शिरलो. बाकीचे लोक ओरडतच होते. अरे अरे ... दुसरे क्षणी मी खिशातून हात घालून बाबास देण्यास बाहेर पाहतो तर आहे कुठाय तो बाबा हमाल. अन गाडी तर चालू झाली !

अशावेळी वेडया मनास उमगले ते फारच उशिरा. दोन मागणारा माझा शिर्डी साईबाबाच तो होता, अन सकाळपासून दोन म्हणजे निष्ठा अन् सबुरी मागत होता. सारा रस्ताभर गर्दी व आगगाडीत बाबा हमाल डोळ्यापुढून जात नव्हता.

भाविक हो, तुम्हाला कुणालाही तो दिसला गवसला तर दोन देऊन त्याला सोडू नका हं !


## श्रीसाईबाबा मंदिरातील मूर्तीच्या छायाचित्रांचे
## व
## श्रीसाई साहित्याचे शिरडीत अपूर्व प्रदर्शन

**स्थळ** – समाधी मंदिरावरील हॉल, शिरडी.

गुरुवार दिनांक ९–११–७८ ते मंगळवार दिनांक १३–११–७८

**वेळ** – दररोज सकाळी ९ ते ११–३०
सायंकाळी ४ ते ६–३०

**प्रवेश** – विनामूल्य

# *** पाठीराखा श्रीसाई ***

—कु. अलका प्रभाकर अधिकारी
सावित्री भुवन, बंदर रोड, रत्नागिरी

* गेल्या मे महिन्यातील गोष्ट. माझ्या मामेवहिणीचे लग्न ८ मेला मुंबईला व्हायचे होते. ३० तारखेला माझी मोठी बहीण रातराणीने मुंबईला जावयाची होती. त्याच दिवशी माझ्या आईने बाबांना शिरडीस येण्याबद्दल चिठी टाकली. 'येऊ नका' असे चिठीत आले. आईला खूप वाईट वाटले. ८ तारखेला लग्न साधून आम्ही सर्वजण ९ तारखेला शिरडीस जाऊन रिसिव्हर साहेबांची परवानगी घेऊन ८ दिवस राहणार होतो. आई तेथे द्वारकामाईत 'श्रीसाईसच्चरित' ग्रंथाचे पारायण करणार होती. रातराणीने माझी बहीण मुंबईला गेली. आणि दुसऱ्याच दिवशी माझी आजी कॉटवरून पडली आणि तिच्या पायाचे हाड मोडले. आम्ही का जाऊ शकत नव्हतो याचे बाबांनी प्रत्यंतर आणून दिले. आजी आजारी त्यामुळे माझ्या आईला तिचे व घरातले सर्व करून शाळा सांभाळावी लागे. माझी ज्युनियर बी.कॉम्‌ची परीक्षा २१ मेला होती. अभ्यास खूप पण घरात आजारपण. मी परीक्षेला बसायचे नाही असे ठरविले. पण आई रागवली. ती म्हणाली, 'आपले बाबा पाठीशी आहेत ना? मी पोथीचा सप्ताह करते. तू होईल तेवढा अभ्यास कर. श्रीबाबांवर भार टाक आणि परीक्षेला बस.' त्याप्रमाणे आईने सप्ताह केला. आजी अगदीच परस्वाधीन झाल्याने एकट्या आईवर सर्व भार पडूनही तिने सुटी पडताच निष्ठेने सप्ताह केला. त्यावेळी ती बाबांना म्हणाली, 'बाबा, मला तुमचाच आधार. मुलगी चांगली पास होऊ दे म्हणजे ती पण आपल्या पोथीचा सप्ताह करील.' मला हसू आले. अभ्यास काहीच झालेला नाही. मी काय कपाळ पास होणार? पण परीक्षेला बसत नाही हे म्हणण्याचे धैर्य माझ्यात नव्हते. माझे आईवडील दोन्ही साईभक्त. बाबांवर पूर्ण विश्वास. त्यामुळे मनात नसताही कसेबसे मी पेपर दिले. मी काय लिहिले हे मला आठवत नाही. रिझल्टच्या दिवशी मी काहीही उत्सुकता दाखवली नाही कारण मला पास होण्याची खात्री नव्हती. पण आश्चर्याची गोष्ट की मी चांगली पास झाले होते. बाबा माझ्या आईच्या हाकेला धावून आले होते. मग मात्र मनातले विकल्प जाऊन मी पोथीचा सप्ताह केला व दासगणूंचे स्तोत्र नियमाने वाचू लागले. आईवडिलांबरोबर शिरडीला जाऊन आले आणि

आता बाबांना माझ्या हृदयात अखंड स्थान देऊन मी कृतार्थ झाले आहे. बाबा आमच्या पाठीशी आहेत याची आम्हाला नित्य प्रचिती येत असते.


## ★ श्रीसाई साहित्य ★

| | |
|---|---|
| श्रीसाई आराधना | १–०० |
| [ प्रातःस्मरण-पूजा-आरत्या संग्रह ] | |
| श्रीसाईगौरव स्तोत्र | ०–५० |
| श्रीसाईस्तवन | ०–५० |
| श्रीसाई माहात्म्य | ०–५० |
| श्रीसाई स्तोत्र | ०–५० |
| श्रीसाई कथामृत | ०–५० |
| श्रीसाई भक्तिपाठ | ०–५० |
| श्रीसाई चालिसा ( हिंदी ) | ०–५० |
| श्रीसाई माहात्म्य ( गुजराथी ) | ०–५० |
| श्रीसाईबाबा भजने | ०–५० |
| श्रीसाईलीला चरित्र मराठी | |
| श्रीसाईलीला चरित्र हिंदी | |
| श्रीसाईलीला चरित्र गुजराथी | |

## ❀ स्तोत्रें, माहात्म्यें ❀

| | |
|---|---|
| श्रीसिद्धारूढ माहात्म्य | ०–६० |
| श्रीसाटम माहात्म्य | ०–६० |
| श्रीगुरुपरंपरा माहात्म्य | ०–६० |
| श्रीसिद्धीविनायक माहात्म्य | ०–६० |
| श्रीगणेश वरद स्तोत्र | ०–६० |
| श्रीशिव वरद स्तोत्र | ०–६० |
| श्रीदत्त वरद स्तोत्र | ०–६० |
| श्रीगुरुवरद स्तोत्र | ०–६० |
| ( श्री अक्कलकोट स्वामी समर्थ ) | |
| श्रीसोमनाथ माहात्म्य | ०–६० |
| श्रीदेवी वरद स्तोत्र | ०–६० |
| श्रीगजानन माहात्म्य (शेगांव) | ०–६० |
| श्रीमहामृत्युंजय वरद स्तोत्र | ०–६० |
| कालभैरव वरद स्तोत्र | ०–६० |
| नवनाथ नित्य भक्तिपाठ | ०–६० |
| गायत्री मंत्र | ०–५० |
| शाबरी कवच | ०–५० |
| भगवान बुद्ध माहात्म्य | ०–५० |
| श्रीमारुती स्तोत्र | ०–३० |

## ❀ व्रत, कथा वगैरे ❀

| | |
|---|---|
| केशरी गुरुवार व्रत | १–०० |
| सत्यविनायक व्रत कथा | १–५० |
| श्रीलक्ष्मी माहात्म्य व्रतकथा | १–५० |
| श्री संतोषीमाता व्रतकथा | १–०० |
| सोळा सोमवार व्रतकथा | १–०० |
| तांबडे मंगळवार व्रत | १–०० |
| संकष्टी चतुर्थी व्रतकथा | १–०० |
| पांढरे बुधवार व्रतकथा | ०–५० |
| सोळा शुक्रवारची कहाणी | १–२५ |

**ताडदेव बुक डेपो प्रकाशन**

ताडदेव, मुंबई–७.

# श्रीसाईबाबांना पत्र

— श्री. रविंद्रनाथ मोगरे, बी. एससी,
ए ३०१, महावीर अपार्टमेंट,
भाईंदर (पश्चिम)

प्रिय परमपूज्य साईबाबांना,

आपणास या साध्यासरळ भोळया भक्ताचा साष्टांग नमस्कार.

● बाबा, तुला आठवते. मी जरा बेचैनच होतो. माझा आय. ए. एस. चा फॉर्म दिल्लीहून आला नव्हता ता. १२ जूनपर्यंत. शेवटची फॉर्म पोहचण्याची तारीख १९ जून होती. शेवटी मी दिल्लीला जाऊनच फॉर्म भरण्याचे ठरविले. परंतु त्रासतर खूपच होणार होता. कारण रेल्वेचे रिझर्वेशनदेखील नव्हते. आर्थिक नुकसान व शारिरीक कष्टाला तर मर्यादा नव्हती. आठवड्याभराच्या अभ्यासाचेदेखील नुकसान. परंतु माझे पूज्य आईदादा म्हणतच होते की साईबाबा असे होऊ देणारच नाहीत. पण दिवस जात होते व फॉर्मचा पत्ता नव्हता. शनिवार आला तारीख १७ जून होती. फॉर्म भरावयाची सर्व तयारी होती. पण मग शेवटी जायची तयारी झाली. रात्रीच्या डेहराडून एक्स्प्रेसने दिल्लीला जायचे. त्रास व अभ्यासाचे नुकसान आणि तू तर जणू आम्हाला विसरला होतासच, मग काय ? आपण जगात दोनच गोष्टींना मानतो. साईबाबा व आईबाबा. आणि काय आश्चर्य ! १७ तारखेला दुपारी १२ च्या सुमारास पोष्टमनच्या रूपात तू आलास आणि फॉर्म देऊन गेलास. लगेच मी आमच्या हॉलमध्ये असलेल्या तुझ्या मोठ्या प्रतिमेस साश्रु नयनांनी नमस्कार केला. व फॉर्म भरून बोरीवली पोस्टात रजिस्टरदेखील करून आलो. त्यावेळी पोस्टातला कारकून म्हणाला अहो सोमवारी फॉर्म पोहोचणार नाही पण आता काही मार्ग नव्हता. बाकी हवाला तुझ्यावर ठेवला. रस्त्यावरच्या फुलवाल्याच्या दुकानातून तू मला आधीच इशारा केला होता. त्या तुझ्या हाताने की "बिनधास्त रहा" आईदादा म्हणाले की आता तारबीर करून कळवायची काही गरज नाही. आणि काय आश्चर्य. फॉर्मची शेवटची तारीख वाढवली गेली ती ३ जुलैपर्यंत. असो. आज पहाटे तू ४-३० वाजता आईदादा व मी बसलो असताना साक्षात्कार देऊन गेलास. तो उपदेश अजून माझ्या कानात आहे. हृदयात आहे. आयुष्यात प्रत्येक अंधाऱ्या रात्री तू आम्हाला

थोपटले आहेस, आधार दिला आहेस, रस्ता दाखविला आहेस. घराबाहेरच्या जीवनात मी खूप कष्ट करू शकलो ते फक्त तुझ्याच नावाच्या सावलीत. मला आठवते, मी दिल्लीत असताना स्कूटर अपघात होणार होता तेव्हा तू त्या "अब क्या होगा" या चित्रपटाच्या पोस्टरवर राहून मला वाचविलेस. आईदादांच्या कष्टाला तर सीमाच नाही. आता एकच मागणे मागतो समाजातल्या दीनदुबळ्या गरिबांची सेवा करण्याची मला शक्ती दे. जीवनात वाईट गोष्टीशी लढा देण्याची मला ताकद दे व जसा सर्व भक्तांच्या पाठी उभा राहतोस तसा माझ्या आईदादांच्या व माझ्या बहिणींच्या पाठी उभा रहा. ही तुझ्या चरणी तुला शरण आलेल्या भक्ताची नम्र प्रार्थना.

Phone : 457099

**Dattatraya Electrical Corporation**

**Electrical & Mechanical Engineers & Govt. Contractors**

Mahim Service Industrial Estate, Ground Floor,
Mori Road, Mahim, Bombay-400 016.

Contact us for

1) Erection of L.T. & H. T. Sub Station, Rail Pole Erection, Laying of eables.
2) Power Sanction (N.O.C.) from Govt. of Maharashtra.
3) N.O.C. from municipality and Fire Brigade.
4) Registration of small scale Industry with Govt. of Maharashtra.
5) Advise and representation on Excessive Electrical bill & duty.
6) Repairs and Rewinding of Electrical motors.
7) All types of Electrical installation.

# शिरडी–वृत्त माहे सप्टेंबर सन १९७८

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन**:– १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची नेहमीप्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी कीर्तने झाली.

२) ह. भ. प. विनायक पु. शाळीग्राम चिंचवड, पुणे यांचे कीर्तन.

३) सौ. अरुणाबेन वि. पटेल, अहमदाबाद यांचे कीर्तन.

**प्रवचन**:– १) ह. भ. प. भागवत भि. पालकर, औरंगाबाद.
२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.
३) ह. भ. प श्रीसंत सीताबाई अमळनेरकर, जळगाव.
४) ह. भ. प. शशिकांत कुलकर्णी, लोणावळा.
५) ह. भ. प. सदाशिव बा. टेमगिरे, शिरूर, पुणे.

**भजन, गायन वादन**:– १) श्री. जगमोहन मिश्रा मुंबई. २) श्री. रामचंद्र द. बावेकर, शिरडी. ३) श्री. गुलाबचंद भट, यवतमाळ. ४) श्री. शिवाजी तु. डुनाळ, शिरडी. ५) सौ. इंदिरा भा. पालकर, औरंगाबाद. ६) श्री. दिनेश साखरे, कोल्हापूर. ७) श्री. लोकमान्य कलारथक, नाशिक. ८) सौ. मीनाबाई जळगांवकर आणि भजन मंडळी. ९) नॅशनल फेडरेशन ऑफ दि ब्लाईंड राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, विभाग, पुणे. १०) श्री. जी. एन्. शंखपाळ, पुणे ११) श्री. श्रीपाद देठणकर, पुणे. १२) श्री. एस. टी. बोरकर, पुणे. १३) श्री. एस. एम. ब्राम्हणे, पुणे. १४) सौ. कमल गो. शंखपाळ, पुणे. १५) सौ. सुरेखा ब्राम्हणे, पुणे. १६) श्री. कोंडीराम शिंदे, पुणे. १७) श्री. रघुनाथ कृ. कारखानीस, औरंगाबाद. १८) श्री. रमेश कुलकर्णी, पुणे. १९) श्री. वसंत दि. फडणवीस, मुंबई. २०) श्री. विश्वनाथ गणेश मेळा, औरंगाबाद. २१) सौ. विजया वि. शाळीग्राम, पुणे. २२) श्री. विलास शं. देशपांडे, कोपरगाव. २३) श्री. शंकरराव र. देशपांडे, सोमय्या कॉलेज, कोपरगाव. २४) सौ. सुलभा र. जोशी, मुंबई. २५) कु. ललिता र. जोशी, मुंबई. २६) श्री. आश्विन ल. निमकर, डोंबिवली. २७) श्री. एन्. पी. लाला, मुंबई. २८) श्री. दत्तात्रेय केरकर, मुंबई. २९) श्री. प्रकाश मु. रानडे, मुंबई. ३०) श्री. शंकरराव ह. डोईफोडे, परभणी. ३१) श्री. हेगेश्वर प्रसन्न भजनी मंडळ, पारनेर.

माननीयांच्या भेटीः—

१) मा. श्री. देवस्थळी IAS. एक्साइज कमिशनर, महाराष्ट्र.
२) मा. नामदार श्री. दत्ता मेघे, राज्यमंत्री, रोजगार मनुष्यबळ विकास, तांत्रिक शिक्षण–प्रशिक्षण महाराष्ट्र.
३) मा. नामदार श्री. विक्रमसिंग, उपशिक्षणमंत्री, धार (म. प्र.)
४) मा. श्री. के. बी. जितकर, जिल्हाधिकारी, अ. नगर.
५) मा. श्री. रामनाथजी वाघ, जिल्हा परिषद अध्यक्ष, अ. नगर.
६) मा. श्री. एस. बी. काझी, प्रांत ऑफिसर, संगमनेर.
७) मा. श्री. मकरंद वैद्य, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र.
८) मा. श्री. रणदिवे, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे, महाराष्ट्र
९) मा. श्री. देशपांडे, लेखासंचालक, महाराष्ट्र,
१०) मा. नामदार श्री. बबनरावजी ढाकणे, राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र.
११) मा. श्री. आर. बी. सुळे, जिल्हा न्यायाधीश अ. नगर.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

× × ×

*With Best Wishes*

*From*

**A. V Paradkar**

**and**

**Family**

IN FOND AND LOVING MEMORY OF

# Smt. DHANWANTI GARG

BORN 21-3-1932

DIED 5-6-1976



Inserted by Dr. RAJINDER GARG,
POST BOX No. 7827

CALCUTTA – 700 012.

**श्रीसाईबाबांच्या 'ओरिजनल पेंटिंग' वरून केलेली आर्टप्लेट : ऑफसेट प्रिंटिंगवर छापलेले एक दुर्मिळ चित्र**

श्रीपूर्वी

# प्रतिबिंब

## दिवाळी अंक १९७८

**श्रीसाईबाबांचे अद्भुत चरित्र**

श्रीसाई शरणानंद या नव्वद वर्षे वयाच्या संन्यासी महाराजांनी लिहिलेल्या श्रीसाई चरित्राचे श्री. **विश्वनाथ बाळ खेर** यांनी केलेले रसाळ भाषांतर. यापुढे दर महिन्याला एकेक प्रकरण श्रीपूर्वी प्रतिबिंब या मासिकांत प्रसिद्ध होणार. त्या खेरीज अतिशय नामवंत व्यक्तींनी लिहिलेले उद्बोधक आणि वेधक साहित्य.

卐

**दिवाळी अंक ६ रुपये** **नेहमीचा अंक ३ रुपये**

卐

श्रीपूर्वी प्रकाशन, कांदिवली गौशाळा,
कांदिवली (पूर्व) मुंबई नं. ४०००६७

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

आकार : दर दिवसास २५ पैसे

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

नवजीवन हौसिंग सोसायटी,

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१. संपादक व प्रकाशक : श्री. क. ही. काकरे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.